म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८००

REFBK-0009782

# विचार लहरी

लेखसंग्रह



देवकन्या·पुष्प ८ वें

लेखक : श्री. रा. देव. (धाराशीव)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

देवकन्या पुष्प ४ थें

# विचार लहरी

## ( लेख-संग्रह )

वैचारिक व प्रासंगिक अशा २८ लेखांचा संग्रह

लेखक— श्री. श्री. रा. देव
' देवनिवास ' धाराशिव, (जि. उस्मानाबाद)

—प्रस्तावना—

डॉ. प्र. न. जोशी (पुणें)

REFBK-0009782

किंमत २ रुपये

— प्र का श क —

श्री. श्री. रा. देव
' देवनिवास '
धाराशिव, जि. उस्मानाबाद

वैशाख शु. ३ शके १८८०,
२२ एप्रिल १९५८

सर्व हक्क लेखकाधीन

—मु द्र क—

व. वि. आपटे
हिंदुस्थान मुद्रणालय,
८६५ सदाशिव पेठ, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ..................
क्रमांक .......... दि ..................



**श्री. यमाजीराव सातपुते,** अॅडव्होकेट
( ता. गंगापूर, जि. औरंगाबाद )

नगराध्यक्ष--गंगापूर

चेअरमन-वूल इंडस्ट्रीज,

ऑनररी सेक्रेटरी-को-ऑपरेटिव्ह सोसायटी

प्रेसिडेंट--शिक्षण कमेटी

मेंबर-वूल खादी ग्रामोद्योग संस्था, कमिशन मराठवाडा

.... **यांनी** ....

**या प्रकाशनासाठीं १०१ रुपये देणगी दिली.**

## अभिप्राय:—

### श्री देवांच्या 'विचार–लहरी' वरील बुडबुडे

(ले. वि. आ. देशमाने) एम. ए. बी. एड.

कवि देव यांची माझी जी तोंडओळख झाली ती त्यांच्याच देवकन्येमुळें. 'देवकन्या' दिसायला सुंदर आहेत. अलंकाराची शाल नि तालाची नुपूरें त्यांच्या सौन्दर्यांत भरच टाकतात. त्यांत पुन: कल्पनेंतील भावसौन्दर्य मनाला मोह पाडतें, म्हणून त्यांच्या देवकन्या पुन: पुन: पहाव्याशा वाटतात. औसा मुक्कामीं 'देवकन्ये' ची गेयता कवीच्या गोड गळ्यातूनच ऐकावयास मिळाली.

मग कवि देवांचा नि माझा परिचय झाला. त्यांच्या बालबोध वळणांची ति घरगुती जीवनाची ओळख मला झाली. निसर्गाच्या परिसरांत टुमदार घर आहे. नदीची झुळझुळ, चिमण्या पाखरांची किलबिल नि वायुलहरीची सळसळ कवीला नेहमीच आनंद देते अन् मग कवि कल्पनेच्या जगांत वावरतो. भावविचाराला शब्दांत आकारतो निराळाच आनंद कवीला मिळतो. त्या आनंदातूनच कवीच्या एक, दोन नि तीन 'देवकन्या' रसिकांच्या समोर आल्या आहेत. त्या 'देवकन्यां' ना थोरामोठ्यांचें लेणेंहि लाभले आहे.

'विचार लहरी' ही त्यांचीं चवथी 'देवकन्या.' हिचें रंगरुप पहिल्या त. पेक्षां निराळे आहे. तिचा थाट नि घाट वेगळाच आहे. तिचें निराळेपण कवीच्या बहुश्रुततेंतून निर्माण झाले आहे. पद्याचा प्रांत ओलांडून गद्य प्रदेशांत प्रवेश केला कीं एक प्रकारची रुक्षता जाणवते. भावसौन्दर्याची जागा विचारसौन्दर्य घेतें म्हणून कवि देवांची चवथी 'देवकन्या' कांहींची शृंगाररसलोलुपांची निराशा करील असें वाटतें !

परंतु 'विचार लहरी' तील विषयाची नि साहित्य प्रकाराचीं विविधता पाहून मनाला एक प्रकारचा आनंदहि खास वाटेल. एकूण २८ विचार लहरी आहेत. त्यांत एक ऐतिहासिक आहे 'अपसिंग' गांव लहान आहे पण त्याच्या नांवाचा इतिहास मोठा आहे. तो प्रकाशांत आणल्यामुळें लेखकाचीं चोखंदळ, चौकस दृष्टीहि प्रकाशांत आली आहे. तीन चरित्रात्मक लेख आहेत. संस्कृत साहित्यातील बाणभट्ट, भागानगरमध्ये संतपणाला पोचणारा भटजीबापू नि क्रांतिज्वालेंत हुतात्मापदाला पोहोचलेला बालमुकुंद यांची चरित्रें लेखकानें लिहिलेलीं आहेत. त्यांतून लेखकांचे स्वदेश, स्वधर्म नि संस्कृति प्रेम प्रगट झालें आहे. विविध विषयांवर आपले स्फुट विचार लेखकानें बारा लेखांतून प्रगट केले आहेत. विचारांची मांडणी स्वतंत्र तंत्राची आहे

एखादा विचार लेखकाच्या मनाला चटका लावतो. तेव्हा बुद्धि उलट सुलट विचार करूं लागतें. विचारांची निश्चिती झाली कीं पांढऱ्यावर काळे करण्यास हात सरसावतात, विचारांची उत्कटता इतकी प्रबल होतें की, ' कसं लिहावं ' याचा विचार लेखकाला शिवत नाही. मंत्रातंत्राची वाट पहात नाहीं, म्हणूनच लेखकांचे निबंध म्हणजे त्यांचें प्रगट चिंतन वाटते काही लेखाचा तोंडावळा तर लघुनिबंधाला शोभणारा आहे.

लेखक हाडाचा शिक्षक आहे, सुविचाराचें बीज मनोभूमीत पेरणें हा त्याचा धंदा नव्हे, वृत्ति आहे. म्हणून त्यांच्या कथेंत सद्विचाराचा, व सदाचाराचा विजय होतो, कथेची घडण नि जडण स्वतंत्र बाळबोध आहे. नव्या नव्या तंत्राचा उपद्व्याप लेखक मुळीच करीत नाहीं, त्यामुळे कथेची चढण, उतरण नि निरगांठ हें साचेबंद तंत्र त्यांच्या कथेंत पहावयास मिळत नाहीं. कथेचा आरंभ उत्कटता वाढवितो, नि शेवट मनाला चटका लावतो एवढेच त्यांच्या कथेत पहावयास मिळते म्हणून त्यांच्या कथा वाचतांना साने गुरुजींची आठवण झाल्यास नवल नाही.

कवि देवांची चवथी देवकन्या रंगरूपानें निराळी असली तरी साहित्यांत नांवारूपाला येईल हें निश्चित, त्यातील एकेक लहर वाचकांच्या मनाला चाटून जाणारी आहे, सद्विचारांचें बीजारोपण करणारी आहे ' जे मन शुद्ध करते, ते साहित्य हा विनोबा भाव्यांचा निकष श्री. देवांच्या विचार लहरीला लावला तर ' विचार लहरी ' बावनकशी सोने ठरेल. म्हणून देवांच्या लेखांचे मोल अमोल आहे. आज अशाच जीवन विकासी नि जीवन प्रकाशी साहित्याची आवश्यकता आहे. आजच्या वाचकाला उत्तान शृंगारानें भरलेली रंडागीतें नकोत तसेच विफलतेच्या रडकथाहि नकोत त्याला पाहिजे उन्नत जीवनाची आशावादी स्तोत्रें ! मला वाटतें कवि देवांचे लेख त्याच भूमीतून प्रकाशांत आले आहेत. पहिल्या तीन ' देवकन्यां ' इतकेच किंबहुना त्याहूनहि अधिक याहि ' देवकन्येचे ' रसिक वाचक स्वागत करील. थोरामोठ्यांचे आशिर्वाद हिलाहि मिळतीलच, म्हणून माझे हें लिहिणें म्हणजे कवि देवांच्या 'विचार लहरीवरील बुडबुडे !' नाहीं तर दुसरें काय ?

धाराशिव (ऊस्मानाबाद) मुंबई राज्य दि. ३–३–५८

# समीक्षण

## श्री. देवांच्या विचार लहरी (गद्य लेखांचा उत्कृष्ट संग्रह)

[ समीक्षकः—श्री. व. स. दीक्षित ]

मराठवाड्यांतील उस्मानाबाद येथील प्रसिद्ध कवि व साहित्यिक श्री. श्रीधर रामकृष्ण देव यांचा विचार लहरी या नावांचा गद्यसंग्रह मी वाचला. यापूर्वी श्री. देवांच्या तीन काव्यकथा जन्माला आल्या. त्या एकापेक्षां एक सरस, सुस्वरुप व आकर्षक वाटल्या. 'विचार लहरी' हा गद्यसंग्रहहि तितकाच सरस व विचार परिलुप्त आहे. यांत एकूण देवांचें (२८) लेख आहेत त्याच त्यांच्या कन्या. या कन्या देवांच्या मनःसागरांतून गद्यरुपानें बाहेर उसळून आल्या. यावरून गद्य व पद्य दोन्हीं प्रांतांत देवांचा सर्वस्पर्शी प्रतिभा विलास, व उदात्त विचार यांचें दर्शन होते या विचार-लहरींत कांहीं वैचारिक, कांहीं लघुकथात्मक, चरित्रात्मक, व एक ऐतिहासिक असे लेख आहेत. विविध विचारांवर यांत लेख असल्यामुळे 'विचार लहरी' हें नांव समर्पक वाटतें. तसे बरेच लेख चांगले आहेत. त्यांतील उल्लेखनीय म्हणजे, तेजोभंग ! पण कोणाचा ?, भांगेत तुळस, सत्वशील हरिश्चंद्र गरीब गुराखी, बालमुकुंद, आमच्या ठमाकाकू, रामायणातील व्यक्तिदर्शन, आई तुझ्याच पायीं, मूर्तिपूजेचे वेगळे स्वरूप, फाटके छत्र, आमचा कुत्रा इत्यादि.

'दुष्टांत सुष्टहि निर्माण होतो' 'शत्रू जरी शरण आला तरी त्याला मरण चिंतू नये. मग हा तर मला जीवदान देणारा ! त्यास जीवदान दिलेच पाहिजे.' इत्यादि वाक्यांवरून श्री देवांची आर्यसंस्कृतीवरील निष्ठा व प्रेम व्यक्त होतात. रामायणांतील व्यक्तिदर्शन' यांत भरताचा त्याग, लक्ष्मणाची सेवा परायणता, रामाची पितृभक्ति व सीतेचें दिव्यत्व व स्वाभिमान यांचें दर्शन उत्कृष्टपणें दाखवून, तुलनात्मक दृष्ट्या दोन संस्कृतींतील फरक दाखविला आहे तो मार्मिक आहे. 'तेजोभंग ! पण कोणाचा ?' यांत यांत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर झालेल्या अन्यायांची लेखकाला चीड आली असून, कर्तृत्ववान व तेजस्वी पुरुषांचीं लक्षणें, सुंदर व ओजस्वी शब्दात वर्णन केलीं आहेत. या व आणखी दोन तीन लेखांत देवांना अन्यायाची चीड वाटल्यामुळे भाषा थोडी कडक झाली आहे. श्री. देवांना निराशावाद मान्य नाहीं हें त्यांच्या लेखावरून स्पष्ट होते.

सत्वशील हरिश्चंद्र, गरीब गुराखी, या कथांत भांडवलशाहीच्या उन्मत्त वृत्तीचा देवांनीं खरपूस समाचार घेतला असून, हे लेख वाचताना

वाचकांचें डोळे पाणावतात व हृदय विदीर्ण होतें, इतके करुणरसपर वर्णन देवांनीं केलें आहे.

'आमच्या ठमाकाकू' यांतील स्वभावपरिपोष उत्कृष्ट साधला आहे 'क्रांतिवीर बालमृकुंद' यांत वीर पुरुष. सत्यासाठी, देशासाठीं मरणालाहि हांसत हांसत मिठी मारतात व 'आत्मा अमर आहे' ही जाणीव करून देतात. तसेंच वीरांगना ही पतिपुढें सर्व सुखें विषवत् मानते हे आर्य स्त्रियाचें ब्रीद वाक्य देवांनी विषद करून दाखविले आहे.

'जुलमी सत्ता मग ती कोणाचे ही असो टिकूं शकत नाहीं' सत्याचा व सत् प्रवृत्तीचा जय होतो.

'महाराष्ट्र सत्यापुढें हाल अपेष्टांना तृणवत् समजतो व प्रसंगी, देशाकरितां व सत्याकरिता प्राणहि देतो' हें देवांनी आपल्या तेजस्वी लेखणींतून सिद्ध केलें आहे 'मूर्तिपूजेचें नवे स्वरूप' आज रुचण्यासारखें नसलें तरी तर्कशुद्धांना पटण्यासारखें खास आहे ''फाटके छत्र' आमचा कुत्रा, पुराणांतील वांगी, 'साहित्यिक संपादक' या लेखांवरून श्री देवांची कल्पनाशक्ति, विचार, विषयाची पद्धतशीर मांडणी, व सूक्ष्म निरीक्षण व लेखनाचें स्वतंत्र तंत्र इत्यादि गुणाचा प्रतशीर मांडणी सूक्ष्म निरिक्षण व लेखनाचें स्वतंत्र तंत्र इत्यादि गुणांचा प्रत्यय येतो. 'सुडापेक्षां क्षमेची बोधट धारच गुन्हेगारांना सरळ करू शकतें' हे 'अधिकारी' या लेखांत दाखविलें आहे.

एकंदरीत देवांच्या लेखणींत, ओज, प्रसाद, बोध, संस्कृतिप्रेम. देशाभिमान, भाषासौष्टव इत्यादि गुण स्पष्टपणें प्रतीत होतात. प्रत्येक लेखाच्या शेवटी त्यांनीं दिनांक घातलें. ते पहातां 'त्यांची प्रतिभा. वयोमानाप्रमाणें कमी न होता. उलट वाढतच आहे,' हे कविवर्य यशवंत यांचे 'प्रतिज्ञा पूर्तीच्या वाटेंत' (देवकन्या पुष्प ३ रें)यांतील विधान सत्य वाटतें बहकलेच्या तरुण तरुणींना यांतून पुष्कळ घेण्यासारखें आहे अशी ही सुंदर, सत्यनिष्ट विचार लहरी आहे. देवांच्या पहिल्या तिन्ही काव्यपुष्पाप्रमाणें किंबहुना त्याहूनहि सरस व सुरस ही विचार लहरीं वाटतें बरच लेख उच्च दर्जाचे वाटतात. श्री. देवांच्या पहिल्या तिन्ही काव्य पुष्पाप्रमाणें, विचार-लहरी हे चवथे गद्य पुष्पहि विद्वान रसिकांच्या आदरांस व प्रेमास पात्र होईल यांत संशय नाहीं. श्री. देवांचे बरेचसें वाङमय अद्याप अप्रकाशित आहे, तें लवकरच प्रकाशांत येवो हीच सदिच्छा व्यक्त करून हें वस्तुस्थिति दर्शक समीक्षण येथेंच थांबवितो.

# प्र स्ता व ना

( लेखक---डॉ. प्र. न. जोशी, एम. ए. पी. एच. डी पुणें )

धाराशिव ( उस्मानाबाद ) येथील प्रसिद्ध कवि श्री. रा. रा श्री. रा. देव यांच्या या ' विचार लहरी ' नामक गद्य लेखांच्या संग्रहाला प्रस्तावना म्हणून चार शब्द लिहितांना मनास मोठा संतोष वाटत आहे. श्री. देव यांची कीर्ति आधीच कवि म्हणून मराठवाड्यातील मराठी वाचकांसच माहीत झाली आहे. इतकेंच नव्हे तर महाराष्ट्रांतील प्रतिभावान कविवर्य राजकवि यशवंत यांनीहि त्यांच्याकाव्यसौन्दर्याचा मुक्त कंठानें गौरव केला आहे. या शिवाय प्राचार्य दांडेकर. डॉ शं दा. पेंडसें, डॉ. वा. दा. गोखले, लोकनायक, मा. श्रा. अणे श्री. त्र्य. कृ. टटे श्री. मुरलीधरराव घाणेकर, ह. भ. प. धुंडा महाराज देगलूकर, भ. व्यं. देशमुख वकील श्री. केशवराव अथनूरकर, श्री अ. ज्ञा. कुलकर्णी एम्. ए. बी. टी. इत्यादि ज्येष्ठ रसिक विद्वानांनीं त्यांच्या वाङमय कृतीचें कौतुक केलें आहे. असें असतांना माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तीनें, देवांचा केलेला गुणगौरव कांहीं विशेष आहे, असें नाहीं. पण श्री देव यांचा आग्रह असा कीं; त्यांच्या या गद्य लेखाच्या पुस्तकास मी चार शब्द लिहावेत

गद्यलेखन झाले तरी तें श्री. देव यांच्या सारख्या प्रसिद्ध कवीच्या लेखणीतून स्रवलेले असल्यामुळें तेथेंहि त्यांच्या कल्पकतेचें दर्शन घडतेंच. ' लहरीला आलें तें लिहिले देवें ' असें जरी देवांनीं प्रारंभीं सांगितलें आहे तरी या 'विचार लहरी , ज्ञानेशांच्या ' स्मरोनि पद कमला ' निर्माण झाल्या असल्यामुळें, त्यांपैकीं प्रत्येक लहरीस आपापल्या री वैशिष्टय प्राप्त झालें आहे

श्री. देव स्वतः कवि अंतःकरणाचे असल्यामुळें त्यांचे चित्त यापूर्वी होऊन गेलेल्या महाकवींच्या काव्य सौदर्यांनें वेडावून जावे यांत नवल कसलें या दृष्टीनें पहातां श्री. देव यांचा 'कालिदासाचें काव्यसौदर्य ' हा लेख वाचण्यासारखा आहे. -महाकवि कालिदासाच्या नाटक महाकाव्यादि कृतीचें रसग्रहण त्यांनीं उदाहरणें देऊन मोठ्या मार्मिकतेनें केलें आहे. ' रामायणांतील व्यक्तिदर्शन ' याहि लेखांत महाकवि वाल्मिकि याच्या अलौकिक प्रतिभेनें सजीव होऊन भारतीयांना आदर्श वाटणाऱ्या रामचंद्र, सीता, लक्ष्मण, भरत इत्यादि व्यक्ति चित्रांचीं माहिती श्री. देवांनी वर्णन केली आहे. बाणभट्टाचें चरित्र गायन श्री. देव यांना करावेसें वाटले तेंहि

याच कारणासाठीं. संत भटजी बापू महाराज या थोर संताच्या चरित्रावर तर श्री. देवांनी एक स्वतंत्र काव्य रचून आपली आदरांजलि अर्पण केली आहे. पण सर्व सामान्यांना सुलभ व्हावें म्हणून पुन: एकदां त्यांनीं ते चरित्र गद्यांत वाचकांपुढें ठेविलें आहे. श्री. देव कवि म्हणून प्रसिद्ध आहेतच. आतां गद्य लेखन म्हणून मराठी वाचकापुढें येत आहत प्रसाद, विवेक, यासारख्या मराठीं नियतकालिकांतून त्यांचे कांही गद्य लेख प्रसिद्ध झाले होतेच. आतां त्यांतले कांही या ' विचार लहरी'मध्ये एकत्रित झालेले दिसतील. श्री. देव यांच्या विवेचनशक्तीचे एक प्रमुख वैशिष्टय असें कीं त्यांची दृष्टि सर्वत्र निरीक्षण करीत असल्याचे दिसते.

विद्वता व संस्कृति, मनः संयमन, वाङमय चौर्य ' तेजो भंग! पण कोणाचा?' ' साहित्य आणि संस्कृति इत्यादि विविध विषयावरील त्यांचें विचार पाहिले म्हणजे एक गोष्ट लक्षांत येतें ती अशी कीं, समाजांत चालू असलेल्या, राजकीय, सामाजिक, सांकृतिक व शैक्षणिक परिवर्तनाकडे त्याचें जाणीवपूर्वक लक्ष आहे. देशप्रेमाचे व सामाजिक उत्पाताचें विचार त्यांच्या स्फुट लेखनात अनेक ठिकाणीं व्यक्त झालेलें दिसतील. याच प्रवृत्तीमुळे त्याना बालमुकुंदाचें चित्र रंगवावें वाटलें. वीर सावरकरांचा गौरव करावासा वाटला श्री. देव यांच्या या ' विचार लहरीत ' कथात्मक लेखांची संख्या जास्त आहे. पण श्री देव यांनीं कथा, केवळ लोकाच्या हळुवार चित्तास रिझविण्यासाठीं, लिहिलेल्या नाहीत. प्रत्येक कथेंत एकादां विचार त्यांना स्पष्टपणें मांडावयाचा आहे असें दिसतें. प्रथम विचार आहे. आणि मग त्या विचारास प्रकटीकरणाचे वेळी, कथेचें आवरण देण्याची लहर कवीच्या मनांत निर्माण झालेली आहे, म्हणजे या ठिकाणीं प्रामुख्यानें विचाराला प्राधान्य आहे, त्यास लहरीनें सालंकृत केले आहे. आई तुझ्याच पायीं, सत्वशील हरिश्चंद्र, गरीब गुराखी, माझी करुण कहाणी इत्यादि गोष्टींतील कारुण्य वाचकांच्या मनांस चटका लावणारे आहे. समाजांत हरघडी घडणाऱ्या अनेक बऱ्या वाईट प्रसंगाचे व भेटणाऱ्या बऱ्यावाईट माणसांचें या कथांतील दर्शन हुबेहुब तर आहेच, पण या सर्वदर्शनामागें एक सत् प्रवृत्तीची प्रेरणा आहे, याचें महत्व विशेष आहे

समाजातील ढोंगीपणाची थ ा श्री. देव यानी मधून मधून फार उत्तम प्रकारे केली आहे. एकमेकाचें वाढदिवस साजरे करून लोकांना भुलविणाऱ्या तथाकथित पुढाऱ्यांची वा रामरावांची थट्टा, श्री. देव यांनी केली आहे ती मुळांतूनच वाचण्यासारखी आहे. ' आमची ठमाकाकू ' वर्णन

करतांना श्री देव हे गद्यलेखन करतांत कां काव्यलेखन चालू आहे असा संभ्रम निर्माण होतो. या काकूंच्या वर्णनांत विनोदी वृत्तीनें कवितेचें बोट हातीं धरले आहे असें वाटूं लागतें. 'भांगेत तुळस' या कथेंत रझाकाराच्या भयंकर चळवळींत माणुसकीचें नमुनें मधून मधून कसे दृष्टीस पडतात याचें उत्तम चित्र आहे. या कथेंतील विलायत हुसेन अनेक कारणासाठीं लक्षांत रहाणारा आहे. मुसलमान तेवढें वाईट व हिंदु तेवढे दयाळू अंतःकरणाचे या आपल्या भाबड्या समजूतीचें परीक्षण व्हावयास हवे. 'विचार लहरीतील' अपर्शिग्याचें ऐतिहासिक महत्व' या संशोधनपर लेखातील ऐतिहासिक विचाराचा परामर्श जाणत्यांनीं घ्यावा. माझें काम फक्त निर्देश करण्याचें आहे.

शेवटी एका गोष्टीचा उल्लेख अगत्यानें करावासा वाटतो. श्री देव यांच्या कविता वाचून ते जतिवंत कवि आहेत असें पटते. त्याच्या गद्य लेखनास मात्र अजून रेखीव व बाधेसूद असें स्वरूप यावयाचे आहे. भाषा क्वचित् ठिकाणी थोडी ओबड धोबड स्वरूपाची आहे गोष्टी लिहितांना तर त्यांना त्यांची जाणीव चागली झाली असेल. मनापासून वाटणारी तळमळ व समाजाची कळकळ हाच एक स्थायीभाव त्यांच्या सर्व गद्य लेखनातून व्यक्त होतो. पण या प्रकटीकरणाचे वेळीं भाषेच्या दृष्टीने थोडे अधिक मार्दव थोडा अधिक रेखीवपणा, थोडीं अधिक सफाई या गोष्टी आल्या तर हें सर्व लेख फारच वरच्या श्रेणीचें झालें असते. हें गुण श्री. देव यांच्या जवळ नाहींत असें नाहीं पण ते कवि देव यांचे आहेत. गद्य लेखक देव यांना ते गुण सर्वांशानें प्राप्त झालें आहेत असें दिसत नाही असो.

श्री. देव यांचें हातून अशीच मराठी वाङमयाची उज्वल सेवा, काव्य व गद्य लेखन, या दोनहि प्रातांत होवो ही सदिच्छा व्यक्त करून हें चार शब्द संपावतो.

महाशिवरात्र
४३६ नारायण पेठ, पुणे.

डॉ. प्र. न. जोशी

# अर्पण—पत्रिका

पृथ्वी

वचार लहरी जशा, उसळल्या मनःसागरीं
तशा समुद वाहिल्या रसिक देव पादावरी
कृपा मजवरी करा, करूनि गोड घ्या मत्कृति
नको अधिक याहुनी, विनवि देव देवांप्रती

'देवनिवास' धाराशिव, भो. रा. देव

# श्री ज्ञानदेव वंदना

ज्ञानेश मूर्ति बघतां सज्जन लववील आपुली मान
मान त्रिखंडि ज्याचा बघतां कुजनाहि धरील तत् चरण
काव्य ज्ञानेशाचें परिसुनि आपेंच डोलतें मान
मानचि हा राष्ट्राचा, ज्ञानेशाचा जिथेंच सन्मान
चातुर्य ज्ञानगंगी काव्या, स्नानें महंत डुलतील
खुडतील काव्य पुष्पें, त्यांच्या आस्वाद पूर्ण घेतील
मूर्तब्रह्माचि केवळ जनदोद्धारार्थ जन्मलें जगतीं
कारुण्य मेघ वाटे अवतरला पूर्ण मेदिनी वरती
ज्ञानेश्वरी नव्हे ही, वाटे प्रत्यक्ष कामधेनूच
ग्रंथस्तनरूपानें षड्रस रसिकास नित्य द्यायास.
लावण्यलताच केवळ, शांतीची लागलीं जिला सुफलें
तीं चाखतांच सुजनें, भक्तीचा लाभ हो तयास मिळे
आपेगांव न केवळ, आळंदी, धन्य ज्यामुळें झाली
ज्ञानेशवास जेथें तेथें ना, जनन मरण ही पाळी
भावार्थ दीपिका ही रत्नाची खाण ज्ञानरायाची
अनुभव अमृत पाशी सकलाते गोड ही रूची याची
वंदन हें ज्ञानेशा! करिती तुज सर्व लोक सादर ही
देवाहि नमिती तुजला लोटांगण घालुनी तुझ्या चरणी
ज्ञानेश! देइ जागा अंतःकरणीं 'विचार लहरीला'
लहरीला आलें ते, लिहिलें देवें, स्मरोनि पदकमल।

पदरज
श्री रा. देव.

८५८२

# लेखकाचें निवेदन

निवेदन लिहिण्यापूर्वी श्री ज्ञानदेवांना वंदन करूनच निवेदनाला आरंभ करतो.

देवकन्या पुष्प ४ थे म्हणजे 'विचार लहरी' यांत माझें २८ लेख आहेत. त्यापैकीं बरेचसे नियकालिकांतून व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें आहेत. माझ्या कांहीं चहात्या, साहित्यिक मित्रांनीं माझ्या कांहीं लेखांचा संग्रह पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावा, असा आग्रह केला म्हणूनच 'विचार लहरी' या लेखसंग्रहाचा छापण्याचा सुयोग आला. याबद्दल माझ्या सन्मित्र साहित्यिकांचें आभार मानणें योग्यच होईल. या पूर्वी माझें (३) काव्यसंग्रह पहिलें (देवकन्या पुष्प १ ले) दुसरें श्री. संत भटजीबापू यांचें चरित्र व तिसरें प्रतिज्ञापूर्ति (खंडकाव्य), रसिकांच्या अवलोकनांत आलें. त्यावर श्री. मुरलीधरराव घाणेकर (डे डायरेक्टर, औरंगाबाद), ह. भ. प. धुंडा महाराज देगलूरकर (पंढरपूर) व लोकनायक मा श्री. अणे (नागपूर) तसेच डॉ. शं. दा. पेडसे नागपूर, राजकवि यशवंत पुणें, भ. व्यं. देशमुख वकील धाराशिव, संपादक विवेक मुंबई, प्रसाद पुणें व संपादक सकाळ वगैरे थोर साहित्यिक विद्वान रसिकांचें अभिप्रायहि सुंदर पण समर्पक लाभले, रसिकांनीहि त्यास सक्रिय सहानुभूति दाखविली याबद्दल त्यांचे मन: पूर्वक आभार मानतो.

विशेष उल्लेखनीय म्हणजे माझ्या 'विचारलहरी' या प्रस्तुत **प्रकाशनासाठीं ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथील प्रसिद्ध अडव्होकेट वकील श्री. यमाजीराव सातपुते यांनीं उदार देणगी देऊन प्रकाशन कार्यास हातभार लावला, याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.**

श्री. केशवराव अयनूरकर मुख्याध्यापक, परंडा यांनीं माझ्या 'प्रतिज्ञापूर्ति' या खंडकाव्याचें, 'प्रसाद' पुणें या मासिकांतून परीक्षण केलें. त्याप्रमाणें उस्मानाबादचें यशस्वी इन्स्पेक्टर श्री. नागोराव जोशी (शिक्षण विभाग) नांदेडचे श्री. नरहरराव कामटीकर परळीचें डे. इन्स्पेक्टर श्री. गोपाळराव नागपूरकर व औरंगाबादचें इन्स्पेक्टर (शिक्षण विभाग) श्री. जनार्दनराव मोघे, या सर्वांनीं जी सहानुभूति, व जें प्रेम व्यक्त केले त्यांना सर्वांना मी विसरणें शक्य नाहीं.

उस्मानाबादचे सुप्रसिद्ध साहित्यिक व लेखन श्री. वि. अ. देशमाने एम्. ए. बी एड् यांनी माझा गद्य संग्रह परिश्रम पूर्वक वाचून काव्यमय गोड

व लालित्यपूर्ण शब्दालंकारानें माझ्या ' विचार लहरीला ' शोभा आणली व सूक्ष्म निरीक्षणात्मक विचार प्रकट केलें याबद्दल त्यांचें आभार मानणें क्रमप्राप्तच होय. त्याचप्रमाणें प्रसिद्ध साहित्यिक श्री. व. स. दीक्षित यांनीहि जे टीकात्मक समीक्षण केलें त्यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे. वेळांत वेळ काढून आढेवेढे न घेता ' विचार लहरीला ' प्रस्तावना लिहून जे मार्गदर्शन केलें व ज्या सूचना दिल्या, त्याबद्दल श्री. प्र. न जोशी एम. ए., पी एच. डी पुणें यांचें मी मनःपूर्वक आभार मानतो.

माझ्या तिन्हीं काव्यकन्यांना, ज्यांचा गोड व प्रेमळ आशीर्वाद लाभला, ज्यांनी आधींच या निघणाऱ्या चवथ्या पुष्पासहि सुयश चिंतिलें, अशा पूजनीय व महनीय लोकनायक माधव श्रीहरि अणे (माजी राज्यपाल बिहार) यांच्या सत्प्रेमाबद्दल मी अत्यंत ऋणी आहे

छपाईचें उत्कृष्ट काम करून देणारे हिंदुस्थान मुद्रणालयाचे श्री. व. वि. आपटे यांचाहि आभारी आहे.

शेवटीं ' विचार लहरी ' ला रसिकांच्या मनःसागरांत स्थान मिळेल, ही आशा व्यक्त करून पहिल्या तिन्हीं काव्य संग्रहाप्रमाणें याहीं गद्य संग्रहास रसिक सक्रिय सहानुभूति व प्रेम दाखवितील, असा दृढ विश्वास बाळगून हें निवेदन येथेंच संपवितो.

देव निवास धाराशिव (उस्मानाबाद)
वैशाख शु. ३ शके १८८०
दि. २२।४।५८

श्री. रा. देव

# अनुक्रम


| | विषय | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | भटजी बापू | १ ते ६ |
| २ | विव्दत्ता आणि संस्कृति | ७ ते ९ |
| ३ | मनःसंयमन | ९ ते ११ |
| ४ | वाङ्मय चौर्य | १२ ते १३ |
| ५ | मानवाचें प्रकार | १३ ते १६ |
| ६ | साहित्य आणि संस्कृति | १६ ते १८ |
| ७ | बाणभट्ट | १८ ते २३ |
| ८ | कालिदासाचे कलासौन्दर्य व रशियाची गुणग्राहकता | २३ ते २७ |
| ९ | रामायणांतील व्यक्तिदर्शन | २७ ते ३२ |
| १० | मूर्तिपूजेंचे नवे स्वरूप | ३२ ते ३५ |
| ११ | फाटके छत्र | ३५ ते ३७ |
| १२ | आमचा कुत्रा | ३७ ते ३९ |
| १३ | भांगेत तुळस | ४० ते ४३ |
| १४ | आई तुझ्याच पायीं | ४३ ते ४७ |
| १५ | रामरावांचा ७५ वा वाढदिवस | ४७ ते ५१ |
| १६ | आमच्या ठमाकाकू | ५१ ते ५६ |
| १७ | अधिकारी | ५६ ते ५९ |
| १८ | सत्वशील हरिश्चंद्र | ५९ ते ६५ |
| १९ | गरीब गुराखी | ६५ ते ७२ |
| २० | माझी करूण कहाणी | ७२ ते ८० |
| २१ | आईचे हृदय | ८० ते ८४ |
| २२ | शांताअक्का | ८४ ते ८६ |
| २३ | क्रांतिवीर बालमुकुंद | ८६ ते ८९ |
| २४ | तेजोभंग पण कोणाचा ? | ८९ ते ९२ |
| २५ | पुराणांतील वांगी | ९२ ते ९४ |
| २६ | अपसिंग्याचे ऐतिहासिक महत्व | ९४ ते ९६ |
| २७ | साहित्यिक व संपादक | ९६ ते १०१ |
| २८ | श्रीसमर्थांची शिकवण व कार्य | १०२ ते १०४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. इस्टमल.
अनुक्रम......................... विः ......................
क्रमांक .......................१. नों: दिः ...................

# श्री. संत भटजी बापू उर्फ बाळकृष्णानंद स्वामी

कांहीं कामानिमित्त मला हैद्राबादीं वैशाख महिन्यांत जाण्याचा योग आला. वैशाख वद्य ११ ला हैद्राबाद येथें श्री संत भटजी बापू महाराज यांची पुण्यतिथि असते. वैशाख वद्य ११ ते १३ पर्यंत महाराजांची पुण्यतिथि साजरी करण्यांत येते. हजारों गोरगरिबांस अन्नदान होतें. श्राद्धाच्या दिवशीं तर लग्नसोहळाच आहे कीं काय असें वाटतें. त्यांना ब्रह्मीभूत होऊन २० वर्षे होतात. तरी त्यांनीं घातलेला नियम दर द्वादशीला भोजन व दरवर्षी पुण्यतिथि थाटांत होते. अशा परमपवित्र व भाग्यशाली संताचा अल्प-परिचय महाराष्ट्राला व्हावा म्हणून महाराजांचा अल्पपरिचय मी देत आहे

यांचें मूळ घराणें—अकोला जिल्ह्यांतील पातूर ग्रामाचे हे गार्ग्यगोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. रामचंद्रपंत त्यांचे वडील हे अत्यंत दशग्रंथी विद्वान पण अगदीं साधेभोळे. गंगाधरपंत यांच्या आजोबांचे नांव गदाधरपंत. गदाधरपंतांना दोन मुले, एक लक्ष्मणराव व दुसरे रामचंद्रपंत गदाधरपंत एकाएकी निवर्तल्यामुळें प्रपंचाचा सर्व भार लक्ष्मणभाऊवर म्हणजे भटजी बापूंच्या चुलत्यावर पडला श्री व सरस्वती यांचें सख्य बहुतेक नसतेच या न्यायानें लक्ष्मणभाऊ जरी विद्वान होते तरी त्यांचें अठराविश्वें दारिद्र्य व प्रपंच मोठा, म्हणून त्यांचे दिवस फारच कष्टानें जाऊं लागले. ही विस्कटीत घडी सुधारण्यासाठीं आपलें गांव सोडले पाहिजे, असें लक्ष्मणभाऊंना वाटून, त्यांनीं आपलें गांव सोडलें. व अकोल्यास श्री मोकासदार नांवाच्या उदार व श्रीमंताचा आश्रय घेतला तेथें पुजारी म्हणून राहिले पण विद्वत्तेचें तेज कधीं झांकतें काय ? लक्ष्मणभाऊंच्या विद्वत्तेनें श्री मोकासदार चकित झाले. सर्व अकोल्यांत त्यांची प्रसिद्धी झाली. पण संकटें कधीं एकटीं येत नसतात. दुर्दैवानें श्री मोकासदार कालवश झाले मृत्युसमयीं त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत आपल्या मुलास लिहिलें कीं तूं व लक्ष्मणभाऊ मला ......... आहांत माझ्यानंतर माझ्या इस्टेटीचा अर्धा-भाग लक्ष्मणाचा व अर्धा तुझा राहील.

मुलानें हें कबूल केले. याला म्हणावें सत्पुत्र ! त्या मुलानें वडिलांची आज्ञा लक्ष्मणभाऊंस सांगितली. पण लक्ष्मणभाऊंना हें पटलें नाहीं. ते म्हणाले 'मी ज्या घरीं अन्न खालें तेथील एक पैही मी घेणार नाहीं.' व लगेच त्यांनी त्या घराचा निरोप घेतला जातांना 'वडिलांचे द्वादशी व्रत सोडू नकोस' असा उपदेश मोकासदाराच्या मुलास केला.

लक्ष्मणभाऊ तेथून निघून त्यांनीं हैद्राबाद गांठले. सर्व प्रपंचाचा गोतावळ घेऊन ते हैद्राबादीं आले.

हैद्राबादीं त्यांचा एक पूर्व परिचित मित्र रहात होता. त्यांचें नांव सोनोपंत ते राजारायान बहादुर-जहागीरदार यांच्या पदरीं कारभारी होते. सोनोपंतांच्या घरीं हे सर्व राहिले. येथें पुराण पूजा करून कालक्रमणा करूं लागले दर द्वादशीला ब्राह्मणभोजन झालेंच पाहिजे. आषाढ श्रावण महिन्यांत पारायण व सप्ताह समारंभ. शेवटीं हजारोंनी अन्नदान करावयाचे हा नियम.

एका श्रावण सप्ताहाला लक्ष्मणभाऊंना ५०० रु. ची जरूर पडली. सोनोपंतांजवळ गोष्ट काढली सोनोपंत सहज म्हणाले "काय ? हुंडी नेहमीं येथेंच पटतें काय ?' त्यावर लक्ष्मणभाऊ म्हणालें 'खरी हुंडी कोठेंहि पटेल.' पंत म्हणालें 'तर मग गावांत पुरणमल नांवाचा श्रीमंत मारवाडी आहे तेथून रुपये आणाल तर मी आपणांस खरा समजेन' पुरणमल सांप्रदायिक लोकांनांच पैसे देत असतो. इतरांची डाळ त्याचेजवळ शिजत नसे. लक्ष्मणभाऊ उठले पुरणमलाकडे आले पुरणमल चिंताक्रांत दिसला लक्ष्मणभाऊनें चिंतेचें कारण विचारलें पुरणमल म्हणाला काय करूं सुचत नाहीं! माझें कुलदैवत सीताराम काल रात्रीं कोणी चोरुन नेलें तें सापडल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नाहीं. ती मूर्ति कुणी आणून दिल्यास त्यास मी माझें सर्वस्व अर्पण करीन. यावर लक्ष्मणभाऊ म्हणाले, 'वचने किं दरिद्रता' 'राज्य मरो नी वैद्य मरो' अशीच सर्वांची स्थिति असते. मग तुम्हीच काय अपवाद आहात?' असें म्हणताच पुरणमल आवेशानें म्हणाले मी जे बोललो यांत काडीचाही बदल होणार नाही.' 'आपली मूर्ति आतांच आपणास मिळेल' असें भाऊ म्हणतांच पुजारी आला व म्हणाला शेटजी! मूर्ति सांपडली शाळाग्रामाच्या खाली पडली होती.' झाले! बोलाफुलाला गांठ पडली

म्हणा वा लक्ष्मणभाऊची प्रतिज्ञा व योगक्षेमाची काळजी वाहणाऱ्या परमेश्वराची कृपा म्हणा मूर्ति तर सांपडली. पुरणमलानें आपली इस्टेट लक्ष्मणभाऊंच्या चरणीं अर्पण केली व त्यावर तुलसीपत्र ठेवलें. लक्ष्मणभाऊ खरे त्यागी व निस्पृह. ते म्हणाले, ' मला हें द्रव्य कशाला ! मी तें कसें सांभाळूं ? त्यांतलें ५०० रु. मुनिमाच्या हातीं सोनोपंतांकडे पाठवा व बाकीची रकम मी तुम्हाला पुनः माझी म्हणून दान देतो ती घ्या झालें.

इकडे मुनीम ५०० रु घेऊन आला. लक्ष्मणभाऊंच्या नांवें ५०० रु. जमा करण्यास पुरणमलानें सांगितलें. रसिद द्या.

सोनोपंतांच्या डोळ्यांतून पाणी आले कंठ सद्‌गदित झाला व मनांत म्हणाले, ' हरहर ! मी केवढा अधम. एका सत्पुरुषाचा अंत पाहिला. इतक्यांत लक्ष्मणभाऊ आले. त्यांच्या पायावर डोकें ठेवून त्यांची क्षमा मागितली. सप्ताह आनंदानें पार पडला.

तेव्हांपासून लक्ष्मणभाऊंचें सामर्थ्य व ईश्वरनिष्ठा कशी आहे हें सर्वांना कळलें.

कांहीं दिवसांनीं लक्ष्मणभाऊ कालवश झाले त्या वेळीं आमचे चरित्र-नायक ' भटजी बापू ' १० वर्षांचे होते. लक्ष्मणभाऊंच्या मागें श्री संत भटजी बापूंचा प्रपंच उघडा पडला. वडील रामचंद्रपंत विद्वान पण शु‍न तुकाराम महाराजांचे अवतार. त्यांनीं पत्नीची आज्ञा घेऊन संन्यासदीक्षा घेतली व एका वर्षांतच त्यांनीं इहलोकींची यात्रा संपविली.

भटजीबापूंची मातुश्री व भटजीबापू निराश झाले. काय करावें सुचेना ! भटजींच्या मातुश्रीनें आत्महत्त्या करण्याचें ठरविलें. पण त्यांना साक्षात्कार झाला. व त्या आत्महत्त्येपासून परावृत्त झाल्या, दोन चार दिवसांतच अरब यशवंतरावाच्या घरचे त्यांना बोलावणें आलें. ' आमच्या घरी उभयतां रहावें ' असें आश्वासन मिळाले.

१० वर्षांचें भटजीबापू पुराण सांगूं लागलें प्रासादिक वाणीमुळें श्रोतृवंद डोलूं लागला. त्या वेळचें वर्णन मी माझ्या भटजी बापूंच्या काव्यमय चरित्रांत केलें ते असे—

## पृथ्वी

पुराण तंव चालतां सकल वृन्द ते डोलती
म्हणे खचित व्यास हा, नच दुजा गमे संप्रति
लहान असुनी किती कथन गोड हें लागतें
प्रभूविण निराश्रिता पुरवि लाड हो कोण ते?

कांहीं दिवसांनीं भटजीबापूंचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचें नांव सावित्री होतें, तें अन्वर्थक होतें. भटजी बापूंचा संसार थाटांत चालला. त्यांना एकूण ६ मुलगे व २ कन्या झाल्या. ते सर्व मुलगे लहानपणींच वारले व एक पहिला मुलगा गोपीनाथ दादा हा ही त्यांच्या वयाच्या ७० वे वर्षी त्यांना सोडून गेला.

त्यांची पत्नी वारली. सूनहि गेली. दोन कन्याहि कालवश झाल्या. भटजी बापू एकटेच राहिले.

पण भटजी महाराज जणूं कांही घडलेंच नाहीं असें स्थितप्रज्ञ दिसले. त्यांचे गाणें फारच मधूर असून मी मी म्हणणारें गवई त्यांच्यापुढें हात टेकीत रोज पार्थीव पूजा करण्याचा त्यांचा नेम असें व त्यावेळी ' सांब दयेचे देणें'हें गाणें म्हणत असतां शेकडो मंडळी तेथें जमत.

**गोपीनाथ दादा ज्या दिवशीं वारले त्या दिवशी मुंबईहून ५–२५ मंडळी त्याचे गाणें ऐकण्याकरितां तेथें आली. मुलाचें शव घरात पडले आहे, लोक प्रेतयात्रेसाठीं मागच्या दारीं आले आहेत, अशा प्रसंगीं आलेल्या पाहुण्यांना एक तास गायन ऐकवून त्यांची इच्छा तृप्त करणाऱ्या भटजीबापूंच्या स्थितप्रज्ञतेची कमालच आहे. यालाच खरे जीवन म्हणतात.**

जग संतांच्या चरित्राकडे केवळ अलौकिक दृष्टीनेंच पहात असतें. कांहीं भौतिक चमत्काराची रेलचेल ज्यांच्या चरित्रांतून पुष्कळ आढळेल तोच संत, अशी सामान्य मनुष्याची भावना असते. चमत्कार करील तोच संत ' ही व्याख्या बरोबर नाही. भागवतामध्यें श्रीकृष्णानें उद्धवास जी संताची लक्षणें सांगितलीं आहेत तीं ज्याच्या अंगी बाणलीं असतील तोच खरा संत. हीं लक्षणें अशीं :– ' निरपेक्षं मुनिं शांतं निर्वैरं समदर्शनम् ' या उक्तींतील सत्य भटजीबापूंना तंतोतत लागू पडतें. जेव्हां समाजांत

अशांतता पसरते व व्देषमत्सरादि विकारांची वाढ होतें, अशा वेळीं संतांचेंच आदर्श जीवन आचरणांत आणण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे. प्रपंचांत राहून परमार्थ करून तो दुसऱ्यास करावयास शिकविणें हे संतांचें कर्तव्य असतें. **श्री भटजीबापू हे परमार्थाचाच प्रपंच करणारें नसून** प्रपंचालाच परमार्थ बनविणाऱ्या ॥ अवघाची संसार सुखाचा करीन ॥ अशी प्रतिज्ञा करणाऱ्या श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या परंपरेतील होते, हें त्यांच्या चरित्रावरून सिद्ध होते. त्यांनी शेवटपर्यन्त आपलें स्वधर्माचरण सोडलें नाहीं. 'मुक्ताते निर्धारिता । लाधे आपलीच मुक्तता ' असें श्री ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणें आपले जीवन सुखशांतीनें समृद्ध व्हावें व कितीहि आघात **आले तरी समवृत्ति ठेवावी**, असें ज्यांस वाटत असेल त्यांनी श्री. भटजी **बापूंचे चरित्र अवश्य वाचावें**. त्यांचें चरित्र त्यागमय होते. तसेच ईश्वरभाव हा जो संतांच्या जीवनांतील स्थायीभाव, तो त्यांच्या चरित्रांतून जागोजागीं आढळतो.

सर्वभूतीं भगवन्निष्ठा ठेवून, सर्वाभूतीं अन्नदान, स्वतःची पत्नी वहिरींत पडली असतां पार्थीव पूजा न सोडण्याचा निर्धार व मागें सांगितल्याप्रमाणें स्वतःचा पुत्र मृत असतांहि सर्व दुःख विसरून, आलेल्या पाहुण्यांना गाणें ऐकवून संतुष्ट करणें हेंच खरें ईश्वर-पूजन होय.

' संतोषं जनयेत् प्राज्ञस्तदेवेश्वर पूजनं ' असें ईश्वरपूजन ते नित्य करीत हे चरित्र गृहस्थाश्रमी पुरुषांनांही आदर्शभूत आहे. **जवळ कांहीं नसतांना हजारोंनी अन्नदान, त्यांच्या येथें होत असे. यांत ' योगक्षेमम् वहाम्यहम् ' ही प्रतिज्ञाच या रूपानें त्यांच्याकरितां भगवान पूर्ण करीत होता असें म्हणावें लागतें.** त्यांचा अध्यात्मिक अधिकार फार थोर होता, व विशेष म्हणजे त्यांच्यात कर्म, उपासना व ज्ञान यांचा समन्वय स्पष्टपणे दिसून येतो. अशा थोर संताचें चरित्र वाचकास कळावे व विशेषतः हैद्राबादेच्या बाहेरील सबंध महाराष्ट्रास यांची माहिती व्हावी म्हणून हे श्रीसंत भटजीबापू महाराजांचें चरित्र लिहीण्याचें सद्भाग्य मला लाभले, ही संतांचीच कृपा आहे. त्या संतांचा मी सदैव ऋणी आहे.

धाराशिव, ५।३।५६ (प्रसिद्धी-प्रसाद पुणें)

## : २ :

# विद्वत्ता व संस्कृति

आज विश्वविद्यालयाच्या कारखान्यांतून दरवर्षी अगणित विद्यार्थी पास होऊन बाहेर पडतात. त्यामुळें आम्ही किती प्रगतिपथावर पोंहचलों आहोत, असें वाटतें. तेथून स्वर्ग फक्त दोनच बोटें उरला आहे असें वाटतें !

पण विद्येबरोबर तिचा जो परिणाम आमचे मनावर व्हावा तो कितपत झाला आहे, हें पाहिल्यास आम्ही पृथ्वीतलाच्याहि खोल अधः-पाताच्या गर्तेंत आहोंत असें कोणीहि सूज्ञ म्हणेल.

विद्या प्राप्त झाल्यावर जें शील, चारित्र्य व पावित्र्य आमच्या अंगीं बाणावयास हवें, त्याचा अंशहि अलीकडील सुशिक्षित म्हणविणाऱ्या ८० टक्के विद्वानांच्या अंगीं नाहीं हें खेदानें म्हणावें लागतें. विद्वत्ता व संस्कृति यांची फारकत झालेली दिसते. प्रेमी जोडप्यांची लग्नें व लागलीच क्षुल्लक कारणांवाचून घटस्फोट. वर्णाचा जातीचा, आईबापांचा व संस्कृतीचा, काडी-मात्रहि विचार न करतां, ज्यांना जी दिसेल ती स्त्री व जो दिसेल तो पुरुष मग ती कोणत्याहि धर्माची असो स्वीकारावयाची, व मग त्यांत थोडासा बिघाड होतांच पुनः विलग व्हावयाची, अशीं शेंकडो उदाहरणे नित्य दृष्टीस पडतात.

' बागेंतील फूल हुंगावयाचा प्रत्येक प्राणिमात्रास हक्क आहे ' तो कां म्हणून बुडवायचा ? हीच विचारसरणी व हेच संस्कार आम्हाला शिक्षणानें मिळाले आहेत,

आम्ही शिवाजी महाराजांचें, श्री समर्थरामदासांचे वंशज व अनुयायी म्हणवतो, पण त्यांचा एकही गुण आमच्यांत उतरत नाहीं, याचे कारण आमच्यांत झालेली विद्वत्ता व संस्कृति, यांची फारकत !

कल्याणची सुंदर युवती धरून आणून श्रीशिवाजी महाराजांपुढें नजराणा म्हणून आणली जातें. पण त्यांची नजर तिच्याकडे जातांच

शिवाजी महाराज नतमस्तक होतात, व तिला म्हणतात "आईसाहेब ! मी तुमच्या पोटीं जन्म घेतला असतां, तर तुमच्या इतकाच सुंदर झालो असतो. असो ! आईसाहेब ! मला आपणांस नमस्कार करूं द्या." असें म्हणून शिवाजीमहाराज तिच्या पाया पडतात, व लगेच आबाजीला सांगतात "हिला साडी चोळी नेसवा व तिच्या घरी सुरक्षित पोंचवा." काय हें चारित्र्य ! कोणत्या विद्यालयांत शिवाजीचें शिक्षण झालें होतें ? आज पहावें तो जिकडे तिकडे वर्तमान पत्रांतून 'स्त्रियांची टिंगल' या विषयावर रकानें भरतात यावरून आम्ही सुधारलो कां बिघडलो हें तुम्हीच ठरवूं शकता.

'स्वामी विवेकानंद अमेरिकेंत धर्म प्रचाराकरितां गेले असतां एका श्रीमंताच्या घरीं उतरले. त्या श्रीमंताला एक सुंदर कन्या होती. विवेकानंदांचा चेहरा, तो रुबाब ती भव्य शरिरयष्टि व तें मधुर वाक्‌पाडित्य पाहून ती मोहीत झाली व तिनें विवेकानंदांना माळ घालण्याचा निश्चय केला. व्याख्यानें संपवून विवेकानंद हिंदुस्थानांत परतण्याच्या आधले दिवशीं त्या कुमारिकेनें त्यांना भेटावें म्हणून रात्रीं १२ वाजतां ती एकदम विवेकानंदांच्या खोलींत गेली. विवेकानंदांना तिनें जागे केले व आपला मनोदय व्यक्त केला व म्हणाली 'महाराज ! मला आपल्यासारखा सत्पुत्र व्हावासा वाटतो. माझी ही इच्छा आपण पूर्ण करावी." विवेकानंद हंसत म्हणाले 'इतकेच ना ? तर मग मीच तुझा सत्पुत्र आहे असें समज.' असें म्हणून तिच्या पायावर डोकें ठेवले. ती कुमारी ओशाळली, तिला पश्चात्ताप झाला. व तिनें आपला मोह आवरला केवढा हा संयम ! विद्या आणि संस्कृतीची सांगड यांचे हें उत्कृष्ट उदाहरण अगदीं अक्षर शत्रू पण चारित्र्य संपन्न व्यक्तींला जो आज मान मिळतो, त्याचा शतांशहि मान विद्वान पण चारित्र्यहीन मनुष्यास मिळत नाहीं. माझ्या एका 'कलंकित चंद्रास' या काव्यांत मी म्हटले आहे--

शोभे जेंवि, न, वस्त्रभूषण युतां सौभाग्यहीनांगना
विद्वन्मान्य तसा कितीहि असला शोभे, न शीलाविना ।

सहज खोटें बोलणें, दिलेलीं वचनें न पाळणें, व काडीचीही अक्कल

नसतां अधिकारपदारूढ होऊन नुसत्या शीलाच्या गप्पा झोडणें, ही आजच्या बहुसंख्य विद्वानांची भूमिका आहे

गजांत लक्ष्मी सहज चालून आली असतां तिला सत्त्यासाठीं लाथाडणें, खऱ्या प्रसंगीं ध्येयासाठीं आपल्या आईचाही धिःकार करणें व श्रीरामचंद्राला राज्यावर बसविण्यासाठीं वनांत जाणाऱ्या आमच्या भरताचें चारित्र्य पहा, व राज्याकरितां आपल्या भावांना मारून, व वडिलांना कैद करून राज्य-लोभी अशा यवनाधिपतीकडे पहा,

विद्या व संस्कृति यांची फारकत यांचे हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

त्याचप्रमाणें सीता पळवून नेल्यानंतर राम व लक्ष्मण दोघे सीता-शोधार्थ अरण्यांत जातात, रामाला सीतेनें खुणेकरितां रस्त्यांत टाकलेले कांहीं कर्णांतील दागिनें सांपडतात. राम ते उचलून लक्ष्मणास विचारतो " लक्ष्मणा ! हें सीतेचे दागिनें तुझ्या परिचयाचें असतील." तेव्हां लक्ष्मण म्हणतो " ना एक मला ठावें यांतील मला रामा " कारण त्यानें सीतेच्या मुखाकडे एकदांहि पाहिलें नाहीं काय हा संयम ! याच्या उलट अल्लाउद्दीन जेव्हां देवगिरीला गेला तेव्हां पद्मिनीचें सौन्दर्य ऐकून भाळला. पद्मिनी मिळणें शक्य नाहीं असें कळतांच तो कामांध म्हणतो पद्मिनी नाहीं तर नाहीं पण " प्रियसुखकर युवतीचा फोटोच मला दावा " लक्ष्मणाचें चित्र पहा व या नराधमाचे चित्र पहा संस्कृति भिन्नतेकडे बारकाईनें पहा

नंतर रामाला सीतेच्या पायांतील तोरडे सांपडतात. त्यावेळीं लक्ष्मणाला ते राम दाखवितो तेव्हां लक्ष्मण म्हणतो. " ही मात्र मला ठावें सतिचरण नित्य चुरतां " केवढी उच्च ही संस्कृति व आज कॉलेजांत, शाळांत स्त्रियांची टिंगल करणारे आमचे विव्दान विद्यार्थी !

त्याचप्रमाणें लाखो रुपये भरून, जन्मभर आपल्या बांधवांचें रक्त शोषून ' मला निवडून द्या ' असें स्वार्थी प्रलाप काढणारे कांहीं प्रतिष्ठित कुबेरांकडे पहा विव्दत्ता असूनहि चारित्र्यहीनता मात्र जात नाहीं हें उघड सत्य आपणांस कळेल. येनकेन प्रकारेण अशा रीतीने अधिकार प्राप्त होतांच. आपल्याच बांधवांचे काळ होऊन मार्गे लागणाऱ्या विव्दानांच्या किळसवाण्या चारित्र्याकडे पहा. पाषाणासहि पाझर फुटेल व पशुपक्षीहि

अशांचा धि:कार करतील यांत तिळमात्र शंका नाहीं.

संभाजी काय फार शिकला होता ? पण त्यास कपटानें कैद करून आणून जेव्हां औरंगजेब त्यास विचारतो, संभाजी !

" हा जीविताचा अभिमान । यांत नच शंका जाण
होसी जरी मुसलमान । तरीच मान ठेवतो !"

जीवित कोणाला प्रिय नाहीं ? त्यावर संभाजी असें बोलला ' राजा ! जर तूं आपली लावण्यवती कन्या मला देण्यास कबूल असशील तर मी धर्महि सोडीन! ' औरंगजेबाला हीं वाक्यें झोंबली. व पुढें त्यानें संभाजीला छळून छळून ठार केलें.

वीर बैरागी पकडला जातो. त्यास धर्मत्याग करण्याची धमकी दिली जाते पण तो वळत नाहीं. म्हणून भिंत रचून त्यांत त्यांस चिणून मारण्यांत येतें, पण तो धर्म सोडीत नाहीं.

ही आमची संस्कृति. विद्येचा गंध नसतांहि हे विचार व हा धर्माभिमान.

टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठीं आम्हीं वाटेल ते पापकृत्य करतो. याच्या उलट आजचें जिवंत आदर्श उदाहरण द्यावयाचें झाल्यास, आमच्या पूजनीय व विद्वान विनोबा भावे यांचें देतां येईल. विद्वत्ता आणि संस्कृति यांचा सुंदर संगम विनोबांच्या जीवनांत झालेला आढळून येईल.

धाराशिव, १५।२।५६

## मनःसंयमन : ३ :

संसारांत क्षणोक्षणीं संयमनाची आवश्यकता भासते. प्रपंचांत विविध प्रकारच्या वस्तूंची आवश्यकता भासते. शक्ति, पैसा, व विद्या या साधनांची आवश्यकता असते. पण या सर्वांहून अत्यंत आवश्यक म्हणजे मन:संयमन होय.

गीतेंत स्थितप्रज्ञ मनुष्याचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत ' निरपेक्षं, मुनि शांतं, निर्वैरं समदर्शिनं' त्या सर्वांची जननी 'संयमन ' होय.

काम, क्रोध, उव्देग इत्यादि मनांत उत्पन्न होऊं नये, असें वाटत असेल; तर सर्वांत पहिली गोष्ट साध्य करावयाची असेल तर तें संयमन होय.

घोडा काबूत ठेवण्याकरितां जसा लगाम असावा लागतो, हत्ती-सारख्या बलाढ्य प्राण्याला जसें अंकुशानें ताब्यांत आणतां येते त्याचप्रमाणें स्वैर धावणाऱ्या मनोरुपी घोड्यास व उन्मत्त विषयरूपी हत्तीस ताब्यांत आणण्यासाठीं, संयमनाचा लगाम असणें अवश्य आहे.

संयमनानें, संसारांतील निरनिराळ्या आपत्तींत क्षणोक्षणीं होणाऱ्या मनाच्या कोलाहलांतील प्रसंगीं मन कधीहि विचलीत होणार नाहीं.

अेकाद्या यंत्रांत बिघाड झाल्यास, त्यांत बसलेला मळ, वाकडा तिकडा झालेला खिळा, किंवा प्रतिबंधक वस्तु, जोपर्यंत यांत्रिक काढून टाकणार नाहीं, तोपर्यंत यंत्राचें सुरळित व्यापार केव्हांहि चालणें अशक्यच; त्याच-प्रमाणें देहरुपी यंत्रांत झालेला बिघाड, खळबळ, अशांतता, ही सर्व संयमना-नेंच दूर केल्यास मन:शांति मिळेल.

चितासमं नास्ति शरीर शोषणम्

सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता

या उक्तीप्रमाणें चिंताक्रांत मनुष्यास निराशा सारखी भीति दाखवते क्रोधाच्या वणव्यांत सांपडून स्वत:ची राखरांगोळी होतें. कामानें मदोन्मत्त होऊन नानाप्रकारचीं पातकें करतो. अशा अस्थिर स्थितीवर विजय मिळ-वायचा असेल तर मन:स्थैर्याचा अवलंब करावा लागेल. या विकाराच्या तावडींत सांपडल्यास आम्हीं एका क्षणांत इतकी नीच कर्मे करतो कीं त्याचा परिणाम आपणांस जन्मभर भोगावा लागतो विवेकभ्रष्ट माणसें काय काय अनर्थ करतील याचा नेम नाहीं. अविवेकाची सुरा मोठमोठ्या पंडितमन्यां-नांहि गटारांत लोळविते. व अशा प्रकारें अेकेकाळीं जगन्मान्य झालेला पंडित देखील, मनाचा तोल गेल्यामुळें मानवतेला न शोभणारी असमंजस-पणाची कृत्यें करूं लागतो, व जगाच्या उपहासाला व स्वत:च्या अधोगतीला

कारण होतो. स्वार्थाचें भूत मानगुटीवर बसताच, तो मानापमानाची पर्वा न करता कर्तव्य व विचारशून्य बनतो.

'मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो: या गीतेतील सिद्धांताप्रमाणें मन:प्रदेशांत कांटेरी बनहि बनवूं शकतो, व फळाफुलांनीं समृद्ध अशी बागहि तयार करूं शकतो.

मनोरूपी बागेंत, माळ्यांनी प्रेम, सहानुभूति, दया, मानवता, हे वृक्ष लावून संयमनाचें जल घातले तर बाग याच सुंदर फळाफुलांनीं समृद्ध होईल पण जर माळी दुष्टपणाच्या मनोव्यथेनें दूषित झाला असेल, व अहंकार, कुटिलता, व्देष अशीं झाडें लावून स्वच्छंदपणें अनीतीचे जल शिंपील तर वृक्षाला फलेंहि तशीच येतील.

दोष स्वत: आपल्यांत आहेत. आपणच आपल्या सुखदु:खाला कारण आहोत. आपलें कोठें चुकतें याचें जोपर्यन्त आत्मसंशोधन होत नाहीं तोपर्यंत सुखशांति मिळणें दुरापास्तच.

मन:संयमन करून जोपर्यंत आत्मशुद्धि होणार नाहीं. तोपर्यंत सुखाची अपेक्षा करणेंच व्यर्थ. आम्ही आपलें मन भडकूं न देतां दुसऱ्यांशी बोलूं वागूं. व मन ताब्यांत ठेवूनच सर्व व्यवहार करूं, ज्या गोष्टी व्यक्तीला, समाजाला घातक आहेत त्या आम्ही घडूं देणार नाहीं, मनाचा तोल आम्ही कधीहि सोडणार नाहीं, तर संसारांत कटुता केव्हांच निर्माण होणार नाहीं. आपल्याच बंधूंच्या, आपल्या प्रिय पत्नीच्या, आपल्या देश-बांधवांच्या खुनाला जर आपण कारणीभूत झालो तर समजावें आमचा मनाचा तोल गेला.

हितशत्रूंच्या कपटी भाषणास भुलून, आपल्या गुरुजनांनीं हित-बांधवांनी केलेला उपदेश किंवा योग्य मार्गदर्शन यांची पर्वा न करतां, मनाचा तोल न सावरतां केलेली दुष्ट कृत्यें, यामुळें मोठमोठ्या व्यक्तींचा व राष्ट्राचा समूळ नाश आजपर्यंत कसा झाला हें इतिहाससत्य आहे. बाण हातांतून सुटण्यापूर्वीं व शद्ब मुखांतून निघण्यापूर्वी पूर्ण विचार करणें यालाच मन:-संयमन म्हणतांत. व अशा मन:संयमनानीच ज्ञानेश्वर महाराजांसारखे थोर पुरुष अखिल जगाला वंद्य झालें. त्यांनी जगाचा उद्धार केलाच पण स्वत:चाहि जन्म-मरणाचा फेरा चुकविला, याची खरी गुरुकिल्ली म्हणजेच 'मन:संयमन'!

धाराशिव, २८।५।५६

## वाङ्मयचौर्य : ४ :

आज काल पुष्कळशा मासिकांतून व वृत्तपत्रांतून वाङ्मयचौर्याबद्दल ओरडाओरड चालू आहे. कुणी एकादें चरित्र, कविता किंवा भाषांतरित लेख लिहिला कीं त्या लेखकावर वाङ्मयचौर्याचा आरोप केला जातो. पण हा आरोप करणारे देखील अशीच न कळत चोरी करून, स्वतःला साव म्हणवून घेतात.

एकाद्या लेखांतील विचार किंवा काव्य–कल्पना पुष्कळ वेळा सारख्याच असण्याचा संभव असतो. अशी कितीतरी उदाहरणें आम्हीं नित्य पाहतो. विचार किंवा कल्पनासादृश्य असणें म्हणजेच वाङ्मयचौर्य म्हणणें धाडसाचें आहे.

जगांत नवीन असें कांहींच नाहीं. उपमा, दृष्टांत, रुपक हें अलंकार प्रकार जुनेंच आहेत. सुवर्ण एकच, पण त्याचे निरनिराळे अलंकार करून दाखविणें, हें सोनाराचे कसब मानलें जातें. त्याची कल्पकता ज्या मानानें विकास पावली असेल, त्या मानानें तो आपलें अलंकार घडवितो व आपलें कौशल्य दाखवितो. तसेच अलंकार दुसरा सोनार तयार करतो. त्यास ' तूं हा अलंकार चोरून आणला आहेस ' असें कोणी म्हटल्यास तो म्हणणारा मूर्ख ठरेल.

विचाराचें वा कल्पनेचें सादृश्य चौर्य नसून त्या त्या लेखकाची मांडणीच विचारार्ह आहे.

विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, नाटककार वा इतर थोर लेखक यांच्या वाङ्मयांत, वेद–उपनिषदें, शास्त्रें, पुराण यांचेच विचार व कल्पना सांपडतात. पण त्याच कल्पना मांडण्याचें कौशल्य व वर्णनशैली ही स्वतंत्रच असतें.

एके ठिकाणीं म्हटलें आहे, " व्यासोच्छिष्ठं जगत् सर्वं." याचा अर्थ तरी हाच आहे.

विचार, कल्पना जुन्याच पण त्यांची कौशल्यपूर्ण मांडणी, जिला शैली म्हणतात, करून वाङ्मयमंदिर भूषित करणें हेंच त्याचें कौशल्य होय.

ज्ञानेश्वरादि संत, यांचें वाङमय बालांकरितां, प्रौढांकरितां, स्त्रियांकरितां व विचारवंतांकरितां ज्या निरनिराळ्या पुस्तकांतून लिहिले गेले त्याचा मतितार्थ एकच पण भाषाशैली मात्र भिन्न,

भाषांतरित वाङमयांत विचार सादृश्य असलें तरी मांडणी व भाषेचा डौल हा निरनिराळा असतो. वाङमयाचें मथळे, पुस्तकांची नांवें बदलून तेच तेच विचार हेंच चहूंकडे दिसते.

दारूबद्दल जे विचार गडकरी मांडतात, तेच शुक्राचार्यांच्या तोंडूनहि परिणामकारक भाषेंत इतर नाटककार वापरतात. सिनेमा–चित्रपटाकडे पाहिले तर विचारूच नका. फक्त पात्रांची नांवे बदलून एकच विचारसरणीची कितीतरी उदाहरणें देतां येतील. 'श्यामची आई', 'आईचें हृदय', 'विद्याहरण', 'एकच प्याला' असे कितीतरी पेले निरनिराळे रंग घालून, प्रेक्षकांस पाजविले जातात.

यांत कोणाही लेखकाला मी दोष देत नसून त्यांची प्रतिभा, त्यांचें श्रेष्ठत्व कोणीही अमान्य करूं शकत नाहीं. पण जे विचार, ज्या कल्पना मांडल्या त्या परिणामकारक भाषेंत मांडल्या गेल्यामुळें त्या परिणामकारी झाल्या किंवा नाहीं एवढेंच पहायचें. शब्दचित्राच्या चित्रीकरणालाच महत्त्व आहे म्हणून आपली स्वतःची शेखी मिरविण्यासाठीं किंवा मीच काय तो कल्पक, माझेंच वाङमय स्वतंत्र, अशी घमेंड कोणी करूं नये.

वाङमयचौर्य सर्वच करितात, पण कांहीं कुशल शर्विलक असतात व कांहीं अगदींच साधे चोर असतात एवढेंच !

(धाराशिव १०।१२।५६)

# मानवाचे प्रकार : ५ :

समाजव्यवस्था व्यवस्थित राहून मानवसमाजाचे सर्व व्यवहार चांगले चालावे व आपल्या निर्वाहाचीं साधनें धर्मपूर्वक सुलभतेनें प्राप्त व्हावीं यासाठीं आमच्या शास्त्रांनीं वर्णव्यवस्था केली. पण ती आतां समूळ नष्ट झाल्यामुळें, समाजांत संघर्ष उत्पन्न झाला व म्हणून मानवी जीवनांत एकच

हलकल्लोळ माजला आहे. सर्व मानवजात दुःखसागरांत गटांगळ्या खात आहे.

ज्याला जो वाटेल तो व्यवसाय करूं लागला व त्या त्या धंद्यांत प्राविण्य मिळवितां न आल्यानें, नीट पोटभर अन्न कोणासही मिळेनासें झालें.

अनुवंशिक मूळ धंदे करणाऱ्यांनीं अध्ययन करून नोकरी वृत्ति पत्करली. असंख्य लोक नोकरीच्याच मागें लागल्यामुळें कुणास नोकऱ्याहि मिळेनात. म्हणून 'इतो भ्रष्ट: ततो भ्रष्ट:' या न्यायानें सर्वांनाच उपाशी मरण्याची पाळी आली. त्यामुळें संघर्ष वाढूं लागला. परस्परांत मत्सर, द्वेषभावना वाढूं लागल्या व जिकडेतिकडे अशांतता माजली.

आम्ही आमचीं धर्मतत्वें गुंडाळून ठेवून नश्वर सुखाच्या मागें लागलों व मानव जन्म कशासाठीं आहे हें विसरून देहसौख्याच्या मागें लागलों. तें मिळविण्याकरितां आम्ही पशूवर मात केली व मानवाचें अंतिम साध्य मोक्ष तें पार विसरून गेलों व भौतिक सुखाकडे वळलों.

आहार, व्यवहार पशूलाही लागू आहेत, त्याप्रमाणें मानवालाही. पण मानवाला ईश्वरानें विवेकबुद्धि दिली आहे. त्यामुळें तो सारासार विचार व सद्व्यवहार करूं शकतो, पण त्याच बुद्धीचा तो दुरुपयोग करून, भोगविलास तृप्त करण्यासाठी अनन्वित कृत्यें करूं लागला, तर त्यास मानव म्हणावें कां दानव ? आपल्या भोगविलास तृप्तीसाठीं, जो धर्माचा विचार करीत नाहीं, त्यास दुष्ट वा दैत्य मानवच म्हणावें लागेल. हा मानवाचा एक प्रकार. या दुष्ट मानवानें समाजावर कशी आपत्ति आणली आहे तिकडे वळूं या.

भारतीयांचीं मनें कलुषित करून सर्व मानवसमाजाला अधोगतीला नेले व आम्हीही आमचे वेद, शास्त्र व त्यांतील सुंदर विचारांना मूठमाती देऊन पाश्चात्यांच्या, भौतिक, भपकेदार सुधारणांच्या मागें लागून आमचा सर्वस्वी नाश करून घेतला.

पाश्चात्य पुरुषांच्या आसुरी व समाजभक्षक तत्त्वांकडे वळूं. त्यांचीं नांवें, डार्विन, पावेलन, फ्राईड व अलीकडील मार्क्स.

डार्विननें विकासवाद काढला. त्यांत त्यानें बळी तो कान पिळी, म्हणजे जो सर्वांत बलिष्ठ असेल त्यालाच जिवंत राहण्याचा अधिकार, इत-

रांना नाहीं. त्यामुळें धर्मावर अधर्माचा विजय झाला व त्यांत आमचा भारत वेडा झाला. धर्माधर्माचा विचार सुटून मनुष्य मनुष्याचा खून करूं लागला.

राष्ट्राराष्ट्रांत द्वंद्व व मारामाऱ्या सुरूं झाल्या व आपण स्वत: बलिष्ठ बनून दुर्बलांना पायाखालीं तुडविलें. या वादानें, दया, सहानुभूति व व मानवतेचा खून केला व सुष्ट मानवाला दुष्ट मानव बनविलें.

यापासून सुटक व्हावी असें वाटत असल्यास व जगांत चिरशांति निर्माण व्हावी असें वाटत असल्यास दैत्य मानवाच्या जागीं देव मानव कृतीचीन स्थापना करावी लागेल. डार्विनच्या पुष्ट्यर्थ, नाझिझम, फॅसीझम, व बोल्शेविझम् निघाले. त्यामुळें सर्व प्रजा नास्तिक बनली. दुसऱ्याच्या बलिदानांतच आपला लाभ आहे असा सिद्धांत सवसंमत झाला.

याप्रमाणें भोगलालसा तृप्त्यर्थ ऐश्वर्यप्राप्त्यर्थ जीं जी पशूंना लाजविणारीं साधनें करतां येतील तीं तीं अमलांत आणून भोगतृप्तीकरितां मानव दैत्य तयार झाला.

आमच्या धर्मांत कोणताही सिद्धांत, धर्माच्या कसोटीवर कसून पाहाण्याची प्रथा आहे व तोच स्वीकारला जातो. आमच्या धर्माची व्याख्याच इतकी सुंदर आहे कीं, त्यावर आधारलेले सिद्धांत विनाशाला मुळींच कारण होणार नाहींत.

ती व्याख्या अशी—

**' यतोऽभ्युदयनि:श्रेयससिद्धि: स धर्म: '**

त्यामुळें इहलोकीं सुख व परलोकीं मोक्ष मिळतो तो धर्म.

**जीवनाकरितां अभ्युदय हवा, पण नि:श्रेयसाचें बलिदान करून नव्हे** आमचें जीवन खाण्याकरितां नसून आम्हीं जिवंत राहावें इतकेंच खावें व भोगसाधन करावें. आम्हीं जगावें व दुसऱ्यास जगूं द्यावें हे आमचे धर्मकर्तव्य होय. आमचा वैदिक धर्म त्यागप्रधान व मानवतेचा एक स्वतंत्र प्रकार आहे.

पाश्चात्यांचा धर्म भोगप्रधान आहे व तो मानवाचा दुसरा प्रकार म्हणजेच दुष्टमानव होय. भोगाची तृप्ति कधीच होत नाही. म्हणून मानव

दैत्य बनून आपसात खून करतात व कोणीहि संतुष्ट होत नाहीं.जिकडे तिकडे दैन्य, खून, मारामाऱ्या करणारे मानव होत. जनावरे सुद्धां यथेच्छ खाऊन माजतात, तसेंच जर मानव करूं लागला तर त्यास पहिल्या प्रकारच्या मानव कोटींतच गोवावें लागेल.

जोपर्यंत जीवित आहे तोपर्यंत खावें प्यावें, चैन करावी " ऋणं कृत्वा घृतं पिबेत् " ए वढेच ज्याचे जीवनाचें ध्येय आहे तो मानव दैत्य होय. मी मोठा सर्वज्ञ, मी रुपवान् मी वाटेल ते करूं शकतो मी सत्ताधीश असल्यामुळे माझ्या वाटेल त्या मूर्खपणाच्या आज्ञा पाळल्याच पाहिजेच मी करीन ती पूर्व दिशा अशा वृत्तीच्या माणसालाच दैत्य मानव म्हणतात.

याच्या उलट, काम, क्रोध, भोगलालसा यांचा त्याग करून वेदशास्त्राच्या नियमानुसार वागून ' सर्वेऽपि सुखिनः संतु, सर्वे संतु निरामयाः वसुधैव कुटुंबकम् अशा उच्च तत्वानुसार वागणारे ते दुसऱ्या प्रकारचे मानव होत. सदाचारसंपन्न जीवन व्यतीत करुन आपले ऐहिक व पारमार्थिक जो करील तो मानवाचा दुसरा प्रकार यालाच देवमानव म्हणतां येईल.

# साहित्य आणि संस्कृति : ६ :

साहित्य आणि संस्कृति यांची संगती लावतांना प्रथम साहित्य म्हणजे काय याचा विचार करावा लागेल. साहित्य म्हणजे समाज स्वरूप पाहण्याचा एक आरसा. समाजाचें स्वरूप जसें असेल तसेच त्याचे साहित्य प्रतिबिंबित होईल. ज्या देशाचें वाङ्मय उच्च विचारांनी परिप्लुत असेल, सदाचारयुक्त व शीलसंपन्न असेल तद्वतच त्या देशाची संस्कृती असली पाहिजे. समाजाची वृद्धि क्षय, उन्नति अधोगति,संपन्नता व विपत्ती याचें यथार्थ ज्ञान व्हावयाची गुरुकिल्ली म्हणजेच साहित्य. संस्कृतीच्या सर्वोत्तम प्रचाराचें साधन साहित्य होय. पौर्वात्य व पाश्चिमात्य यांच्या साहित्य ध्येयांत सुतराम फरक आहे.

आमचे साहित्य अध्यात्मप्रधान तर पाश्चात्यांचें भौतिक प्रधान. सामाजिक भावना व विचार जसें असतील तशीच त्यांची साहित्य साधना.

भारतीय समाज, जीवन कलहाच्या संघर्षाला अलिप्त ठेवून, शाश्वत सुखालाच प्राधान्य देतो, म्हणून आमचे वाङ्मय संकटमय परिस्थितींतून दिव्य करून शेवटीं आनंद सुखाचा लाभ दाखवितें. कारण परमेश्वर हा सच्चिदानंद रूप आहे. आमच्या गद्य व पद्य साहित्यांत, मग ते नाटक असो वा काव्य असो त्यांतील मुख्य आत्मा रस होय. रीति, गुण वा अलंकार ही काव्यांगें असली तरी रसविवेचन हाच प्रतिपाद्य विषय होय. निवृत्ति व प्रवृत्ति यांतून निवृत्ति मार्गांचा शेवटीं अवलब करावा असा जरी आमच्या साहित्याचा दृष्टिकोन असला, तरी प्रवृत्तीपर गृहस्थाश्रमांतून, निवृत्तिमार्ग शोधून काढण्याचा कटाक्ष आमच्या सस्कृतीतून व साहित्यांतून दिसून येतो.

आमचें रामायण, महाभारत हीं काव्यें वा श्रीमद् भगवतगीता ही सर्व गृहस्थाश्रम–गोलाच्या भोंवतीच फिरणारी आहेत. पुत्रांनी पित्राज्ञा, राजांनी प्रजापालन, पत्नीनें पातिव्रत्य, बधुप्रीति, सेवाधर्म, यांचें उत्कृष्ट चित्र आमच्या रामायणांत श्री रामचंद्राच्या १४ वर्षे वनवास गमनावरून, सीतेने रामाबरोबर काढलेल्या वनवास यातनेवरून, वनांत रामाची अखंड निःसीम सेवा करण्याऱ्या लक्ष्मणावरून, गजांत लक्ष्मी लोळण घेत असतां तिचा धिःकार करून, माझ्या रामरायानेच राज्य करावें हा हट्ट धरून बसणाऱ्या भरताच्या दिव्य विचारांवरून, वाटेल त्या आपत्तीला तोंड देऊन मारुतिरायानें आजन्म केलेल्या रामसेवेवरून दिसून येते.

व्यास, वाल्मिका, कालिदास, भवभूति, भारवी, भास, बाण, दण्डी, तसेच ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ आदि लेखकांच्या मनोहर काव्यांमुळें ते जितके मान्यतेला पावले, तितकेंच भारतीय संस्कृतीचें शब्दचित्र दाखवून त्यांनी भारतीयांच्याच नव्हे तर इतर परकीयांच्याहि हृदयसागरांत बुडी मारली व सर्वांच्या हृदयसागराला भरती आणली. समाजांतील सुखदुःखानीं आमच्या साहित्य श्रेष्ठांचें हृदय हळहळतें, दीन दुबळ्यांच्या कष्टमय जीविताकडें पाहून त्यांचेही डोळे अश्रूंनी ओले होतात. व त्याचें प्रतिबिंब त्यांच्या साहित्यांत लागलीच उमटते.

आमचें साहित्य आशावादी आहे. नैराश्यवाद आम्हाला मान्य नाहीं. ही कर्मभूमि आहे म्हणून सदैव कर्म करीत राहिलेच पाहिजे पण ' मा फलेषु

कदाचन ' यावर आमच्या साहित्याचा कटाक्ष आहे व हीच खरी संस्कृति आहे.

" सर्वेऽपि सुखिनः संतु । सर्वे संतु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यंतु । माकश्चित दुःखमाप्नुयात् ॥

ही आमची उच्च भावनायुक्त संस्कृति आहे, व त्याचें कारण म्हणजे आमचें उच्चतम साहित्य होय. आमच्या अशा या उच्च साहित्याची कदर आमच्यापेक्षां परकीय देशांत कितीतरी पटीनें होत आहे, याचें परवाचें उदाहरण म्हणजे रशियांत आमच्या संस्कृत काव्य-नाटकांची भाषांतरें रशियन भाषेंत होत आहेत.

कविकुलगुरु कालिदासाच्या रघुवंश, मेघदूत, ऋतुसंहार, शाकुंतल या उत्कृष्ट ग्रंथांचें भाषांतर करून सग्रही ठेवावें असें परकीयांस वाटते व आम्ही मात्र त्यांची उपेक्षा करून आमचें औदासिन्य जगांस दाखवितो. यापेक्षां दैवदुर्विलास तो कोणता ? साहित्य आणि संस्कृति यांचा जर अन्योन्य संबंध आहे, तर आम्ही आमची संस्कृति टिकविण्याकरितां आमच्या उज्वल साहित्याकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आतां कोठे संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना झाली आहे. हे सुचिन्हच असले तरी हे मुंगीच्या पावलांनीच होत आहे असेच म्हणणें भाग आहे.

धाराशिव, २०।९।५७

# बाणभट्ट : ७ :

बाणभट्टांचे पूर्वज सोन नदीकांठीं प्रीतिकूट नांवाच्या एका शहरांत रहात होते. हे स्थळ बिहार प्रांताच्या पश्चिमेला असावें. बाणाचे घराणें पूर्वीपासूनच विद्या व धर्मासाठी प्रसिद्ध होतें.

त्याचा जन्म प्रसिद्ध वात्स्यायन वंशांत झाला. बाणाच्या एका प्राचीन पूर्वजांचें नांव ' कुबेर ' होते. त्याच्या घरीं वेदाध्ययनाकरितां बरेचसें विद्यार्थी येत. त्यांच्या घरी पाळलेल्या मैना व पोपट वेदाध्ययनामध्यें इतक्या

परिपूर्ण होत्या, कीं यजुर्वेद सामवेद म्हणणारे विद्यार्थीहि भीतभीतच वेद पठण करीत. कारण कांहीं चूक दिसली कीं मैना पोपट त्यांना मध्येंच टोकीत होतें. कुबेराला चार मुलगे, सर्वांत लहान पाशुपत, त्यापासून अर्थपति अर्थपतिपासून चित्रभानु, चित्रभानुहि फार विव्दान होता व त्याचा कीर्ति-परिमल चोहोंकडे दरवळला होता.

याच चित्रभानूच्या पोटीं बाणभट्ट जन्मला. लहानपणींच बाणाचे आईबाप निवर्तले, व बाण अनाथ झाला.

बाणभट्ट गर्भश्रीमंत होता. घरांत कोणीं देखरेख करणारे नसल्या-मुळें बाण उनाड बनला. त्याला वाईट संवयी जडल्या. त्याला देशाटनाचें फार वेड होतें. निरनिराळ्या गांवी जाऊन, तो परत घरीं आला. पण देशा-टनानें त्याला बरेचसे ज्ञान व उदारपणादि गुण प्राप्त झाले. लोक मात्र त्याचा उपहास करूं लागले. एके दिवशीं बाणाकडे हर्षाच्या चुलत भावानें ( कृष्णानें ) एक दूत पाठविला. दूतानें बाणास एक पत्र दिलें. पत्रांत लिहिले होतें ' हर्षराजाजवळ कित्येकांनीं तुझी कांहीं चुगली सांगितली, म्हणून राजा हर्ष तुझ्यावर रागावला आहे, म्हणून तूं लवकर त्याच्या भेटीला जा. ' त्याप्रमाणे बाण हर्षाच्या भेटीला गेला. बाणाला पहाताच राजा हर्ष पहिल्यानें त्यावर रागावला व त्याची निर्भर्त्सना केली. पण त्याची विव्दत्ता पाहून प्रसन्न झाला व त्यास आपल्या पदरीं ठेवलें. बरीच वर्षे बाणाने हर्षराजाचे सभागृह मंडित केलें व नंतर कांही वर्षांनीं घरीं परत आला. लोकांच्या आग्रहावरून त्यानें हर्षचरित्र लिहिलें.

यावरून हे स्पष्ट होते कीं, बालपणीं कुसंगतिमुळें बाण बिघडला होता. तरी त्यानीं आपल्या विव्दत्तेनें जगांत आपली कीर्ति अजरामर करून ठेविली. ' लक्ष्मी आणि सरस्वती यांचें कधींच सख्य नसते ' या सिद्धांताला मात्र बाण अपवाद होता, तो गर्भश्रीमंत तर होताच, पण श्रीहर्षाच्या कृपेनें तो अधिक संपत्तिमान झाला. आपल्या ऐश्वर्याचा उल्लेख त्यांनीं हर्ष चरित्रांतून पहिल्या उच्छ्वासांत केला आहे. पण अपत्याविषयीं मात्र तो मुग्ध होता, तरी पण देहांत समयी त्याला एकच चिंता जाळीत होती तीं म्हणजे त्यांनीं लिहिलेली ' कादंबरी ' अपूर्ण स्थितीतच होती. ती पूर्ण

करावी या उळमळीनें त्यानें आपल्या मुलांस बोलाविले, व त्यांच्या साहित्यिक ज्ञानाची व प्रतिभेची परीक्षा करण्यासाठीं, ' पुढें एक शुष्क लाकूड पडलें आहे, ' याचे संस्कृत करण्यास सांगितले. त्याच्या एका मुलानें त्याचा अनुवाद ' शुष्कं काष्ठं तिष्ठत्यग्रे ' असा केला. तो कटुतापूर्ण वाटला म्हणून त्यानें दुसऱ्या मुलास सांगितले. त्यानें मात्र ' नीरसतरुरिह विलसति पुरतः ' असा सरस व कर्णमधूर अनुवाद करून आपल्या मनोहर रचनाशैलीचे कौशल्य दाखविले.

त्या दुसऱ्या मुलाची प्रतिभा पाहून बाणभट्ट प्रसन्न झाला व त्यानी त्या मुलास आपली अपूर्ण कादंबरी पूर्ण करण्यास सांगितली. पित्याच्या देहावसानानंतर या पितृभक्त मुलानें हीं कादंबरी पूर्ण केली हाच कादंबरींचा उत्तरार्ध होय.

उत्तरार्धाच्या आरंभीं बाणाचा मुलगा लिहितो—

याते दिवं पितरि तव्दचसैव सार्धं
विच्छेदमाप भुवि वस्तु कथा प्रबंधः
दुःखं सतां तदसमाप्तिकृतं विलोक्य
प्रारब्ध एव च मया, न कवित्वदर्पात् ।

' वडील स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांचा हा कथा प्रबंधहि इहलोक सोडून गेला, पण त्यांच्या वचनानुसार सज्जनांच्या सुखासाठी मीं हा प्रबंध आरंभिला. कवित्वाच्या गर्वानें नव्हें. तर हा माझ्या पित्याचा अनुग्रह म्हणूनच कादंबरीचा (दारु) स्वाद घेऊनहि मी न भडकतां पित्याची आज्ञा पूर्ण करूं शकलो. मला हीच भीति आहे कीं माझें हें काव्य रसभंग तर करणार नाहीं व त्यामुळें विद्वानांच्या अवहेलनेस तर पात्र होणार नाहीं नां ?

कादंबरी रसभरेण समस्त एव
मत्तो न किंचिदपि चेतवतो जनोऽयम
भितोऽस्मि यन्नरस वर्णविवर्जितेन
तच्छेद मात्म वचसाप्यनु संदधानः

बाणाचे अस्तित्त्व त्या काळच्या विद्वान् पंडितांमध्ये व संस्कृत साहित्यामध्यें फार महत्त्वाचे आहे.

'सूर्यशतक' चा कर्ता मयूरकवि या कालांतच होता. मयूर मानतुंश हे बाणाचे समकालीन असून श्रीहर्षाच्या पदरीं होते. संस्कृतच्या ऐतिहासिक कालगणनेसाठीं बाणाचें अस्तित्वाचा फार उपयोग आहे. बाणकवि सातव्या शतकांतील कवि होता हें स्पष्ट होतें.

## ग्रंथ संपत्ति

बाणभट्टाच्या लेखणींतून अनेक ग्रंथरत्नें बाहेर पडलीं, ज्यांतून कितीतरी साहित्य जवाहीर म्हणून चमकलीं. त्यानी पद्य व गद्य दोन्हीं काव्यें लिहिली पण प्रसिद्ध गद्यकाव्य लिहिण्यांत याचा हातखंडा होता. त्या कालीं गद्यकाव्य म्हणजे समासांची रेलचेल. 'ओजः समास भूयस्त्वमेतत् गद्यस्य जीवितम्'

बाणाच्या 'हर्ष चरित्र' या काव्यांत आठ उच्छ्वास आहेत. हें काव्य शुद्ध साहित्यिक शैलीनें युक्त असें एक प्रबंध काव्य आहे. प्रख्यात राजा श्री हर्ष याचे हें चरित्र या काव्यास आधारभूत आहे. त्यांतूनहि शद्बालंकार व अर्थालंकार या योगानें त्यास विशेष शोभा आली आहे.

यांत वीररसाला जरी प्राधान्य दिलें आहे, तरी करुणरस देखील सुंदर साधला आहे. मरणासन्न प्रभाकर वर्धनाचें करुण चित्र फार उत्कृष्ट रंगविलें आहे.

पांचव्या उच्छ्वासांत सती वेषांत यशोवतीच्या विलापाचे व राज्यवर्धनाच्या शोकाचें शद्बचित्र वाचताच पाषाणालाहि पाझर फुटेल इतकें सुंदर वर्णन केलें आहे.

सातव्या उच्छ्वासांत सायंकाळ, वन ग्राम, त्याप्रमाणें तेथील घरांची वर्णनें फारच सरस उतरलीं आहेत.

हर्षाच्या कालांतील सांस्कृतिक उन्नतियुगाचें साक्षात् दर्शन म्हणजेच बाणाचें हर्ष चरित्र. त्यावरून त्याकालाचे आचार, विचार, वेषभूषा, सेनेचे प्रकार व प्रमाण वगैरेचें चित्र अनुमानता येते. विवाहाचे प्रसंगीं शिल्पकारांनी केलेली भूषणें, घरांची रंगरंगोटी, वस्त्रालकार या सर्वांची माहिती या दृष्टीनें हर्षचरित्राचे मूल्य-मापन ऐतिहासिकांना फार महत्वाचे आहे याचे दुसरे गद्यकाव्य म्हणजे कादबरी. यांतील कथाभाग व प्रकृति वर्णन अत्यंत सुंदर व जिवंत आहे. संस्कृतमधील कांहीं महाकवि असें आहेत.

कीं कांहींना हळुवारपणा व कांहींना रोमांचकारी स्वरूप ही वर्णनें साधतात पण बाणाच्या लेखणींत हें उभय प्रकारहि सांपडतात. ऋतुवर्णन, प्रभात तसेच संध्यावर्णन, अंधःकार तसेच चंद्रोदय वगैरेंची वर्णनें यथार्थ व योग्य शब्दांत बाणाच्या काव्यांत दिसतात. अच्छोद सरोसराचें वर्णन म्हणजे कवीच्या निरीक्षण शक्तीचा उत्कृष्ट परिपाक आहे.

अर्थाचें नाविन्य, स्वभावोक्ति, श्लेष, रसस्फुटता व माधुर्य हें काव्याचें सर्व गुण बाणाच्या कृतींत आहेत ‘ रसनोपमा ’ चे खालील उदाहरण पहा.

‘ क्रमेण च कृतं मे वपुषि, वसंत इव मधुमासेन,
मधुमास इव नवपल्लवेन, नवपल्ल इव कुसुमेन,
कुसुम इव मधुकरेण, मधुकर इव मदेन नव यौवनेन प्रदं ॥

खरें प्रेम समाज व कुल यांची मर्यादा उल्लंघन करीत नाहीं. काळ त्याला फिरवूं शकत नाहीं शरीराचें परिवर्तन झाले तरी दृढ व खरें प्रेम यांत बदल होणें शक्य नाहीं इत्यादि सिद्धांत बाणाच्या विविध पात्रांच्या स्वभावांत उमटन दिसतात.

शुकनासाने चंद्रापीडास केलेला उपदेश यांत नीति व काव्य यांचा समन्वय फारच सुंदर साधला आहे.

“ लक्ष्मी, तृष्णारुपी विष लतेला वाढविणारी जलधारा आहे. इंद्रियरूपी हरिणांना लोभविणारा व्याध आहे अविनयाची उंचध्वजा आहे.” हीं रूपकें हृदयंगम आहेत. कवीचे विचार उदात्त व उच्च आहेत.

विषयानुसार कवी आपली शैली बदलतो. कधीं प्रदीर्घ समास तर कधीं अगदीं तोटकीं वाक्यें, दोन्हीहि प्रसंगानुसार कवि वापरतो. बाणाच्या काव्यांत इतका प्रभाव व प्रवाह आहे कीं कोणी त्याचे अनुकरण करील तर तें त्यास साधणार नाहीं.‘ बाणाची शैली पांचाली रीतीचा अविष्कार होय.’ असें राजशेखर म्हणतात. बाणाच्या वर्णनांत स्निग्धता, रुचिरता सर्व कांहीं आहे. शब्दावर त्याचे प्रभुत्व आहे, वर्णनांत प्रवाह आहे, भाषा ओघवती असून त्यांत प्रमाद व माधुर्य आहे. एका विख्यात साहित्यिकानीं बाणाचे वर्णन असें केले आहे ‘ रुचिरस्वर वर्णपदा, रसभाववती जगन्मनोहरति सा किं तरुणी ? नहि नहि वाणी बाणस्य मधुरशीलस्य ’

बाण कवीच्या काव्य गुणांची मोजदाद करणें या लहानशा लेखांत शक्य नसल्यानें स्थूलमानानें त्याची व त्याच्या कलाकृतीची सारांश रूपानें माहिती या लेखांत दिली आहे एवढेंच.

(संस्कृत काव्याच्या आधारें)

धाराशिव, २१।१२।५७

ॐ ॐ ॐ

# कालिदासाचे काव्यसौन्दर्य व रशियाची गुणग्राहकता : ८ :

कवि राजशेखर एके ठिकाणी म्हणतात, " डोळयासमोर असणाऱ्या कवीचें काव्य, घरोब्याच्या ओळखीच्या वैद्याचे कसब आणि कुलीन स्त्रीचें रूप ही लोकांना क्वचितच आवडतात." या त्यांच्या म्हणण्यांत थोडासा बदल करून असें म्हणतां येईल कीं, डोळयासमोर असणाऱ्या कवीचें ऐवजी आमच्या देशांत उत्पन्न झालेल्या कवींचे, लेखकांचें व वाङमयाचे गुण इतर घेतात व ती अमोल रत्नें म्हणून त्यांची जपणूक करतात. तर आम्ही मात्र त्यांना केरपोतेरें समजून कोपऱ्यांत फेकून देतो. अशी कितीतरी रत्नें आमच्या उपेक्षेमुळें चमकण्याची पात्रता असूनही, काळाच्या कराल दाढेंत चिरडली गेली व न चमकतां निघून गेली.

पण गुणग्रहकता हा मोठा गुण ज्या राष्ट्रांजवळ आहे तीं राष्ट्रें मात्र बेमकी शिकार करून आमच्या गुणरत्नांचीं पारख करितात. ' बालादपि सुभाषितं ग्राह्यं ' हे संस्कृत सुभाषित ते लागू करून घेतात व गुण मग ते कोणाचेंहि असोत तेवढे घेतात.

याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजेच रशियानें कविकुलगुरु कालिदासाच्या चार उत्कृष्ट ग्रंथांचें भाषांतर आपल्या भाषेंत केलें आहे व यापुढेंही भारतांतील प्रतिभासंपन्न वाङमयाचीं भाषांतरें करण्याचा त्यांनीं ठाम निश्चय केला आहे. वेदांची उत्पत्ती भारतांत व भाषांतरें मात्र पाश्चात्य देशांत

अशी कितीतरी दिव्य वाङमयरत्नें परकीयांनीं येथून नेलीं व आपल्या हृदय-संपुटांत सांठविलीं.

आम्ही जन्मभर वादविवाद पूर्वपक्ष, उत्तरपक्ष करून " वादे वादे जायते तत्त्वबोधः" हे सोडून आपसांतील द्वेष, मत्सर यांचीच वाढ केली आहे 'वोद्धारो मत्सर ग्रस्ताः' हें वचन आम्हा भारतीयांस तंतोतंत लागू पडते व त्यामुळेंच आमची दिवसेंदिवस प्रत्येक क्षेत्रांत अधोगतीच होत आहे. राम वनवासांत असतां गजान्त लक्ष्मी लाथाडून जेव्हां भरत रामाच्या भेटीकरितां अरण्यांत येतो त्यावेळीं रामाकडे पाहून भरताला एकदम रडें कोसळतें व त्या प्रसंगीं तो रामाला जे शब्द सांगतो ते विचार करण्यासारखे आहेत. भरत म्हणतो,—

" अगणित भरजरि अमोलवस्त्रें ज्याच्या अंगावरीं
तोचि हा कृष्णाजिन पांघरी
नानाविध सौगंधित पुष्पें असतीं ज्याच्या शिरीं
वाहे जटाभार निजशिरीं
देहास सुवासिक चंदन जो लावितो
तो आज कपाळीं विभूतीस फासतो
या द ास्तव आली विपत्ति श्रीरामा तुजवरी
झालो रिपु मी घरच्या घरीं " (भरतभेट)

हे भरताचे कळवळ्याचे उद्‌गार ऐकून भरतासारखी निःस्पृही, मत्सररहित, चारित्र्यसंपन्न व्यक्ति भारतांत कितीशा सांपडतील ! भारताला जी उणीव आहे ती याच गुणांची ! या सद्‌गुणांच्या अभावामुळें आमच्या येथील वाङमयाची, मग तें जुनें असो वा नवें, आम्ही कदर करीत नाहीं.

परकीय मात्र आपल्या या दुष्टतेचा व भेदाभेदाचा पुरापुरा फायदा घेऊन आमचीं अमोल रत्नें येथून घेऊन जात आहेत. त्यांचा विद्याव्यासंग व गुणग्राहकता इतकी वर्णनीय आहे कीं, रशियांत 'मॉस्को' येथें जी अवाढव्य लायब्ररी आहे तिची लांबी कैक मैल भरेल. दररोज सर्व देशांतून पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे साहित्य इतकें येतें कीं, त्याला तोड नाहीं व तें चिरकाल टिकेल अशा व्यवस्थेनें ठेवलेलें आहे. सर्व भाषांतून वाङमयसंग्रह

केला जातो. हेंच त्यांच्या गुणग्राहकतेचें द्योतक होय. नाहीं म्हणायला आमच्या येथें (संस्था तर नव्हेच) पण वाङमय परिशीलन करणारे जे कांहीं बोटावर मोजण्याइतके लोक आहेत, त्यांत कै. डॉ. आंबेडकर यांचा क्रमांक पहिला लागेल असें वाटतें. त्यांच्या व्यक्तिशः लायब्ररींत सर्व जगांतील प्रमुख व अमूल्य ग्रंथ आहेत. पण एकदोन व्यक्तींनीं कितीहि परिश्रम करून ग्रंथसंपत्ति मिळविली तरी 'दर्यामें खसखस' असेंच म्हणावें लागेल. आम्ही फक्त आमच्या विद्वान्, प्रतिभासंपन्न व्यक्तींची हेळसांड करून आपल्या अवनतावस्थेला कारणीभूत होत आहोत.

आपण मोठमोठ्या कविश्रेष्ठांची कशी उपेक्षा केली व अद्याप करीत करीत आहोंत यावर कै. शि. म. परांजपे यांचे "भास कवि' यावर काढलेले उद्‌गार वाचण्यासारखे आहेत.

सात्विक संतापानें काळकर्ते याचें माथे भणाणून गेल्यामुळें ते जळजळीत अग्निकणच बाहेर ओकीत आहेत असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. अजूनहि आमच्या डोक्यांत प्रकाश पडत नाही. नाहीं म्हणायला आता कोठें तरी 'कुरुक्षेत्र' काशी वगैरे ठिकाणीं संस्कृत विद्यालय केन्द्रे उघडूं लागली आहेत. ही समाधानाची गोष्ट आहे. हे सुचिन्ह असले तरी हा प्रयत्न अगदीच मंद पावलांनी होत आहे असे म्हणणें भाग आहे. या ठिकाणीं 'अकरणात् मंद करणं श्रेयः' हे सुभाषित पुढे ठेवून समाधान मानल्याशिवाय काय गत्यंतर आहे ?

पाश्चात्य राष्ट्रांत संस्कृत ही भाषा शिकविली जाते व जन्मभूमि असलेली संस्कृत भाषेचीं इथें मात्र हेळसांड व अपमान किती दिवस चालणार ? 'प्रसादचिन्हानि पुरःफलानि' असें म्हणून समाधान मानून घ्यावें तरी, बदलत्या काळाकडे दृष्टि देतां भारत मातृभाषेवर प्रसन्न होऊन प्रसाद हातीं व मुखीं पडेपर्यन्त, आशापाशांत अडकून पडण्यापलीकडें आमच्यां हातीं दुसरे काय आहे ?

या निमित्तानें रशियन लोकांना कालिदासाच्या काव्यात विशेश कांही वाटल्याशिवाय तें भाषांतरे करण्यास प्रवृत्त झालें नाहीत हे निश्चित.

म्हणून जातां जाता येथें कालिदासाच्या काव्यवैशिष्ठ्याचें दिग्दर्शन करणें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटते.

रशियांत तूर्त कालिदासाच्या ज्या ग्रंथाचें भाषांतर करण्यांत आले आहे त्यांत (१) रघुवंश (२) शाकुन्तल (३) ऋतुसंहार (४) मेघदूत हे ग्रंथ आहेत. तेवढ्यांच्याच विचार प्रस्तुत लेखात ओझरता करूं या–

कालिदास संस्कृतचे जगन्मान कवि आहेत. काव्य, नाटक, गीतीकाव्य कोणतेहि वाचा. कालिदासाची प्रतिभा अवर्णनीय आहे,

(१) साधारणपणें कालिदासाचें ' ऋतुसंहार ' हे पहिले पण छोटेसें ' लघुकाव्य ' होय. यांत षड्ऋतुंचे स्वाभाविक, सरळ व सरस वर्णन आहे.

(२) मेघदूत हे काव्य कालिदासाच्या प्रतिभेचा विलास आहे. याचे संविधानक व विषयोपन्यास कवीची मौलिक कृति दाखविते.

या संदेशकाव्याची लोकप्रियता इतकी आहे कीं, जवळ जवळ ५० टीकात्मक लेख भिन्न भिन्न भाषांतून यावर लिहिले आहेत. यांत भावसौष्ठमता आहे व अकृत्रिमता व नैसर्गिक सहानुभाव आहे.

(३) रघुवंश–यांतील कथाभाग सर्वश्रुत असल्यामुळें सांगण्याचे कारण नाही. रामचरित्राचें वैशिष्ठ्य अति सुंदरपणें यांत दाखविलें आहे. भारतवर्षाच्या पवित्र स्थलांचे वर्णन तेराव्या सर्गांत असून कालिदासाच्या प्रतिभेनें येथें उच्चांक गाठला आहे. पातिव्रत्य, बंधुप्रीति, त्याग, सेवा, लोकरंजन या सर्व उत्कृष्ट चारित्र्याचा हा ग्रंथ गाभा आहे.

(४) शाकुंतल–ही कालिदासाची अनुपम कृती होय, माधुर्य, प्रासाद, ओज हे काव्यगुण ठिकठिकाणी आढळून येतात. पदलालित्य, अर्थसौष्टव; अलंकार वगैरे जीं काव्याचीं लक्षणें तीं संपूर्ण यांत आहेत. ' कलेकरितां कला ' हें याचे ध्येय नसून जीवनासाठीं कला हे कालिदास सांगतो. जीवनदर्शन ज्यांत होते तेच काव्य व त्यांमुळेच कालिदास लोकप्रियच नव्हे तर जगन्मान्य कवि गणिला गेला.

भारतीय समाजाचें उत्कृष्ठ शब्दचित्र त्याच्या काव्यांत सांपडतें. थोडक्या शब्दांत भावप्रदर्शन हें कालिदासाच्या काव्याचें वैशिष्ठ्य होय. यांच्या काव्यांत औचित्य आहे.

' उपमा कालिदासस्य ' हें म्हणणें सार्थ वाटतें. पात्रचित्रण करण्यांत त्याचा हातखंडा आहे हे त्याच्या अनेक नाटकांवरुन सिद्ध होते. ' रसात्मकं वाक्यं काव्यं ' हे लक्षण कालिदासाच्या काव्याला तंतोतंत लागू पडते. ' काव्येषु नाटकं रम्यं ' शकुंतलेला सासरीं जातांना कण्वांनी दिलेला निरोप हृदय हलवून सोडतो. प्रकृतिवर्णन करतांना कालिदास अगदीं समरस होऊन जातो, असो. विस्तृत पुष्कळ लिहितां येईल पण लेखाच्या अनुषंगानें साधारण कल्पना येण्यासाठीं एवढेच दिग्दर्शन करून व भारतीयांनीं आमच्यातील रत्नांची परीक्षा करून आपलें घर सुशोभित, पायाशुद्ध करावे ही विनंति करुन हा लांबलेला लेख येथेंच पूर्ण करतो.

धाराशिव २०-१-५७

# रामायणांतील व्यक्तिदर्शन : ९ :

आपल्या राष्ट्रांतील यच्चयावत् हिंदुजात दरवर्षी रामनवमी करते आज रामजन्म आहे, दुपारी ठीक बारा वाजतां रामजन्माला या अशीं पत्रकें काढावी लागत नाहींत. सरकारी फर्मान काढावे लागत नाहीं. तरी पण हजारों वर्षांपासून रामनवमीला रामजन्मोत्सव मोठ्या थाटानें होतो. सबंध गांव एकत्र होतो. ही अंधपरंपरा मुळीच म्हणतां येणार नाहीं या प्रचंड जनोत्साहाला कांहींतरी पार्श्वभूमि जरूर असली पाहिजे. त्याशिवाय आमचे असे अनेक सांस्कृतिक उत्सव इतक्या मोठ्या प्रमाणात साजरें झालेच नसते.

महाकाव्य ज्याला आम्ही म्हणूं ते दोनच आमच्या मध्यें आहेत. रामायण व महाभारत.

रामायणांतील प्रमुख नायक श्री रामचंद्र व प्रमुख नायिका सीता हीं असलीं तरी इतर पात्रेंहि कांहीं कमी महत्त्वाची नाहींत. त्या त्या

पात्रांचे निरीक्षण करुन; त्याचें वैशिष्ठ्य कशांत आहे. हेंच या लेखांत दाखविण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

रामायणांतील प्रमुख श्रीरामचंद्राचा जनक दशरथ, यांच्याकडे आपण प्रथम पाहूं. सम्राटाला योग्य असें सर्व गुण त्यांत होते. शौर्य, ऐश्वर्य, सत्य वचन व पालन, प्रजावात्सल्य, इत्यादि गुणांनीं दशरथ मंडित होता. कैकयीला युद्धांत दिलेले वर, त्यांनी अत्यंत बिकट प्रसंगीहि न डगमगतां, आपल्या प्रिय पुत्राच्या वियोगाचीहि पर्वा न करतां पाळलें. कैक वर्षांनीं, नवस-सायासांनीं प्राप्त झालेली सुंदर कोवळी मुलें रामलक्ष्मण, विश्वामित्रांनीं मागितली तेव्हां देखील मुलांच्या प्रेमापेक्षां त्यांस ऋषीमुनींचें यज्ञरक्षणच अधिक मोलाचें वाटले. यावरुन तो गोब्राह्मणप्रतिपालक होता हें स्पष्ट होतें.

दुसरी महत्वाची व्यक्ति म्हणजे श्रीरामचंद्र. उद्यां रामाला राज्याभिषेक होणार ही सुवार्ता अयोध्या नगरीत पसरली, हां हां म्हणतां सर्व अयोध्या नगरी शृंगारली गेली. जिकडे तिकडे गुढ्या तोरणें मोठ्या डौलानें फडकूं लागलीं. रस्त्यारस्त्यानें चंदनाचे सडे पडले, त्यावर सुवासिनींनी सुंदर व रमणीय रांगोळ्या काढल्या. दीपोत्सवाची पूर्ण तयारीं झालीं. उद्या गाई, वासरें रानांत जायचीं नाहींत. गोरगरिबांना अखंड गोदुग्ध पाजविण्याचीं व्यवस्था केली गेली.

मेवामिठाई, वस्त्रालंकार देण्याचे ठरले. सुवासिनींनी श्रीरामाला ओवाळण्याकरितां सुवर्ण मंगल दीप उजळून सज्ज करून ठेवले वाजंत्री, चौघडे, अबदागिरी चवऱ्या यांची सर्व व्यवस्था झाली.

उद्यां सोन्याचा दिवस. माझ्या रामाचा राज्याभिषेक ! दशरथाला, कौसल्येला, प्रजेला सर्वांना आनंद झाला. पण—दुधांत शर्करा पडण्याऐवजी मीठ कालवले गेलें.

एकाएकी रात्रीं वातावरण बदललें. काळाकुट्ट मेघ डोकावूं लागला. द्वेषाची भुताळीण थयथय नाचूं लागली, मंथरेनें कैकयीला कानमंत्र दिला, झाले.

कैकयीनें दशरथाला दोन वर मागितले होते. आपण मला देऊं केलेलें दोन वर याक्षणींच द्यावेत.

'माग' असें म्हणतांच कैकयी म्हणाली, 'एका वरानें माझ्या भरताला राज्य व दुसऱ्या वरानें रामाला १४ वर्षे वनवास.'

'हाय हाय ! काय मागितलेस दुष्टे !' असें म्हणून दशरथ धाडकन् खालीं पडला. पण लागलीच सावध होऊन म्हणाला,

कैकयी ! तुला दिलेले दोन वर मीं तुला दिले सूर्यवंशातील राजा दशरथ वचनभंग करणार नाहीं. लागलीच त्याने रामाला बोलावून आणले. दशरथ म्हणाला 'रामा ! उद्यां सकाळीच तुला अरण्यांत गेले पाहिजे.' 'तात ! आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे' धन्य तो दशरथ ! धन्य तो पित्राज्ञा पालन करणारा राम. ही आमची संस्कृति. नाहीतर राज्यलोभानें आपल्या प्रत्यक्ष बापास कैद करून राज्य करणारा, अधम संस्कृतिहीन औरंगजेब ! हें चित्र पहा आणि तें चित्र पहा.

उदात्तचरित्र रामाचें नांव अजूनहि अजरामर आहे, हीच याची कारणमीमांसा, व म्हणूनच आमचे उत्सव स्वयंस्फूर्तीनें अजून होतात.

सुखदु:खांमध्ये स्थितप्रज्ञता हेंच रामाचें वैशिष्ठ्य. रामाबरोबर खडतर कष्टांचे जीवत कंठणारा आमचा लक्ष्मण पहा.

राम, लक्ष्मण व सीता तिघे अरण्यांत गेले व पंचवटीत राहिले. असुरांचा राजा रावण याच्या कानांवर सीतेच्या सौन्दर्याच्या गोष्टी गेल्या. त्यांचें लक्ष सीतेवर गेले मारीचाला मायावी मृग बनवून सीतेच्या समोर आणले. सुवर्णमृग पाहून सीता मोहित झाली, व रामाला म्हणाली. 'प्राणनाथ ! हा सुवर्ण मृग धरून आणा.' मृगामागे रामचंद्र गेलें. मृगानें रामचंद्रांना बरेच दूर नेले व तो ओरडला, "लक्ष्मणा ! धांव ! हा सीते ! हा लक्ष्मणा धांव !" सीतेनें, ही आरोळी रामाचीच, म्हणून लक्ष्मणास रामसंरक्षणार्थ जाण्यास सांगितलें लक्ष्मण सीतेला एकटे सोडून जाईना. सीतेनें लक्ष्मणाची अपशब्दांनीं निर्भत्सना केली. लक्ष्मणाचा नाइलाज झाला. तो खिन्न अंत:करणानें बाहेर पडला. रावणानें संधि साधून सीतेला पळविले.

थोड्या वेळानें रामलक्ष्मण, मारीचाला मारून परतले, तो सीता पर्णकुटींत नाहीं. दोघेही रडू लागले. ते सीताशोधार्थ निघाले. सीतेनें रामाला

रस्ता सांपडावा म्हणून वाटेंत आपले दागिनें टाकले. रामाला रस्त्यांत ते दागिनें सांपडले. रामानें ते उचलून लक्ष्मणास दाखविले व विचारले, " हे अलंकार सीतेचेच काय ? " लक्ष्मण म्हणाला, " ना एक मला ठावे यांतील मला रामा." ते अलंकार सीतेच्या कानांतील होते. लक्ष्मणानें सीतेच्या मुखाकडेसुद्धां कधीं पाहिलें नव्हते. पहा, हा संयम ! आणि पद्मिनीचें मला दर्शन नाहीं झालें तरी चालेल पण तिचें मुखावलोक तरी आरशांतून दाखवा ! हा कामांध नरपशू कोणीकडे व आमचा सुशील संयमी लक्ष्मण कोणीकडे. केवढा हा आदर्श !

राम अरण्यांत जातो. दशरथ मरतो. कैकयी मामाच्या घरून भरताला दूतांकरवीं बोलावते. दूत जातो. भरताला नमस्कार करतो. भरत दूताला अनेक प्रश्न विचारतो. दूत स्तब्धच !

भरत अयोध्या नगरींत प्रवेश करतो. दारें, खिडक्या बंद. जिकडे तिकडे शुकशुकाट दिसतो. रस्त्यांनीं चिटपाखरूंहि दिसत नाहीं

संशयानें भरत आपल्या आईकडे येतो. पहातो तों काय ? कैकयीच्या कपाळीं कुंकू नाहीं. भरत विचारतो, " आई ! कपाळीं कुंकू कां नाहीं ? माझा राम कोठें आहे ? बाबा अद्याप उठले कसे नाहींत ? काय प्रकार आहे ? " कैकयी भरताची समजूत घालण्याचा प्रयत्न करते भरत संतापतो व आईचा धिःकार करून कौसल्येकडे येतो.

रामवियोगानें व पतिशोकानें कौसल्येचें मुख उदासीन व शरीर उपवासानें कृश होते. भरताचे डोंळे पाणावतात. इतक्यांत वसिष्ठ गुरु येतात. म्हणतात, भरता ! दशरथ वारले. राम अरण्यांत गेला. लक्ष्मणहि त्याचे बरोबर गेला. आतां तुलाच राज्यावर बसले पाहिजे.

भरत जास्तच रागावतो व म्हणतो

' न गुरु हा ठक दांभिक लाघवी '

रामापासून दूर करणारा तो गुरु कसला ? रामच राज्याचा अधिकारी आहे. मी रामाला आणून त्यालाच गादीवर बसवीन." असें म्हणून चौरस्त्यावर येतो व प्रजाजनांस म्हणतो.

" चला ! माझ्या रामाला अयोध्येंत आणण्यासाठीं कोण कोण येतो ? "

सारी अयोध्या भरताच्या मागें जाते
भरत अरण्यांत रामाला दुरुन पहातो. डोक्यावर जटा, अंगांत वल्कले घातलेल्या रामाकडे पहातांच भरताला रडे कोसळते व म्हणतो.

'रामा या दासाकरतां तुला संकट आलें. वनवास भोगावा लागला, मी घरच्या घरीच तुला शत्रू बनलो.' तो रामाला परत अयोध्येला चलण्यास आग्रह करतो. तुझें राज्य मी करणारा कोण? पहा आमच्या भरताचें हृदय व पहा अधम नरपशू यवनाधिपाचे कपटी हृदय! आपल्या चारी भावांना ठार टाकून राज्य भोगणारा कपटी व स्वार्थ लोलुप औरंगजेब! पहा या भिन्न संस्कृति! गजांत लक्ष्मी लाथाडून देणारा आमचा भरत व भावांना ठार करून राज्य बळकावणारा नरपशू औरंगजेब!

आतां राहता राहिली सीताबाई. पण तिच्याकडे वळण्यापूर्वी भरतभेट करवून मग पुढे जाऊं. भरताला रामानें जे प्रश्न केले, त्यावरून राम किती राजकारणकुशल होता हें पहा. राम विचारतो!

"भरता! दशरथ बाबा कुशल आहेत ना? कैकयी माता आनंदांत आहे ना? वडिलांच्या वृद्धपणामुळे राज्याचा भार तूं वाहतोस ना? गुरु वसिष्ठासारखे धर्मगुरुंना रोज वंदन करतोस ना? प्राप्ती पाहून द्रव्य दान करतोस ना? प्रजेला चांगलें वागवतोस ना? लांच वगैरे अधिकारी घेत नाहीत ना? आपला भेद, आपलें राजकारण परकीयाचें राजकारण जाणून घेण्यासाठीं गुप्तहेर ठेवतोस ना? दीनदुबळे, अनाथ यांना सहाय्य करतोस ना? भरता! मी इतके प्रश्न करतो, पण तूं मात्र एक शब्दहि बोलत नाहींस? कां? माझ्यावर रागावलास काय? रागावूं नकोस. खरें जें जें असेल तें सांग. हे ऐकून भरताला रडें येते व तो म्हणतो—

'रामा! हे माझें राज्य नसून तुझेंच आहे, तूं परत चल.'

'मग रावणवधाचें मुख्य कार्य करून दुष्टांचें निर्दालन व साधूंचे परिपालन करण्यासाठीच ज्या रामचंद्राचा अवतार तें कार्य केल्याशिवाय मी येऊं शकत नाहीं. तसेच पित्राज्ञाहि मला १४ वर्षे वनवासांत राहण्याची आहे. भरता! तूं शहाणा आहेस.जा माझ्या पादुका घेऊन राज्य कर.' असें राम म्हणाला.

शेवटची पण सर्वात महत्वाची व्यक्ति म्हणजे आमची सीतामाई.

राम वनांत जातांना सीतेचा निरोप घ्यावा म्हणून येतो. सीता म्हणते, "जिकडे वृक्ष तिकडे छाया." कितीही संकटें आली तरी तुमच्या बरोबर असतां संकटेंच बरी वाटतील.

रावणाच्या घरी सीता बरीच वर्षे राहिली. अग्निदिव्य केल्याशिवाय तिला घरांत घेऊं नये असें कांहीं जण बोलले. अग्निदिव्य केलें. पण पुन: एकदा एका यःकश्चित् परटानें आक्षेप घेतला. लगेच प्रजानुरंजक रामानें सीतेला अरण्यांत पाठविली. याला म्हणावे प्रजावात्सल्य !

सीतेनें असह्य दुःख सोसले. पण शेवटीं स्वाभिमान जागृत होऊन तिनें पृथ्वीची प्रार्थना करतांच तिच्या पोटांत गडप झाली. रावणाच्या घरीं राहून रावणाला अंगाला स्पर्शही करूं दिला नाहीं. नाहींतर रझाकार मारले गेल्यानंतर उघड्या पडलेल्या स्त्रिया म्हणाल्या—

"आम्ही कुंकू लावतो, गोंदून घेतो, नांव बदलतो, आमच्याशी मन मानेल तो व्यवहार करा, पण आम्हांला वाचवा. पहा ! आर्य स्त्रियांची संस्कृती व यांची? करा तुलना! रामायणांतील सर्व व्यक्ति अशा आदर्शभूत म्हणूनच आम्ही रामोत्सव करतो. रामायणांतील व्यक्तिदर्शन करवून त्या सर्व पूजनीय व्यक्तींना आदरांजली वाहून हे लांबलेले व्यक्तिदर्शन येथेंच संपवितो.

देव निवास धाराशिव [ प्रसिद्धि विवेक औरंगाबाद १४।४।५७ ]

## मूर्तिपूजेचे नवे स्वरूप : १० :

आजकाल जो उठतो तो मूर्तिपूजेच्या विरूद्ध यथेच्छ तोंडसुख घेतो पण स्वतः विरूद्ध बोलणाराच मूर्तिपूजा करतो. परमात्मा शोधण्यास कोठे जावे याविषयी निरनिराळें धर्मपंथ काय म्हणतात इकडे पाहिलें तर त्या त्या पंथातील विचारसरणीकडे पहावें लागेल.

थिऑसफी हा पंथ म्हणतो की चालीरीती झुगारून फक्त ॐ कार शब्दच घोका. तर आर्यसमाजी म्हणतात कीं तनुपुजा न करितां अगस्त्याचेंच

पूजन करावें, खिश्चन धर्म सांगतो कीं येशु ख्रिस्ताची प्रार्थना केली तर आकाशांतील बाप पावतो, मुसलमान म्हणतात महंमद पैगंबर आमचा देव व त्यांचे थडगे असलेलें ठिकाण आमचें पूजास्थान मशीद आमचे प्रार्थनेचें पवित्र स्थळ. याचा अर्थ हा कीं प्रत्येक पंथीयांना कांही ना कांहीं स्वरुपांत देव आहे असें वाटते. हिंदुलोक आपल्या घरांत वा मंदीरांत मूर्तीचीं पूजा करतात. त्या मूर्ती पितळेच्या दगडाच्या, सोन्याच्या चांदीच्या वा अन्य धातूंच्या असतात व त्यांत कांहीतरी तत्त्व असल्याशिवाय ते त्यांची पूजा करत नाहींत. एकाद्या गाढवाची वा कुत्र्याची वा घुबडाची मूर्ति करून कोणी हिंदूंनी देव म्हणून पूजलेले उदाहरण दिसत नाहीं तर राम, कृष्ण, हनुमान, गणपती, शंकर, देवी ज्यांनी ज्यांनी कांहीं अवतारकार्य केलें आहे त्यांच्याच मूर्ति करून स्मरणार्थ त्यांची पूजा केली जाते. मूर्तिपूजेच्या बिरूद्ध बडबडणारें याहून दुसरें काय करतात ?

मशीदीत जातात, चर्चमध्यें जातात, थडगें पूजतात त्याला हार घालतात, जास्त काय सांगावें? आमचें निधर्मी राज्य तरी काय करते ? गांधीजींची, वल्लभ भाईंचीं आणि थोर व्यक्तींची श्राद्धतिथीं जिला पुण्यतिथी वा जयंति हे गोड नांव देऊन त्यांच्या पुण्य स्मरणार्थं तिथीं व जयंति करतात तीहि एक प्रकारची मूर्तिपूजाच नव्हे काय ?

वाढदिवस साजरे होतात तेव्हां कुंकुमतिलक, निधन पावल्यास पवित्र क्षेत्रांत अस्थिविसर्जन वगैरे सर्वच होतें फक्त नांव निराळें. प्रकार मात्र तोच.

अलीकडे तर जिकडे तिकडे पुतळ्यांचे अनावरण समारंभ, राणी लक्ष्मीबाई, श्री छत्रपति शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, गांधीजी वगैरेंचें पुतळे उभारून स्मारक करणें म्हणजे याचा अर्थ हाच की जुन्याला नांवे ठेवून तेच आपण करायचे व स्वताला सर्वमतवादी, अजातीय व निधर्मी म्हणवून घ्यायचें? एकाद्या कर्तृत्ववान, शूर, धार्मिक, त्यागी पुरुषाचा फोटो त्याला माळ घालून नमस्कार करणें काय आणि पितळेच्या देवाला स्नान घालून पूजा करून गंधफुलें वाहणें काय सारखेंच ! ज्या ज्या पुतळ्याचे

अनावरण समारंभ झाले ते पुतळे उन्हापावसांत राहून लोकांच्या पूज्यत्वाला पात्र होणें व देवळांतील मूर्ति दगडाची वा धातूची समोर ठेवून तिची पूजा करणें यांत फरक कोणता? एवढें मात्र खरें कीं आम्हीं त्या त्या देवतांचें नुसते पूजनच करून, त्यांच्या कार्यांचें स्मरण न करितां नुसतेंच गंधपुष्पादिच अर्पण करुन स्तब्ध बसलो तर मात्र ती मूर्तिपूजा केव्हांहि त्याज्यच. पण रामाची कृष्णाचीं वा अन्य देवतांची पूजा करून जर आम्ही त्यांच्या चारित्रापासून बोध घेतला व पूजा करीत राहिलो तरी मूर्तिभंजकांना त्यांत वैषम्य वाटण्याचें कांहीच कारण नाहीं.

हजारो पुतळ्यांचे अनावरण समारंभ होऊन लक्षावधि रुपये स्मारकार्थ खर्चं होऊं लागले आहेत. ही काय मूर्तिपूजा नव्हे ? पण जुन्या सनातनी लोकपरंपरा कायम रहाव्या म्हणून जे करतात ते नवमतवाद्यांना मान्य नाहीं व आम्हीं जे करतो तेंच खरे असें म्हणण्यांत काय अर्थ आहे ? मूर्तिपूजा नवमतवादी किंवा निधर्मी सरकार पुतळे उभारून फोटोला माळ घालून, त्याला कुंकमतिलक लावून करतात तर सनातनी देवळांत मूर्ति स्थापन करून, घरांत मूर्ति पूजून आदर दाखवितात, दोन्ही प्रकार मूर्तिपूजेचेच ! स्वरूप मात्र नवें.

श्री शंकराचार्यांनी मूर्तिपूजेची प्रथा पाडली तीहि साधारण समाजासाठींच. मनुष्य वरच्या कोटींत पोंचला म्हणजे तेही गीतेचा ध्वन्यर्थ लक्षांत घेऊन म्हणतात कीं “सर्वधर्मात् परित्यज्य मामेकं शरणं-व्रज” त्याना वा वेदांना तरी मूर्तिपूजा कोठें मान्य आहे? पण सामान्य जनांना स्फूर्ति उत्पन्न व्हावी व त्यांचें विचार, आचार, थोर देवता वा थोर पुरुषांप्रमाणें व्हावे म्हणूनच सनातन्यांची देवपूजा व आजच्या निधर्मी सरकारचें पुतळ्याचें अनावरण समारंभ दोघांचीही मूर्तीपूजेतच गणना होईल. फक्त स्वरूप मात्र नवें. एकादा श्रीमंत भोजन करतांना त्यानी खूप खाल्ले तर तो भोक्ता व तितकेच गरीबानें खाल्ले तर तो खादाड, या शब्दांत जो फरक आहे तोच आजच्या नवरुप पूजेत व सनातन्यांच्या मूर्तिपूजेत आहे.

मूर्तिपूजा करणें हें जर विरोधकांना मान्य नसेल, तर असें पुतळें

उभारून मूर्तिपूजा करणें देखील त्यांनीं सोडून द्यावे. मूर्तिभंजकांचीं भीती जुन्या व नव्या दोघांनाहि आहेच. हे परवा मद्रासमध्ये पुढाऱ्यांचे फोटो जाळून त्यांचा उपमर्द करणाऱ्या कुप्रसिद्ध नायकरांच्या दुष्कृत्या-वरून सर्वश्रुतच आहे मूर्तिभंजक मागेहि होते, आजहि आहेत, व पुढेहि राहतीलच. हे जाणून त्यावर कडक उपाय व तोडगा शोधून काढणें, हेच सूज्ञांचे कर्तव्य आहे. व तो तोडगा म्हणजे, मूर्ति वा पुतळे स्थापकांच्या वज्रमुठी झाल्या पाहिजेत व त्या बळकट वज्रमुठींनी मूर्तिभंजकांचें ते दुष्ट व पाशवी हात मुळापासुन उखडले गेले पाहिजेत. तर निर्जीव पुतळे व मूर्तीच काय तर आम्हाला पंचप्राण असणाऱ्या साध्वी स्त्रिया व पूज्य भगिनी यांचेहि अपहरण थांबून मूर्तिभंजकांच्या पाशवी अत्याचाराला आळा बसेल.

## फाटकें छत्र : ११ :

छत्र म्हटल्यानंतर रक्षण करणारे तें छत्र, असा सहज छत्र शब्दाचा अर्थ निघतो. आतपापासून वा पर्जन्य धारांपासून जें आपलें रक्षण करते तें छत्रच. एकादा वाघ वा क्रूर पशु आपले समोर येताच छत्र उघडे असतां ते वाघापुढे धरून तें स्वात्मरक्षण करणारें तेंहि छत्रच. सती साध्वी स्त्रीचे शील व पातिव्रत्य रक्षण करणारा जो पति तोहि त्या स्त्रीचे छत्रच. घराला चोराचिलटांपासून चोहोबाजूनीं किल्ल्यांच्या मजबूत तटा-सारख्या भिंती आहेत. आंतून सर्वत्र रंगरंगोटी केली आहे, व घर सुशोभित केलें आहे पण जर वर छत नसेल तर त्या गळणाऱ्या व चोराचिलटांना घरांत घुसूं देणाऱ्या घराचा काय उपयोग आहे ?

त्या घरालाहि छत्र असलेच पाहिजें, तरच तें घराचे रक्षण करूं शकेल. देशाचें, प्रजेचे, दुर्बलांचे रक्षण करणारे जे कोणी असतील तेहि त्यांचें छत्रच नव्हे काय ?

कुटुंबांतील वयोवृद्ध पुरुष वा स्त्री देखील त्या कुटुंबांतील मुलाबाळांचें छत्रच होय. छत्राची ही जी व्यापक व्याख्या केली आहे ती फाटक्या छत्राचीं नसून संरक्षणक्षम छत्राची होय.

आतपापासून, पर्जन्यापासून, व्याघ्रापासून. चोरांपासून, शत्रूपासून, दुर्गतीपासून, दुर्मार्गापासून जे जे कोणी रक्षण करितात ते सारें ' छत्र ' या नांवाखालीं येतील.

असे छत्र स्वत: धडधाकट, सामर्थ्यशील, सुविचारसंपन्न नीतीच्या काड्यांनीं युक्त असेल तर तें छत्र म्हणवून घ्यायला पात्र व त्याचें रक्षण करण्यातहि भूषण होय.

स्त्रियांचे पातिव्रत्य रक्षण करण्याचीं ज्या पतीरूपि छत्रांत धमक नाहीं त्यास स्त्रीछत्र कोण म्हणेल !

प्रजेच्या दु:खाचें, दैन्याचें, दुर्बलतेचें, निराकरण ज्या छत्रपतिपासून होत नाहीं. तो नामधारी छत्रपति काय कामाचा ? नांव अन्वर्थक नसेल तर त्या नावाला व्यक्तीचा विटाळ कशाला ? नांव पंडित पण अक्षरशत्रु वा पढतमूर्ख असेल त्याला शहाणा कोण म्हणेल ? आया भगिनी छळल्या जातात, त्यांचा विनयभंग होतो, प्रजेचा पैसा भरमसाठ भलत्या कामांत खर्च होतो, आपला देश अजून चोरांच्या मगरमिठीतून सोडवितां येत नाहीं. स्वकीयांच्या आर्त केविलवाण्या किंकाळ्या ज्यांना ऐकूं येत नाहींत, कान असून बहिरे, डोळे असून आंधळें, हात असून निर्जीव, पाय असून पांगळें अशा छत्रपतींना छत्रपति कोण म्हणेल ? ते छत्रपति या नांवाला कलंक !

छत्रपति म्हणवून घ्यायला पात्रता लागतें, सामर्थ्य लागतें, हृदय लागतें, स्वाभिमान लागतो, धर्माभिमान लागतो, कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं शक्ति लागतें,भूतदया, सक्रिय सहानुभूति लागते. छत्र, दुर्बल, फाटके कुजके असले तर तें छत्र कसचें ! देशद्रोहयाची स्वजन व्देशाची, कपटाची दुष्ट छिद्रे पडून जे छत्र जागजागी छिद्रांनी व्यापून गेलें आहे ते छत्र आपले रक्षण करु शकते असें म्हणणें म्हणजे मृत मनुष्य उठून पळूं लागल्यासारखें आहे.

घरांत, देशांत वयोवृद्ध माणसाचे छत्र असावें, व तें तसे असले म्हणजे मुलें, सुना, लेकी, आपणांस धन्य समजतात. व आपणांस परमेश्वराने इतक्या दीर्घकालापर्यंत छत्र राहूं दिले म्हणून भाग्यवान समजतात. पण जर कां हेच देशद्रोही, स्वजनद्रोही, दुखःदायक, वयोवृद्ध ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध असूनहि तापदायक असेल तर त्यापासून मुलाबाळांना काय लाभ व कोणता आनंद ?

काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंके या न्यायानें,हजारो व्याधींनी पीडलेलें, क्रोध-स्वार्थानें माखलेले मरेपर्यन्त कोणाहि व्यक्तिला सुख न देणारे पण १०० वर्षे जगणारे असें छत्र असून नसल्यासारखेंच होय.

हातांत बाळगून पर्जन्य,तापत्रय, यापासून रक्षण न झाले तर ते मनगटाला व भूपृष्टाला भार-भूतच होय. काडीमात्रहि ज्याचा उपयोग नाहीं ते फाटके छत्र बाळगून काय उपयोग ?

त्याला वरपांगीं चांगलें म्हणून, आंतून मात्र ते छत्र उडून जाण्याची वाट पहाणें व परमेश्वर लवकर आमच्याकडे पाहो अशी मनोभावानें प्रार्थना करणें यांत छत्र धारण करणाऱ्याला व स्वतः त्या छत्राला दोघांनाहि भूषणावह असें काहींच नाही.

जें छत्र अस्तिवात असतांना, सुखदायक व तापहरण करते व जें नाहीसें झाल्यावरहि सर्वांच्या मनांत हळहळ उत्पन्न करतें तेंच खरे छत्र! फाटकें छत्र असून नसून सारखेंच, ते केवळ जगाला भारभूतच होय

अशा फाटक्या छत्राची कोणी उपेक्षा केली वा ते जगांतून नाहीसें झालें तर त्यांत विशेष वाईट वाटण्यासारखे कांहीहि नाहीं.

## आमचा कुत्रा : १२ :

इतिहासाची पानें, थोर थोर म्हणविणारे, स्वार्थत्यागी, देशप्रेमी, हुतात्मे, देशावर अनंत उपकार करणारे, संत, साधू, आपल्या अमोल वाङमयानें अमर झालेले, स्त्री असूनहि समर गाजवून, लढतां लढतां मरून

जीवित सार्थकीं लावणारे, आपल्या सतेज पातिव्रत्यानें रावणासारख्या पाशवी शक्तीलाहि सामर्थ्यहीन करून त्यांची गाळण उडवून देणाऱ्या अशा अनेक स्त्री पुरुषांच्या वर्णनानें सुवर्णाक्षरानें मंडित होतात, हीं सारी उदाहरणें नरकोटीतील होत.पण Every dog has his day, या उक्ती-प्रमाणें इतर कोटींतहि कांहीं प्राण्यांचीं नावें या सदरांत येतात. नुकतेंच रशियानें अंतराळात सोडलेल्या कृत्रिम चंद्राबरोबर पाठविलेली कुत्री 'लायका' इचेंहि नांव, तिनें मानवावर केलेल्या परोपकार कृत्यानें व बलिदानानें, इतिहासांत अजरामर राहील.

बालकाचें सर्पापासून रक्षण करणारा नकुल, आपल्या मालकाला मृत्यु आला असतां रणसंग्रामांत शवाला शत्रूंना स्पर्श करूं न देणारा प्रामाणिक घोडा आपल्या पायांतील काटा काढून उपकृत करणाऱ्या अँड्रोक्लीसापुढें कृतज्ञतेनें दीन गाईसारखा शांत उभा राहणारा व कुत्र्या-सारखे आपल्या मालकापुढें शेपूट हलवणारा सिंह, रामाला, सीता सोडवून आणण्याच्या सत्कार्यांत मदत करणारा हनुमान, व त्याचा वानरवर्ग, हीं सर्व मनुष्येतरांची उदारहणें असली तरी चिरस्मरणीय होत, हे कोण कबूल करणार नाहीं? एकादे वेळीं मनुष्यजात जें करूं शकणार नाहीं. तें दिव्य क्षुद्र प्राणीहि करूं शकतात,यांचीही प्रत्यक्ष उदाहरणें आहेत. याच्या उलट मनुष्य ज्ञानसंपन्न असूनहि श्वानाला लाजविणारीं कृत्यें करतांना आपण पाहतो. 'लायका' सारखें कुत्रेंहि देशाकरितां आत्मबलिदान केल्यामुळें अमरत्व पावतें, पण कांहीं नरपशू देशद्रोहादि पापें करून, कुत्र्याचें जिणें जगतात.

एकेकाळीं देशप्रेमानें चमकलेले, ज्यांची 'चाणक्य' म्हणून गणना झाली होती, ज्यांना भारत शिरसावंद्य मानीत होता, तेच आज भारतद्रोही कारवाया करून कावळ्यासारखे वृद्धत्वांत चिरकाल जगण्यांतच भूषण समजतात, त्यांचें जिणें अनंत इतर कुत्र्याप्रमाणें नाहीं काय?

जेथें प्रल्हादासारख्या सत्प्रवृत्त देवभक्ताला विष घातलें जाते, तप्त कढईत टाकण्यांत येतें, डोंगरावरून कडेलोट करण्यांत येतो, देशप्रेम करणाऱ्या नरश्रेष्ठांना जगांतून नाहीसें करण्याचा कट केला जातो.

गोळयांचा वर्षाव करून स्वजनांचा संहार होतो, पण देशद्रोहयांना मात्र स्वच्छंदानें उडण्याबागडण्यास, व वाटेल ते बरळण्याचा पासपोर्ट दिला जातो उघड उघड देशद्रोह करित असतांहि पिंजऱ्यांतून काढून जीवदान दिले जातें, तेथें कुत्र्यासारख्या क्षुद्र प्राण्यांची कथा काय? पण जें कुत्रे चांगलें, प्रामाणिक, आपल्या घरादारांचे संरक्षण करून टाकलेला तुकडाच तेवढा खाऊन जिवंत रहाते परकीय वा स्वकीय दुष्ट मनुष्य पहातांच त्यांच्या अंगाचें लचके तोडतें, प्राण गेला तरी शत्रूला मालकाच्या घरांत प्रवेश करूं देत नाहीं शत्रूवर काडीचाहि विश्वास ठेवीत नाहीं, तर प्रामाणिकपणे आपल्या गृहमालकाचीच रात्रंदिवस सेवा करतें, ते कुत्रें असलें तरी वर वर्णन केलेल्या देशद्रोहीं नरपशूपेक्षां सुतराम् श्रेष्ठच !

आमचा कुत्रा तसाच होता. त्याच्या १५ वर्षांच्या कारकीर्दींत त्यानें कधीं आमच्या घराचा उंबरठा ओलांडला नाहीं सत्प्रवृत्तांना केंव्हां चावला नाहीं, चुकूनहि आपल्या घरांतील तुकडा कोणाला दान दिला नाही शत्रूंनी हजारों काठया अंगावर ओढल्या तरी त्यांना घरांत प्रवेश करूं दिला नाहीं; हितशत्रू व गृहदेशद्वेष्टयांना घरांत फिरकूं दिलें नाहीं. लुंग्या सुंग्यापासून मालकाला दुखवूं दिले नाही, तो कुत्रा असला तरी दोन पायांच्या नरपशूपेक्षां श्रेष्ठ नाहीं काय? असा आमचा प्रामाणिक, स्वजनावर कधीहि न भुंकणारा पण परकोयांचा मात्र काळ, तो कुत्रा आज आमच्यामधून निघून गेला.

त्याच्या सद्गुणावर भाळून आज एक इतिहासाचे पान मीं सुवर्णाक्षरांनीं मंडित केले आहे. माणसाच्या जननमरणाची नोद ठेंवतात. पण 'लायका' सारख्या मानवाकरितां आत्मार्पण केलेल्या कुत्र्यांचीही नोंद अवश्य केली पाहिजे.

आमचा मोतीहि असाच होता. तो गृहकर्णांत खुलून दिसत होता. पण तो आज गेल्यामुळें गृहकर्णांची भोकें मात्र शिल्लक राहिली आहेत. त्या मोत्याची विश्वासपूर्ण हांक जी आम्हांला दुष्टापासून सदैव जाग क ठेवीत होती तीहि या कर्णाला पारखी झाली आहे.

कुत्रा असूनही ज्यांनी प्रामाणिकपणाची, माणुसकीची कमाल केली, त्याचा मृत्यु अत्यंत शोचनीय होय. ईश्वर त्या मृत कुत्र्याच्या आत्म्यास शांति देवो हीच लेखकाची देवाजवळ प्रार्थना आहे !

# भांगेंत तुळस　　: १३ :

हैद्राबाद संस्थानात रझाकारांचा सुळसुळाट झाला होता; हिंदूंचा छळ होत होता. स्त्रियांचा पदोपदी विनयभंग होत होता. हिंदू समाजाचें चैतन्य सुप्त झाले होतें, डोळ्यादेखत स्त्रियांची विटंबना होत असतां प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नष्ट झाले होतें. नोकरवर्गाला गुलामगिरी पचनीं पडल्यामुळें कांहींहि व कितीहि अपमान झाला तरी त्याची खंत वाटत नव्हती. निजामाला तर स्वर्ग दोन बोटेंच उरला होता, रझाकारांच्या नंग्या नाचाला आळा न बसतां उलट उत्तेजनच मिळत होतें द्रौपदी वस्त्रहरण एकदांच झाले होते, पण या काळांत तर हजारों द्रौपदींची विटंबना भर रस्त्यावर होत होती. दिवसाढवळ्या घरांत शिरून द्रव्याचा अपहार होत होता. पतीसमोर स्त्रियांचा विनयभंग केला जात होता. अशावेळीं मी गुलबर्गा जिल्ह्यांतील एका तालुक्याचे गावीं शहापुरला माध्यमिक शाळेचा मुख्याध्यापक म्हणून काम करित होतो. माझ्या हातांखालीं २१ शिक्षक होतें. त्यापैकीं ३ हिंदू व बाकीचे सर्व मुसलमानच. विद्यार्थ्यांचेंहि वर्तन त्यांच्या वडिलांना शोभेसेच होतें. परीक्षेत शून्य मार्क मिळालें तरी १०० गुण द्या, नाहीतर वडगा दाखवितो असें म्हणून गुण मिळवावयाचें व प्रत्येक वर्षीं पुढच्या वर्गांत त्यास प्रमोशन, मेहनत न करतां मिळवयाचें.

शिक्षकही वाटेल त्यावेळीं शाळेंत यावयाचे व खुशाल चेन्डूप्रमाणें कांहीहि न शिकवितां पगार मात्र पहिल्या तारखेस चुकला तर मुख्याध्यापकांचे डोके फोडायचे !

एकदां शाळेचा घरमालक (तो अरब होता.) दुपारचे वेळीं शाळेत आला. कमरेला जंबिया, मदिरा पिऊन झिंग झालेला, माझ्यासमोर आला व म्हणाला, “उतरो नीचे ! मै कुर्सीपर बैठना चाहता हूं” प्रसंग कठीण. मी खुर्ची सोडली. तो अरब माझ्या जागी मुख्याध्यापक बनला व म्हणाला, “मकान का किराया ५० रु. है। २०० करो, नही तो जंबियेसे काट दूंगा” माझें धाबें दणाणले. अंगाला घाम सुटला. शरीर थरथर कापूं लागलें, प्रसंगावधान साधून

कारकुनास ( मुसलमान ) बोलाविले व " यांचा अर्ज लिहून आजच पाठवा. " असें मी म्हणालो ' वचनें किं दरिद्रता ' या न्यायानें त्यास मी म्हणालो, ' २०० कैसा ! ३०० रु. महिना किराया एक महिनेंके अंदर मंजूर करता हूं ! ' चपराशी मुसलमानच, त्यास एक कप चहा व पान आणण्यास सांगितलें. चहाचा घोट घेतांच स्वारी खूष झाली व निशेत बरळूं लागली.

माझ्या जीवांत जीव आला व एकदाची ही पीडा बाहेर घालविली.

याच काळांत गावांत शांतता समित्या स्थापन होत असत. शांतता नसतांना शांतता आहे असे जबरदस्तीनें आमच्याकडून लिहून घेत. व त्यावर स्वाक्षरी घ्यावयाची हे नित्याचेंच झालें होतें.

कमेटीच्या सर्व गोष्टी हिंदूंच्या विरुद्ध होत, आज अमक्याला पकडून आणा, उद्या अमकी माणसें ठार करा, परवा त्या वाड्यांतील दोन सुंदर स्त्रिया धरुन आणा व आमच्यासमोर त्यांना नग्न करा. हेंच कमिटीचे विषय.

सुदैवाची एकच गोष्ट. बुडत्याला काडीचा आधार या दृष्टीनें माझ्या हाताखालील मुसलमान शिक्षकांपैकी ( जो जबरदस्तीनें रझाकारांचा पुढारी बनला होता) एक माझ्या राशीला उतरला होता ! तो दररोज कमेटीत काय झालें, हें सांगत असें. एके दिवशीं तो म्हणाला-- " साब, कल तुम्हारी खैर नहीं. तुमको मार डालनेका इरादा कल हुवा है " हें ऐकतांच आमचें धाबे दणाणलें व मी त्यास म्हणालो-

" कसे काय मग विलायतहुसेन ! " ( त्याचे नांव होतें. )

तो म्हणाला "घाबरूं नका. मी आज रात्रीं आपणांस पुण्यास पोचवितो." मला खरे वाटेना.

रात्रीचे बारा वाजलें. मोटारीचा आवाज झाला, एकदम विलायत हुसेननें दारावर थाप दिली. मी भीतभीतच दार उघडलें. आंत येतांच तो मला म्हणाला ' ये हजार रुपये लो. बूट मे रखो. ' मला आश्चर्य वाटले. ' हे कशाला? ' तो म्हणाला ' तुमची मुलें पुण्यास शिकत आहेत

असू द्या. इकडे काय होतें याचा नेम नाहीं ' मी मुकाट्यानें ते रुपये बुटांत घातले पण भीतीनें गांगरून गेलो, तो पुढे म्हणाला. ' मीं तुम्हाला नेतो, पण एका अटीवर, हा बुरखा माझ्या बायकोचा आहे. तो घालून आपण मोटारीत बसा. मला ' शिवाजीची आग्र्याहुन सुटका, ' या प्रसंगाची आठवण झाली. मी कबूल केले. शूरपणांत नाही तरी पळून जाण्यांत, मी स्वतःला शिवाजीच समजलो.

शहरापासून यादगीर स्टेशन २० मैल आहे. स्टेशनजवळच भीमा नदीवर एक पूल आहे. तेथें आमची गाडी आली. त्या पुलाच्या दोन्हीं टोकाला रझाकारांचा सशस्त्र तांडा होता. गाडी पहातांच ' खडे करो कौन जा रहा है ' म्हणून आरोळी आली माझ्या अंगाला दरदरुन घाम सुटला, पण विलायत हुसेन म्हणाला ' मैं विलायत हुसेन हूँ रझाकारांचा सेनापति, जनाना हैद्राबाद जा रहा है ' मी त्याचीं बायको झालों. हे ऐकतांच गाडीला वाट मिळाली. स्टेशनवर त्यानें सेकंड क्लासचे तिकीट काढून मला लहंग्यासह गाडीत बसविलें झाले ! माझी सुटका झाली. मी परमेश्वराचे आभार मानले व त्याच प्रसंगीं ' तारी ज्यास देव तयासी कोण जगी तारी ?' ही कविता तयार झाली

सकाळीं ९ वाजतां मी पुण्यास सुखरुप पोहोचलो. नंतर एक महिन्यांनी पोलीस अॅक्शन झाली व आम्हांला नौकरीवर हजर राहण्याकरितां ३१ आक्टोबर हा शेवटचा दिवस ठरविला.

अॅक्शननंतर एक मामलेदार पुण्याहून शहापुरला आले. त्यांनी ' येथें मुख्याध्यापक कोण ? ' म्हणून विचारले. लोकांनीं सांगितलें 'देवमास्तर. ते सध्या पुण्यास पळून गेले आहेत.'

कर्मधर्मसंयोगाने, त्यांचीं मुलें व माझीं मुलें एकाच पेठेंत(कसबा) राहात होती. मामलेदारांनी मला तार केली. ' Start at once join Duty on 31 st October bring your & my family with you No danger.' तार वाचतांच मी सहकुटुंब निघालो.

यादगीर स्टेशनवर ज्या रझाकारानें मला पुण्यास सुरक्षित पोंचविलें होते, त्याच्या हातांत हातकड्या घातलेल्या मला दिसल्या. त्यानें मला

सलाम केला. मी कांहींच बोललो नाहीं. पण आर्यसंस्कृति जागी झाली. शत्रू जरी शरण आला तरी त्यास मरण देऊं नये. मग यानें तर माझें तर प्राण वांचविलें. मला दया आली. पण तो प्रसंग बिकट होता.

मामलेदार व मी मंडळींसह त्यांच्या मोटारींत बसलो. त्यांनीं विचारलें 'देव! तुम्हांला रझाकारांच्या काळांत कुणी त्रास दिला, त्यांचीं नांवें द्या!' मी शाळेंतील कांहीं दुष्ट शिक्षकांचीं नांवें दिली पण मुद्दाम विलायत हुसेनचें नांव मात्र गाळले. मामलेदार संतापून म्हणालें 'देव! तुम्ही बदमाष आहांत. विलायत हुसेनचें नांव कां दिले नाही? तो तर रझाकारांचा पुढारी!' मी त्याची सर्व हकीकत सांगितली. मामलेदारांच्या डोळयांतून अश्रू वाहूं लागलें व उद्‌गार निघाले, 'भांगेंत तुळस असते यांत संशय नाही.' मीं मामलेदारास विलायत हुसेनला मुक्त करण्याची विनंती केली. त्यांनीहि मोठ्या आनंदानें ती मान्य केली.

मामलेदार मला म्हणाले 'देव! तुमच्या हातांनी विलायत हुसेनच्या हातकड्या काढा.'

मला फारच आनंद वाटला. मी त्यास मोकळे केलें.

त्याची मुलेंबाळें-बायका, पुरुष वगैरे सर्व पळत आली व माझ्या व मामलेदारांच्या पायावर त्यांनीं मस्तक ठेवले. विलायत हुसेननें कृतज्ञता व्यक्त केली. अशा रीतीनें हा प्रसंग टळला. या प्रसंगास संस्मरणीय प्रसंग म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मी जर या प्रसंगांतून बचावलो नसतो, तर 'प्रसाद' मासिकांच्या ऋणानुबंध या दिवाळी अंकांत हा लेख कोणी दिला असता ?

धाराशिव ५।११।५५ (प्रसाद, पुणें, दिवाळी अंक १९५५ वरून)

## आई, तुझ्याच पायीं : १४ :

दिवाकरची वार्षिक परीक्षा संपली. तो व त्याची वहिनी सामानासह त्यांचे गांवीं यंण्यास निघाले. त्यांच्या गांवापासून स्टेशन फार लांब होते.

बार्शी स्टेशनवर उतरून मोटारीनें त्याचे गांवीं जावे लागते. गाडी दुपारी १ वाजतां बार्शी स्टेशनवर आली. उन्हाळ्याचें दिवस होते. प्रवासानें दोघांची शरीरें मलीन व घामागर्द झाली होती. कशीतरी मोटार गांठली. हमालास सामान वर ठेवण्यास सांगितलें. त्याची वहिनीहि आपले चार महिन्यांचे मूल घेऊन मोटारीत बसली. हमालास ३ डागाचें ६ आणे दिले. मोटार निघाली दिवाकराच्या गावीं स्टँडवर ती मोटार थांवली. हमालास सामान उतरण्यास सांगितलें. तो काय! दोनच डाग! अेक ट्रंक नाहीं. त्यांत वहिनीच्या सोन्याच्या वागड्या १२ तोळ्याच्या, काहीं नवीं लुगडी व दिवाकराचें एक तोळ्याचें लॉकेट मिळून जवळ जवळ १३ तोळयाचा म्हणजें १३०० रु. चा अैवज होता. दिवाकर घाबरला धांवतच घरी वडिलांकडे आला व म्हणाला, 'काका, काका! आपली एक ट्रंक हरवली हमालानें चढवलीच नाही.' दिवाकराचें अंग उन्हानें व घामानें चिंब झालें होते. चेहरा सुकून गेला होता. पुण्याहून रात्री निघाल्यामुळें, घरीं जाऊन स्नान करून सोमवार सोडावा म्हणून वाटेंत कांहीं खाल्ले नव्हते. तहानेने व भुकेनें जीव कासावीस झाला होता; 'ट्रंक हरवली' हें शब्द कानावर पडतांच वडिलांच्या अंगाची लाहीलाही झाली. संताप अनावर झाला व दिवाकरला भूक लागली असेल,तहान लागली असेल याची कशाचीही आठवण वडिलांना राहिली नाहीं व ते ओरडून म्हणाले 'ट्रंक घरांत आणल्याशिवाय तुला व तुझ्या वहिनीला घरांतच घेणार नाही. असाच स्टेशनवर जा ट्रंकेचा शोध कर.' बिचारा दिवाकर! तसाच निघाला. परत जाणाऱ्या मोटारींत बसला. स्टेशनवर शोध केला. पण काय? सर्पांनें गिळलेले माणिक पुन्हा हाती लागते काय? ट्रंक सांपडली नाहीं. दिवाकर परत आला. वडिलांचा पारा कायमच होता. वहिनी व दिवाकर भीतभीतच घरांत शिरलें काकांचा व दिवाकराच्या आईचा पट्टा सारखा चालूंच होता. शेवटीं दिवाकर म्हणाला, 'काका, आई तुही रागावूं नका माझ्या वहिनीलाही बोलूं नका. तुमच्या पाया पडतो. मी परिक्षा पास झाल्यावर, मला कामधंदा लागल्यावर आपले १२०० रुपयें मी फेडीन. कामधंदा नच मिळाल्यास मोलमजूरी करून आपले पैसे आपणांस देऊन टाकीन. कृपा करून वहिनीला बोलूं नका.

तीन दिवस दिवाकर जेवला नाहीं. चौथे दिवशी त्यास ताप भरला. ५-६ दिवस झाले ताप उतरेना. तापांत बडबड सुरु झाली.' काका, आई, वहिनीवर रागावूं नका. मी पैसे फेडीन ' अशा स्थितींत अेकाअेकी पुण्याहून दिवाकराच्या भावाची तार आली. 'जातीयवादी, हिंदु संस्कृतीच्या नेहमी गोष्टी करतो, म्हणून मला नोकरीवरून काढून टाकले आहे, लौकरच येत आहे.' मग काय विचारता? दुष्काळांत तेरावा महिना. वडिलांचा पट्टा पुनः सुरु झाला. ' आपले बंधुराज देशप्रेमानें नोकरी सोडून बसले. आतां तूं तुझी वहिनी व तुझा आण्णा भीक मागत हिंडा.' हे शब्द दिवाकरच्या कानीं पडतांच, तापानें फणफणारा दिवाकर उठून बसला व वडिलांस म्हणाला, ' काका! अण्णाची नोकरी गेली तरी हरकत नाही. तुम्ही घाबरुं नका, सत्यापुढे परमेश्वरही मान लववील. मग सरकारची किंमत काय? अण्णांनी कांहीं चोरी केली नाहीं. दरोडा घातला नाही. देश, धर्म, संस्कृतीला चिकटून राहणें हें आजकालच्या निधर्मी जगांत पाप आहे. जाऊं दे नोकरी. मी बरा झाल्यावर लोकांच्या घरीं पाणी भरीन, भांडी घाशीन व माझ्या अण्णाचे व वहिनीचें पोषण करीन.' याला म्हणावें धैर्य. अशी चारित्र्य-संपन्न माणसें थोडी कां होईना या जगांत आहेत म्हणून जग तरतें आहे.

कांहीं दिवसांनीं दिवाकर दुखण्यांतून बरा झाला. शिकण्याकरितां आता पुण्यास न जातां हैद्राबाद राज्यांत एका हायस्कूलचें गावीं राहिला. त्याच्या अण्णासही तेथें नोकरी लागली. वहिनी त्याचे बरोबरच होती दिवाकर शाळेंत शिकूं लागला. अभ्यासांत पहिला नंबर, गाण्याची नैसर्गिक आवड, आवाज गोड, त्यामुळें १५ वर्षांचा दिवाकर लवकरच त्या गावांत सर्वांचा आवडता झाला. त्याच्या गायनामुळे दर गुरुवारी क्लब वगैरें ठिकाणी त्याला बोलावणें येऊं लागले. गुरुजवळ थोडेहि शिक्षण न घेतां ताल, स्वर व पेटी वादन व गायन यांत त्यानें बरेच प्राविण्य मिळवलें. रेडिओवर त्याचें कार्यक्रम होऊं लागलें पैसाहि खूप मिळाला. एका वर्षांत त्यानें गेलेल्या दागिन्याचें १२०० रुपये वडिलांस मिळवून दिले. पण ईश्वरेच्छा वेगळीच होती

दिवाकरला अेके दिवशी ताप भरला. विषमाचा ताप होता तो.

वडील, आई किंवा अण्णा यापैकीं गांवी कोणीही नव्हते. फक्त घरांत तो व त्याची लाडकी वहिनी होती. गावांत शिक्षकांना, मुलांना कळले कीं दिवाकर विषमानें आजारी आहे. मुख्याध्यापकांनी घरीं जाऊन त्याची प्रकृती पाहिली. एका डॉक्टरला, डॉक्टर कसला! कसाईच तो! त्यास औषध देण्यास सांगितलें.'पैशाची तुम्हीं काळजी करूं नका'जे बील होईल ते मी देईन.' असें दिवाकरची वहिनी म्हणाली पण डॉक्टर पाषाण हृदयी! आत्तांच्या आत्तां १०० रुपये ठेवा म्हणजे औषध सुरूं करतो नाहीतर हा मुलगा राहिला काय नी गेला काय?' वारे! डॉक्टर! म्हणे 'वैद्यो नारायणो हरि:' असे नरपशु जगांत सुखानें राहतात, माडच्या हवेल्या बाधतात व दिवाकरसारखा शुद्ध, सात्त्विक, प्रेमळ, सत्यान्वेषी मुलगा मात्र दु:खाच्या वणव्यांत होरपळून निघतो! काय हा न्याय! ८ दिवस झाले. वडील, आई व अण्णा यांना निरोप पाठवूनही दुर्दैवानें एकासही निरोप कळला नाहीं वडील ९ वें दिवशीं आलें. रात्री आई आली. दिवाकरला वात झाला होता. वहिनीच्या तोंडचें पाणी पळालें. दिवाकर सारखी बडबड करूं लागला. 'आई! आई! 'बरळत होता. आईला, बाबांना ओळखले 'आई बाबा, माझ्या वहिनीवर रागावूं नका. तिनें चार दिवसांत माझ्या दुखण्यामुळें चूल देखील पेटवली नाहीं.माझ्या अंथरुणाजवळ बसून आहे आहे. तिला कांहीं खायला.द्या तिचें लेकरुं सारखे रडत आहे. त्याला घे आई! माझा अण्णा केव्हा येणार त्याची परीक्षा केव्हां संपते? मला माझा अण्णा भेटेल का? पुन:तार करा काका! मला क्षमा करा मी तुमची सेवा करावी पण आतां काय उपयोग! मी चाललो. अण्णावर रागावूं नका. आई, काका मी येतो आतां. वहिनी! आण्णा आला काय? राम, राम म्हणूं? राम, राम, दत्त, दत्त, म्हणूं? आज मला सोमवार आहे. 'आई मला मांडी दे. वातामध्ये दिवाकर बोलला पुन: झटका आला. पुन: म्हणाला, ' 'आई तुझ्याच पायी मजला सुखें मरु दे ' असें म्हणून दिवाकरनें या स्वार्थी जगाचा निरोप घेतला. थोडच्या वेळानें त्याचें शब्द आलें 'मरण मरावें अभिमन्यूचें, 'मरण मरावे अमरपणाचें., झाले दिवाकर गेला. घरांत अंधार झाला. तो मेला पण त्याचें मरण! मरण नसून अमर जीवनच होय. दिवाकराच्या मृत्यूची बातमी हां हां म्हणतां

सबंध गावांत पसरली. सारा गांव त्याच्या स्मशान यात्रेला लोटला. देवास अशी माणसें आवडतात व म्हणूनच अशाला देव गुणी पण अल्पायुषी करतो. यावेळीं एका इंग्रजी लेखकाचे वाक्य Those who die young are liked by God मला आठवले. यालाच अमर जीवन म्हणतात.

## रामरावांचा ७५ वा वाढदिवस : १५ :

गुंडोपंत रोज सायंकाळीं पुण्यातील सार्वजनिक वाचनालयांत वर्तमानपत्र वाचावयास जात. एके दिवशी त्यानी एका दैनिक पत्रांत एक जाहिरात वाचली. ती अशी—

'एका मध्यम स्थितीतल्या कुटुंबास घरीं सामान आणण्या-नेण्यासाठीं व सांगेल तें काम करण्यासाठीं एक हुषार तरुण पाहिजें. गरजूंनी समक्ष भेटावे.'

पत्ता—रामराव कुलकर्णी, ई १५०६ सदाशिव, पुणें.

गुंडोपंतानीं, ती जाहिरात व पत्ता आपल्या डायरीत टिपून घेतला. दुसरे दिवशीं सकाळीं ८ वाजतां, ते रामरावांच्या घरी आले व हांक मारुन विचारलें. 'रामराव कुलकर्णी येथें रहातात काय?'

रामराव नुकतेच मुखमार्जन करून चहा घेण्याच्या तयारींत होते. हांक ऐकतांच त्यांनीं दार उघडलें व विचारलें. 'कोण तुम्ही ? कसें येणें झालें? बसा, चहा घ्या.' चहापान झाल्यावर गुंडोपंत म्हणाले, 'आपण दैनिक पत्रांत दिलेली जाहिरात मी वाचली. त्या निमित्तानें आपणाकडे आलो आहे.'

'ठीक, ठीक तुमचें नाव काय?'

'माझें नांव गुंडोपंत.'

'कोठें रहातां?'

'कसबा पेठेंत गुंडाच्या गणतीजवळ.'

'तुमचा व्यवसाय काय?'

'कांहीं नाहीं. भीक मागून पोट भरतो.'

'तुम्हांला लिहितां वाचतां येतें काय?

'होय, सातवी नापास आहे.'

'मग आपण मजजवळ राहण्यास तयार आहांत काय?'

'होय.'

'जें काम सांगू तें बिनबोभाट करावें लागेल.'

'अवश्य.'

'पगार काय घ्याल?'

'कांहीं नाहीं. फक्त दोन वेळां जेवण व वर्षाचे कपडे.'

'ठीक आहे. तर मग आजपासून येथे रहा.'

गुंडोपंत रामरावांच्या घरी राहूं लागलें. सांगितलेली कामें बिनबोभाट होऊं लागलीं. रामराव बेहद्द खुष झाले. हा मनुष्य हातांत धरून आपणांस लोकांकडून पैसे उकळतां येतील. पण ते कसें? थोडावेळ विचार करून ते एकदम मनांत म्हणालें, ठीक आहे युक्ती व योजना! आजकाल गांवोंगांवीं ५० वर्षाचे ७५ वर्षाचें ६० वर्षाचें, समारंभाचें खूळ खूप माजले आहे. त्याचा फायदा घ्यावा, असें म्हणून त्यांनीं गुंडोपंताना हांक मारली व म्हणाले. 'गुंडोपंत आज १० वाजतां दैनिक प्रेस मध्यें जा. त्याच्या मालकाला भेटून ही जाहिरात त्यांना छापण्यास सांगा. पैसे माझ्या नांवावर टीपा म्हणावे.'

गुंडोपंत उठले, छापखान्यात गेले. ती जाहिरात प्रेस मालकाला दाखविली.

दुसरे दिवशीं ती जाहिरात वर्तमानपत्रांत फडकली, ती अशी.

## रामरावांचा ७५ वा वाढदिवस

येत्या जानेवारींत रामरावांना ७५ संपून ते ७६ व्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. ते इथलेंच रहिवासी असून, त्यांची थोर कामगिरी, लेखन व्यासंग, गोड स्वभाव घरची गरिबी, व वाढता प्रपंच, मनमिळाऊपणा इत्यादि सर्व पुणेकरांना माहीतच आहेत.

रोज सकाळीं लोकांना घरी जाऊन त्यांना भाजीपाला आणून देणे, कोणी आजारी पडल्यास त्यांची दवाखान्यांत जाऊन विनामोबदला सुश्रूषा करणे, सार्वजनिक कार्यात भाग घेणे, हें सर्वांना माहीतच आहे. त्यानी संबंध आयुष्यांत एकच कादंबरी लिहिली. अनेक ग्रंथ त्यानीं लिहिलें असतें. पण घरच्या परिस्थितीमुळें त्यांना तें शक्य झालें नाहीं.

म्हणून अशा सद्गृहस्थांचा ७५ वा वाढदिवस साजरा करणें येथील पुणेकरांचें कर्तव्य होय.

ज्यांना ज्यांना त्यांचेबद्दल सहानुभूति आहे. त्यांनी 'दैनिक प्रेस' मध्यें देणगी पाठवावी.

देणगीदारांचीं नावें प्रसिद्ध केलीं जातील.

त्यांच्या साहित्याची, सुस्वभावाची, व्यक्तिमत्वाविषयीं उद्यापासून वर्तमानपत्राच्या ३ऱ्या पानावर ३ ऱ्या कॉलमवर वाचकांसाठीं माहिती देण्यांत येईल, त्याचा अवश्य फायदा घ्यावा.

हितचिंतक संपादक, दैनिक प्रेस पुणें.

रामरावांनीं गुंडोपंतांना हातीं धरून रोज, वरिष्ठांच्या व्यापाऱ्यांच्या, अशिक्षितांच्या, मध्ययवर्गीयांच्या गांठी भेटी घेऊन, रामरावाचें तिखटमीठ लावून वर्णन करून नित्य ५०–१०० रुपये गोळा करावें.

प्रेस मालकाचें व रामरावांचें मित्रत्त्व असल्यामुळें रामरावानें प्रेस मालकास सांगितले.

'तुम्ही तुमच्या पत्रांत माझ्याबद्दल ५०० रु. देणगी जाहीर करा. वचने किं दरिद्रता, देणें न घेणें. प्रेस तुमच्याच मालकीचे असल्यामुळे जाहिरातीचा खर्च नाहीं. पण त्यामुळे आपल्या (शाब्दिक) औदार्याची हकीकत वाचून इतरांनाहि स्फूर्ति येईल व मलाहि मदत होईल. माझा गौरवहि अनायासे होईल.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवसशीं प्रेस मालकांनी आपल्या नावासमोर ५०० रु देणगी रामरावाच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त जाहीर केली. (अर्थात् ती दिली मात्र नाहीं)

प्रेस मालकांच्या कांहीं मित्रांनी अंधानुकरण म्हणा वा आपलें नांव

वर्तमानपत्रांत फडकावें म्हणून म्हणा ५०-१०० लोकांच्या देणग्या नावानिशी जाहीर केल्या. हां हां म्हणतां १५००० रु. देणगीरुपानें जमलें.

इतक्यावरहि रामरावांचें समाधान झाले नाहीं त्यांनीं गुंडोपंताना गावोंगावीं पाठविलें. तेथील वकिलांचीं (ज्याची Practice ५ रु. महिनाहि नसेल) अशाची, प्रतिष्ठित गुंड पुढाऱ्यांची, अधिकाऱ्यांची भेट घेतली व दैनिक प्रेस मध्ये जाहीर झालेल्या देणगीदारांचीं यादी पण दाखविली.

आमचा भारत दानाविषयीं गतानुगतिक आहे हें सांगावयास कां हवे! त्या त्या गांवीहि गुडोपंताच्या धूर्तपणानें कुठे १००० कुठें १५०० अशी वर्गणी गोळा झाली.

गुंडोपंतांनीं त्यांतून थोडासा भाग प्रतिष्ठित गुंडांच्या तोंडावर फेकून बाकी रकम सत्कार प्रसंगीं देण्यासाठीं जमा करून जवळ ठेवली.

पुण्यांत रामरावांचा सत्कार झाला. मंगल कार्यालय भाड्यानें घेतले. प्रत्येक सस्थेतर्फे घालण्यासाठीं हार गुंडोपंतांनीच स्वखर्चानें (हलवायाच्या घरावर) पुरविलें. सभागृह खच्चून भरलें. वक्त्यांची गौरवपर भाषणें झालीं. रामरावांना १५००० रु. ची थैली अर्पण केली गेली. टाळ्यांचा कडकडाट झाला.

रामराव बोलावयास उठले.

'स्त्री पुरुष सज्जन हो! आपण माझ्या केलेल्या गौरवाला मी पात्र नाहीं. हें आपले प्रेम आहें. मी आजपर्यंत जी कांहीं सेवा केली ती परमेश्वरालाच माहींत. तुमचें प्रेमच या सत्काराशीं कारणीभूत आहे. प्रेमाला मोल नाहीं. प्रेम आंधळे असतें, हें मुला आजच्या सत्कारप्रसंगीं कळलें. खरें आहे, खरे आहें श्रीति ओरडलें रामरावाच्या डोळ्यांत आसवें आली. श्रोतेहि रडले! समारभ आटोपला. रामरावांचा कौतुक ग्रंथ इथें पूर्ण झाला.

पुढें गावोंगांवीं लहान मोठें समारंभ झालें गावांतून जमा केलेले पैसें रामरावांना देण्यांत आले.

सभागृहांत कुजवुज सुरू झाली.

'काय राव! आपण या माणसाला कधीं बी पाहिलें नाहीं! पण आपन १००-१०० रुपये वकीलाच्या सांगण्यावरून डोळे झांकून दिलें,

लई लबाड वकील नी पुढारी! आपणास्नी दगा दिला. गावांत एक भी मानूस रामरावांना ओळखत नाहीं. आपल्या गावांतला एकभी वकील त्याचे बद्दल बोलला नाहीं, समदें बोलणारे बाहेरचें पुण्याचेंच, आपल्या घरीं खायला भी दानें नाहींत. अन या पुढाऱ्यांनीं आपणास लई बुडविलें.' असें बोलून सर्व बाहेर पडले.

रामरावांना, या निरनिराळ्या ठिकाणीं झालेल्या सत्कार सभारंभ प्रसंगीं एकूण २०००० रु. मिळाले.

गुंडोपंताना २०००, प्रेस मालकांना ५००० व १ हजार रु. दिवाबत्ती मजूर वगैरेना, जाऊन रामरावांना १२००० रु. नगद मिळालें.

रामराव मनांत म्हणालें.

' दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये. '

गुंडोपंतांची कामगिरी संपल्यामुळें त्यांना घरचा रस्ता दाखविला गेला.

रामराव आपल्या शताब्दीची आतुरतेनें वाट पहात आहेत. आपलें शरीर तोपर्यंत टिकून रहावे व धडधाकट असावें म्हणून रोज Tonic व ब्रँडीच्या बाटल्या चोरुन घेत आहेत अशी वदंता आहे.

धाराशिव २०।१२।५७

## आमची ठमाकाकू

आमच्या ठमाकाकूंचें सर्वच कांही विलक्षण ! शरीर, रंग, रुप, स्वभाव सर्वच कांही और. शरीर हें जरी देवाचें देणें असलें व त्यांत नांवें ठेवण्यांत शहाणपणा नसला तरी पुढील कथानकाला तें वर्णन पोषक, म्हणूनच तें देणें क्रमप्राप्त होय, यांत लेखकाचा कांहीच दोष नसून, काकूंच्या शरीर ठेवणीचा गुण होय !

एका भव्य, धिप्पाड श्रीमंत बाईचें वर्णन एका कवीनें आपल्या एका काव्यांत केले आहे. तें तंतोतंत आमच्या ठमाकाकूंना लागू पडतें, म्हणून

तें येथें देण्यांत औचित्यच आहे. ( कवीची क्षमा मागून ) ‘ ठमाकाकूंचे पाय भले मोठे असून, पायाच्या बोटांत जोडवें शोभत होते. पायाच्या दोन्हीं पोटऱ्या, खालून जाड व वरून निमुळत्या असल्यामुळें उलटे नंदादीपच लावल्याचा भास होत होता, अंगांत भरभक्कम वात शिरल्यामुळे तिची तनु स्थूल बनली होती, काळी चंद्रकळा तिनें नेसली होती, ती तिच्या कृष्णवर्णांत समरस झाली होती. कमरेला घातलेला कमरपट्टा सोन्याचा असून, तो तीन हात लांब होता. उजव्या हातांत तोटीचा गडू होता. हातांत दहा दहा कांकणें होती. पस्तीस तोळयाची दंडकडी होती. हात हत्तीच्या सोंडेएवढे लांब होते अंगांत अडीच खणाची कंचुकी घातली असूनहि, तिचें अवयव पूर्णपणें झांकले गेले नव्हते, गळयांत दागिन्यांची एकच दाटी झाली होती. श्रीमंतीला एकच उणीव होती ती म्हणजे गळयातील पोत मात्र कृष्णमण्याची होती.

सह्याद्रि पर्वताला लाजवील अशी तिची कटी रुंद होती, म्हणून सिंहकटी सिंहांनीं सह्याद्रि पर्वत सोडून इच्याच कटीचा आश्रय करण्याचा ठराव पास केला होता. ओठ, हनुवटी, दोन गाल व पाचवें उथळ भाल या पंचवटीचा आश्रय केल्यामुळें तिचा नासीक भाग त्र्यंबकेश्वरी गेला नव्हता. नाकांत मोत्याची नथ खुलून दिसत होती व तिला हिरकणीची जोड होती. चालणें बघितले तर गजगतीचा दृष्टांतहि अपुराच पडतो. गजाच्या पाठीवर जी अंबारी असते ती ज्याप्रमाणें गज चालतांना एकसारखी डोलतें, त्याप्रमाणें तीं डुलत डुलत चालत होती.

एवढया लांबलचक—पणं अद्भुत रसवर्णनानें वाचकांचा रसभंग होऊन त्यांना कंटाळवाणे वाटेल, हीं लेखकाला मुळीच भीति नाही असो. शरीराचें मार्दव पाहिल्यावर भाषणांत कठोरपणा येणें स्वाभाविकच होते. झाशींची लक्ष्मी म्हणावी तर त्या शौर्यसौन्दर्यादि गुणांचा येथें पत्ताच नव्हता, स्वभावानें कोणत्याहि सज्जन स्त्रीशी तुलना करावी तर तेही अशक्य. हें पुढील काकूंच्या वर्णनावरून कळेलच. ‘ तुझ्या सम तूंच ’ एवढे येथें म्हटलें म्हणजे पुरें.

एवंगुणविशिष्ट ठमाकाकूंचे वर्णन करून, ती होती तरी कोण ? असें विचाराल तर पहा.

तिचें पति एक रेल्वे अधिकारी होतें. त्यामुळें नोकर-चाकर, स्वयंपाकी वगैरेंना मुळींच वाण नव्हती, काकूंच्या पतिचा ( कृष्णराव ) धाक दरारा सर्व स्टाफवर भयंकर होता. पण घरांत मात्र ते ' अल्लाची गाय ' बनले होते.

सिंहिणीची गर्जना ऐकली कीं, ही ' अल्लाची गाय ' थरथरा कांपत असे. नोकर चाकर, स्वयंपाकी पहिल्यानें ऐकत पण पुढें पुढे तेहि ठमाकाकूंच्या स्वभावाला कंटाळले. व शेवटीं तर अगदीच बिथरले. त्याचों कारणमीमांसा खालील संवादांत सांपडेल. हा संवाद वाचकांचे मनोरंजन करून या कथेचेहि रहस्यहि उलगडील.

ठमाकाकू–(स्वयंपाकी रामप्पा यांस ) काय अप्पा ! पाणी भरले ? बंब पेटविला ? चुलींत जाळ आहे काय ? झाडलोट झालीं ना?

रामप्पा–होय बाईसाहेब !

ठमाकाकू–हां ! आतां बोघोणें घे. ठेव चुलीवर, त्यांत तेल घाल ! फोडणी टाक ! हां आटप लवकर!

रामप्पा–होय बाईसाहेब !

ठमामाकू :–जाळ लाव ! ( इतक्यांत आमटीचे पाणी पडतांच जाळ उठतो ! ) काय हें ! अक्कल कोठें गेली? दिसत नाहीं ?

रामप्पा :– तुम्हीच जाळ लावा म्हणून सांगितलें, त्यांत माझो काय चूक आहे.

ठमाकाकू : गाढवा ! मी सांगितलें म्हणून काय झाले ? तुझी अक्कल कोठे गेली ? बरें कणिक तिंब! तवा ठेव! जाळ लाव हं झाल्या पोळ्या? साऱ्या जळून गेल्या कीं ! जाळ कां लावला ? तुझो पगार या महिन्याचा ४ रु. कमी मिळेल.

० ० ० ०

एकदां बाजारांतून तेल आणावयास सांगितले. चपराशानें बाटलीत तेल आणले व दारात ठेवलें, ठमाकाकूंचीं लाथ लागली. बाटली फुटली. तेल सांडलें, झाले ! राम्या ! लाज नाहीं वाटत बाटलां मध्यें ठेवायला? जा बाटली स्वतःच्या पैशाची घेऊन त्यांत तेलहि पण आण.

रामप्पा : मजजवळ पैसे नाहींत, बाईसाहेब !

ठमाकाकू : वरं हे घे पैसे. पण पगारातून एवढे कमी मिळतील.

० ० ० ०

ठमाकाकूंना दोन मुलें व तीन मुली होत्या. मुलेंहि त्याच वळणावर गेली होती. अस्सल दांडगी, व्रात्य, चोर व खोटें बोलण्यांत अट्टल दरोडेखोरानांही लाजविणारी होती. एकदां गम्मत झाली!

शेजारच्या घरमालकांची मुलांना खेळण्याची अेक मोटार होती. ती हरवलीं. पाहून पाहून शेजारीण थकली. अेकें दिवशीं ठमाकाकूंच्या मुलांना ही मोटार सांपडली. ती त्या शेजारणीनें घरांत आणली. मुलांनीं ठमाकाकूं जवळ गोष्ट काढली, ठमाकाकू संतापल्या. शिव्या हासडूं लागल्या. 'परवा मुंबईला ते गेले होतें, त्यनी माझ्या मुलांना नवी मोटार आणली. दोन दिवस झालें नाही तोंच शेजाऱ्यांनीं चोरली? सारे भाडेकरी, मालक, सारे चोर!'

हें प्रकरण पतिराजांच्या कानांवर घातले. पतिराज शुद्ध बुद्ध असल्यामुळें त्यांनीं विचार न करितां घरमालकाला बोलाविलें.

कृष्णराव : आमच्या मुलांची मोटार तुमच्या मंडळींनी हिसकावून नेली.

मालक : मोटार तुम्हीं कोठून व केव्हा आणली?

कृष्णराव : तें मला माहीत नाहीं.

मालक : तुमची मंडळी म्हणाली, ती तुम्ही मुंबईहून परवां आणली

(ठमाकाकूंचा चेहरा काळवंडला)

कृष्णराव : मूलास : मोटार कोठून आणलीस?

मुलगा : मला सांपडली.

कृष्णराव : कोठें ?

मुलगा : मालकांच्या बागेंत.

झाले! मग तर ठमाकाकूंचें दाभाडेंच बसलें. तरी पण त्या साऱ्या हसूं लागल्या. इतके झालें तरी मोटार मालकाच्या बाईनेंच चोरली हें सत्य कायमच !

● ● ० ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम आमची ठमाकाकू. वि: ..................५५
क्रमांक .................. नों: दि: ..............

१ तारखेस पगार आला. दोन्ही नोकरांच्या पगारांतून ४ रु व १ रु. काढून त्यांना पगार दिला. झाले! गोष्टी भलत्याच थरावर गेल्या. नौकर चाकर संतापलें त्यांनीं घरीं येणें बंद केलें. सर्व कामें ठमाकाकू करूं लागल्या। झाडलोटीपासून अंथरूण घालीपर्यंत ठमाकाकूंकडे सर्वाधिकार आले. कोणी विचारले,

'ठमाकाकू! तुम्ही कां झाडतां?' ठमाकाकू उत्तरल्या, 'मला नाहीं दुसऱ्याचें झाडणें पटत! झाडणेंच काय सर्व कामें मीच करतें.'

o o o o

पतीनें अेके दिवशीं बाजारांतून तांदूळ विकत आणले. ते नवे निघाले. ठमाकाकू संतापल्या. गाडी पाहून स्टेशनमास्तर कृष्णराव घरीं आले. दार बंद. दार उघडा ! कोण आहे? कृष्णराव उत्तरले—'मी'

ठमाकाकू : उघडीत नाहीं दार. [काल तांदूळ कसें आणलेत परत करा! लाज नाहीं वाटत? दोन तास उभे रहा. तांदूळ दुसरें चांगलें आणले तर दार उघडीन. पती सर्द झाला! करतो काय बिचारा!

o o o o

इकडे पगार कमी मिळाल्यामुळें नोकरांनी वर तक्रार केली! चौकशी झाली. स्टेशनमास्तर दोषी ठरलें.

आठ दिवसांत तारेनें order आली.

"You are dismissed. Hand over charge at once to Dhongde, staion master.' तार वाचतांच स्टेशन मास्तरांच्या डोळ्यापुढें काजवे चमकूं लागले. तोंडचें पाणी पळालें. घरी आलें ठमाकाकूंना हें कळलें. संतापल्या! वरिष्ठ अधिकाऱ्यांस शिव्याची लाखोली वाहिली. पतिराज! तुम्ही मूर्ख आहांत! म्हणून नोकरी गेली.

o o o o

दुसरें दिवशीं ठमाकाकूंचें बिऱ्हाड हललें. त्या तेथून मुलांसह कोठे गेल्या व कोणत्या गांवीं गेल्या हें अद्याप कळलें नाहीं. गांवचें लोक, नोकर, शेजारी घरांतील कुत्रीं मांजरं या सर्वांना आनंद झाला! कांहीं म्हणाले,

'स्वभावो दुरतिक्रमः' अशा होत्या आमच्या ठमाकाकू! अशा स्वभावाची माणसें जन्माला घालतानां ब्रह्मदेवाला झोंप लागली असावी हेच खरें!

पुणें २३।२।५७

## अधिकारी : १७ :

श्रीधररावांना नुकतीच बढती होऊन डे. इन्स्पेक्टरची जागा मिळाली होती. तैनातीला एक शिपाई व प्रवासभत्ता ३ रु. रोज मिळणार होता. येत्या ७ तारखेपासून त्यांना फिरतीवर जाणें भाग होतें. प्रथमच हें जबाबदारीचें काम आपणाला कसें सांभाळतां येईल ही काळजी त्यांना चैन पडूं देईना.

७ फेब्रुवारीला ते आपला चपराशी घेऊन दौऱ्यावर निघाले. पहिल्यानें बस स्टेजेसची गांवें किंवा रेल्वेवरची गांवें करावी असें ठरवून ते रेल्वेनें एका गांवीं आले.

स्टेशनपासून गांव २ मैलांवर होतें. शिपायानें सामान डोक्यावर घेतलें व श्रीधरराव पायीं चालूं लागले. कोणाच्या घरीं न उतरता एकदम त्यांनी शाळेकडेच मोर्चा वळविला व ठीक ९ वाजतां शाळेंत पाय ठेवला. कर्मधर्मसंयोगानें त्यावेळीं तेथें शाळेंतील शिपाई व कांहीं मुलेंच होतीं.

शिक्षकांचा पत्ता नव्हता.

साहेबांनीं चपराशाला विचारले, 'कोठें आहेत मास्तरसाहेब?' चपराशी घाबरला. खरें सांगावें कां खोटें, घाबरून उत्तर दिलें, 'आत्ताच त्यांची मुलगी आजारी असल्याचें कळल्यावर, ते आपल्या गांवीं सकाळींच येथून गेले आहेत.' अधिकारी धूर्त होता. त्यांनी एका प्रौढ मुलांस जवळ बोलाविलें व त्यास विचारले, 'तुझें गुरुजी कोठें आहेत?' शुद्ध अंतःकरणाच्या मुलाने उत्तर दिलें 'गुरुजी आठ दिवसांपासून शाळेत येत नाहींत. कोठे गेले मला माहीत नाहीं.'

झालें. श्रीधरराव संतापले. व म्हणाले, 'चपराशाला आपलेसें करून शिक्षक असें वर्तन करतात व दोघेही फुकटचा पगार खातात.' इतक्यांत

गांवातील पाटील, कुलकर्णी कांहीं मडळी घेऊन श्रीधररावांना भेटण्यांसाठीं शाळेंत आले. नमस्कार चमत्कार झाल्यावर पाटील साहेब म्हणालें, ' साहेब! आमच्या येथील मास्तरांना ताबडतोब बडतर्फ करा. नाहीतर आम्ही तुमची शिकायत वर करूं. '

इन्स्पेक्टरला त्यांचे बोलणें. व यापूर्वी प्रत्यक्ष घडलेला प्रकार यांत मेळ बसल्यामुळें शिक्षकांचा अपराध आहे हें म्हणणें पटले. पण त्यांच्या मनांत विचार आला, त्यांचे म्हणणें, मुलाचें निष्कपट रितीनें खरें बोलणें, यावरून शिक्षकाची चूक उघडकीस येते, पण—आपण या अधिकार पदावर पहिल्यानेंच आलो व ' प्रथमग्रासे मक्षिकापातः' या न्यायानेंच शिक्षकाच्या हकालपट्टीचा प्रसंग दुर्दैवानें आपणांवर यावा हे त्यांच्या चांगल्या सुसंस्कृत मनाला पटेना. पण गोष्ट मात्र सत्य आहे.

' काय करावे? यांतून तोड कशी काढावी? काडी मोडूं नये व डोळाहि फुटूं नये ' अशी त्यांची विचारसरणी असल्यामुळें व शक्य तो कोणाच्या पोटावर पाय देऊं नये ही सत्वृत्ती अंगीं असल्यामुळें त्यांना मोठा प्रश्न पडला.

थोडा विचार करून त्यांनी पाटील कुलकर्ण्यांना सांगितले, ' तुम्ही कांही काळजी करूं नका, मी सर्व व्यवस्था करतो ' इतक्यांत आठ दिवस गांवी गेलेल्या शिक्षकाला, इन्स्पेक्टरसाहेब शाळेंत आल्याची वार्ता कुणी तरी सांगितली. तो तडक शाळेंत आला व गोरामोरा चेहरा करून अधिकाऱ्यांच्या पायावर त्यानें लोळण घेतली व म्हणाला, साहेब ! क्षमा करा, मी अपराधी आहे.'

श्रीधररावांना दया आली, पण कर्तव्यनिष्ठा त्यांच्यांत असल्यामुळें ' कर्तव्य कीं दया? ' हा प्रश्न त्यांना पडला. या ' शिक्षकाचा अपराध खरा आहे, गांवच्या लोकांचें म्हणणें व त्याचप्रमाणें त्या मुलाचेंहि म्हणणें खरे आहे. याला शिक्षा देण्यास कांहीच हरकत नाही. त्याचें पातकहि मला लागणार नाहीं हें खरे ' पण भूतदयेनें श्रीधररावांचें हृदय कळवळलें.

' असे वा यापेक्षांहि अनंत पटीनें अपराध करून संभावितपणें वावरणारें (चोर)सद्गृहस्थ आमच्या नित्य अवलोकनांत येतात. त्यापुढें

या गरीब शिक्षकाचा अपराध किती क्षुल्लक !' पण 'गुन्हेगारांना शिक्षा दिल्यापेक्षां एकादेवेळीं क्षमा केली तर त्याचें वर्तन सुधारेल' ही भावना त्या अधिकाऱ्याच्या डोक्यांत आली व त्याला थोडें समाधान वाटलें.

'उठा! मास्तरसाहेब! खरें सांगा, तुम्हांला येथून जाऊन किती दिवस झाले?'

'आठ दिवस, साहेब!'

'तुम्ही पाटील–कुलकर्ण्यांच्या कानांवर ही गोष्ट घातली काय?

'नाही साहेब'

'तुमचा मुलगा आजारी आहे काय?'

'होय साहेब!'

'मग तुम्हीं रजा कां मागितली नाहींत ? कोणाला न कळत जावें व पुनः कामावर येऊन तितक्या स्वाक्षऱ्या करून हजेरी मांडावी. कोण पाहते? असें तुम्हाला वाटलें ही लबाडी आहे कीं नाहीं ?'

'लबाडी आहे साहेब!'

'मग तुम्हांला कामावरून काढणें योग्य की अयोग्य?'

'योग्य होय, साहेब!'

'तर मी दिलेल्या प्रश्नांची उत्तरें लेखी द्या.' असें म्हणून शिक्षकांकडून सर्व गोष्टीं लिहून घेतल्या व श्रीधररावांनीं त्यास सांगितलें, 'आजपासून तुम्हांला suspend केलें आहे पण दुसरा शिक्षक येथें पाठवीपर्यंत तुम्ही विनावेतन काम केलें पाहिजे.' असें म्हणून श्रीधरराव निघून गेले.

त्यांनी रेल्वे स्टेशन गांठलें, इतक्यांत धापा टाकीत ते शिक्षक आले. पायावर मस्तक ठेवून म्हणाले, 'महाराज मीअपराधी आहे. क्षमा करा. आतां यापुढे मी असें करणार नाहीं. केल्यास मला कामावरून काढून टाका. पण एक वेळ क्षमा करा.' श्रीधररावांच्याहि डोळयांतून पाणी आलें, हृदय कळवळलें व त्या शिक्षकांस ते म्हणाले, 'ठीक आहे. एक महिन्यांनीं मी पुनः तपासणीला येईन. जर तुमची वागणूक ठीक दिसली तर क्षमा करीन. नसतां कामावरून काढीन. पुढें लक्षांत ठेवा. जा काम करूं लागा.'

शिक्षकाचें डोळे कृतज्ञतेनें भरून आले. पश्चात्तापानें हृदयपालट

झाला व ' अधिकारी असावे तर असें.' असे मनांत म्हणून त्यांच्या चरणीं पुन: मस्तक ठेवलें व ढळढळां रडूं लागला.

एक महिन्यानंतर पुन: अधिकारी आले. शाळा तपासली, मुलांचे काम समाधानकारक दिसले. पाटील कुलकर्णी लगेच आले व म्हणाले,

' महाराज! आम्हाला हाच शिक्षक हवा आहे. याची बदली करूं नका. त्याला कामावरून काढून टाका हें शब्द आम्ही परत घेतो. आमची विनंती मान्य करा, हा आमचा लेखी अर्ज घ्या.' श्रीधररावांना समाधान झाले. शिक्षकाला आपला अक्षम्य अपराध असूनही श्रीधररावांनी आपल्यावर दया केली म्हणून कृतज्ञता वाटली. मनांत गांवकरी व शिक्षक म्हणालें.

' अधिकारी असावा तर असा!'

कर्तव्यकर्म करीत असतांहि कोणाच्या पोटावर पाय न देतां दया दाखविणारे असे अधिकारी किती असतील?

धाराशीव ५।४।५७ (प्रसाद–एप्रिल–१९५७)

# सत्वशील हरिश्चंद्र : १८ :

हरिश्चंद्र हे शीर्षक पहाताच विश्वामित्राने स्वप्नांत राज्यदान मागून, दुसरे दिवशीं तें प्रत्यक्षांत आणण्यासाठीं, तो ब्राह्मणवेषानें सकाळीं आला, व राज्यदान दिल्यामुळे, आपल्या बायकामुलांसह देशोधडीला लागला, दानावरची दक्षिणा काशीस जाऊन प्रतिज्ञा पूर्ण करणाऱ्या, राजा हरिश्चंद्राची ही कथा आहे अशीं जर कोणी अटकळ बांधली तर ती साफ चुकीची ठरेल.

या कथेचा नायक दरिद्री हरिश्चंद्र केव्हांहि राजा नव्हता. व या स्वार्थी व कपटीं जगांत, त्याला राजा होण्याचीं कदाचित इच्छा झाली असती, तरी ती पूर्ण होणें शक्य नव्हते.

० ० ० ०

दरिद्री हरिश्चंद्राचें कुटुंब फार मोठें होतें पण श्रीमंत नव्हते. आई-बाप, दोन भाऊ तीन बहिणी, असा त्याचा घरचा विस्तार होता. रहायला ना घर ना दार, आकाश हें पांघरूण, धरणीमाता हेच अंथरुण, दिशा ही वस्त्रें, अशी साधूसारखी त्याची अवस्था होती, पण यांत 'ज्ञानामृतं भोजनं' याची वाण होती.

दिवसभर श्रम करून कांहीं पोटाला मिळवावे तर अंगीं कुशलता असूनहि काम मिळत नव्हते. त्यामुळें आठ आठ दिवस पोटाला अन्न मिळणें दुरापास्त होतें. ते सर्व कुटुंब भुकेनें तडफडत होतें पोट पाठीशीं लागलें होते. हरिश्चंद्र सर्वांत वडील मुलगा असल्यामुळे त्याला काय करावें सुचत नव्हते. दिङमूढ होऊन काळजींनें त्याच्या काळजाला भोकें पडली होतीं.

आईबाप, म्हातारपणामुळें आंधळे झालें होते. एके दिवशीं ते आपल्या हरिश्चंद्राला घेऊन गावांत भिक्षा मागण्यास आले.

एका श्रीमंताच्या घरी, त्या दिवशी, त्याच्या मुलाचे लग्न होते. पंक्तीवर पंक्ती उठत होत्या जेवणं झाल्यावर माजून अन्न टाकलेल्या पक्वान्नांच्या उष्टया पत्रावळीं यांचा ढीग रस्त्यावर बेदरकारपणें फेकला गेला होता.

आमचा हरिश्चंद्र, आपल्या आंधळया आईबापांसह तेथें आला, व त्या फेकलेल्या पक्वान्नांतून दोन चार लाडू व थोडासा भात तो घेणार, इतक्यांत घरमालकाच्या शिपायांनी दोन काठ्या त्या भिकाऱ्यावर घातल्या, आंधळा म्हातारा मटकन खाली बसला. त्याचें कंबरडेच मोडले, व तो तेथेंच श्रीमंताच्या दारासमोर घेरी येऊन पडला. हरिश्चंद्र रडूं लागला. त्याची आईहि रडूं लागली. व दोघेहि रस्त्यावर बसून म्हाताऱ्याची सुश्रुषा करूं लागले.

क तासानंतर नवरदेवाची वरात निघणार होती. मध्यें तर म्हातारा पडलेला.

शिपायांना हुकूम झाला

'लवकर मोटारी, तांगे, बॅन्ड, वाजंत्री आणवा. आपल्या दारा-

पासून निदान एक मैल तरी वाहनांची रांग सारखी लागली पाहिजे. वरात थाटांत निघाली पाहिजे.

शिपाई उठले. पहातात तो दारापुढेंच म्हातारा मध्येंच पडलेला ! मालकांच्या कानावर ही गोष्ट घातली, 'कोणी भिकारडा म्हातारा आपल्या दारापुढें पडला आहे. दारापुढे वाहनें आणता येणें शक्य नाहीं. 'काय म्हणता ? गध्यांनो ! एक भिकारी दारापुढे पडला आहे, अन वाहनें आणता येणार नाहीत ? मारा लाथा त्या भिकारड्याला ! अन् फरफर ओढीत मेलेल्या कुत्र्याप्रमाणें, त्या जवळच्या ओढ्यांत द्या फेकून ! पहाता काय ? माझ्या मुलाची वरात ! आणि हें क्षुल्लक विघ्न ! जा. मी सांगतो तसें करा. "यथा राजा तथा प्रजा"

सांगितल्या कामाचें. व दिल्या शिदोरीचे हें मिंधे नोकर. काय करणार ? एकदम धांवत आले, व त्या म्हाताऱ्याच्या तंगडीला धरून ओढूं लागले. हरिश्चंद्रानें व त्याच्या आईनें हे पहातांच, ते पटापटा शिपायाच्या पायां पडूं लागले.

महाराज ! आपण असें गुरासारखे माणसाला ओढूं नका. आम्हीं नेतो आमच्या म्हाताऱ्याला येथून.

पण शिपाई मगरूर ! त्यांना कुठला विचार नि विवेक ? कुठला दम ? मदांध शेटजीच्या तामसी अन्नानें माजलेलें ते ! 'चल, हो बाजूला' असें म्हणून त्या शिपायांनी, त्या म्हाताऱ्याची तंगडी धरली, व फरफर ओढीत जोरानें त्या म्हाताऱ्यास नदींत फेकून दिले.

इकडे ठरल्याप्रमाणें श्रीमंतांची वरात थाटानें वाजत गाजत निघालीं व लग्न सोहळा आनंदांत निर्विघ्नपणानें पार पडला.

म्हातारा बाप मेल्यामुळें हरिश्चंद्राला फार वाईट वाटले. घरांत उपासमार कायमच काय करावें!

'परमेश्वरा ! माझा किती अंत पहाणार ! तुला अनाथांचा नाथ म्हणतात. दीनदलीतांचा कनवाळू म्हणतात. जनाबाईचे तूं दळण दळलेंस म्हणें ! दामाजीकरितां महार बनलास ! चोख्याच्या बायकोचें बाळंतपण केलेस ! द्रौपदीला वस्त्र पुरवून तिची लाज राखलीस. या

सर्व पुराणांतील गप्पाच काय ? असो ! मर्जी तुझी ! ठेविले अनंते तैसेचि रहावे चित्ती असू द्यावे समाधान ' हे तुकाबारायाचे वचन मी एका वारकऱ्याच्या कीर्तनांत ऐकले. त्याप्रमाणें समाधान मानण्यांतच मला सुख मिळेल. पण हे वचन हृदयांत ठेवून कां माझ्या कुटुंबाचें हाल-दैन्य नाहीसें होतील ? नाहीं कांहींतरी हातपाय हालविलेंच पाहिजेत ' अशी मनाची समजूत घालून हरिश्चंद्र उठला.

( तो पुण्यातील एका महारवाड्यात रहात होता. ) बुधवार चौकांत आला. एका दुकानासमोर कांही मुलें वर्तमान पत्रें हातांत घेऊन मोठ्यानें ओरडत होती.

' तरुण भारत, सकाळ, केसरी.

**आजच्या अंकात एका आंधळ्या म्हाताऱ्याचा अत्यंत दुःखद शेवट ! भांडवल शाहीच उन्मत्तपणा ! वाचा, नदींत आंधळ्याचें प्रेत !**

हे शब्द कानीं पडतांच हरिश्चंद्राच्या अंगावर शहारे आले, तो वर्तमानपत्रें विकणाऱ्या मुलास म्हणाला ' तुम्हीं हे काय म्हणता ? हे कसे कोठून कळले ? मला सांगा. मला वाचता येतें मला तें पत्र पाहूं द्या

' अरे ! भिकारड्या ! टाक एक आणा फुकटचें आहे काय वर्तमान-पत्र ? ' हे शब्द दुकानदारानें ऐकले त्यानें हरिश्चंद्राला जवळ बोला-विले, व म्हणाला-' बाळ ! तुला हे वर्तमान पत्र हवे कां ? तूं असें कर ही घे १० वर्तमानपत्रे येथें उभा रहा. व म्हण एका आंधळ्या म्हाताऱ्याचा खून ! नदीत प्रेत सांपडलें ! रहस्य स्फोट ! वाचा ! वाचा ! ' म्हणजे तुझी पत्रें विकतील व तुला पोटाला ४-८ आणें सहज मिळतील.

बरें ! बरें ! असें म्हणून त्या मुलानें वर्तमानपत्रें घेतली. आपल्याच प्रेमळ जन्मदात्या बापाच्या, करुणाजनक अंताची ती बातमी तो मोठ्यानें ओरडूं लागला ! डोळ्यातून टपटपा अश्रूंचा पूर वाहूं लागला ! त्याचे एकहि पत्र कुणी घेतले नाही. दुकानदाराचें लक्ष त्या मुलाकडे गेलें ते दृश्य त्याला पाहवेना. त्या मुलाला त्यानी जवळ बोलाविलें व म्हणाला ' बाळ रडतोस का ? त्या म्हाताऱ्याच्या मरणानें तुला इतके वाईट वाटलें ? हे घे आठ आणें.'

**‘ नको मला तुमचे फुकटचे पैसें. मी दिवसभर श्रम करुन ही वर्तमानपत्रें विकल्यावरच आठ आणें मला आपण द्या.’** असें म्हणून हरिश्चंद्र सर्व पुण्यांत दिवसभर हिंडला पण व्यर्थ !

संध्याकाळ झाली. एक गृहस्थ हरिश्चंद्राचा आवाज ऐकतो. ‘ नदींत आंधळ्या म्हाताऱ्याचे प्रेत ! ’ त्याच्या मनांत येते, ‘ हा तो म्हातारा तर नव्हे, जो माझ्या दाराशी पडला होता व ज्यास मी तंगडी धरुन फरफरा ओढून शिपायांस नदींत टाकण्याय सांगितलें होतें ? चोराच्या मनांत चांदणें. शेटजीनें वर्तमानपत्र विकत घेतलें. शेटजींजवळ ५ रु. ची नोट होती.

‘ बाळ ! सुटे रुपये तुजजवळ आहेत काय ?

मजजवळ सुटे रुपये कोठून येणार ? हे पहिलेंच वर्तमानपत्र तुम्हीं घेत आहांत ?

‘ आपण ५ रु. ची नोट द्या. बाकीचे पैसे मी आपणांस दुकानांतून आणून देतो खात्री ठेवा.

शेटजीचा मुलावर विश्वास बसेना, पण वर्तमानपत्र तर घ्यायचें होते. पांच रुपयाची नोट देऊन वर्तमानपत्र घेतले व म्हणाले “ बाळ ’ मला डेक्कन जिमखान्यावर जायचें आहे. पळत जाऊन पैसें घेऊन ये. कदाचित तूं येण्यापूर्वी माझी बस आली तर हा घे पत्ता व या पत्त्यावर माझे पैसे पोचते कर. माझ्या बंगल्याचें नांव ‘खुशाल सदन नंबर ५७८ ’ जिमखाना दुसरी मोठी खूण म्हणजे माझ्या बंगल्यासमोर परवा माझ्या मुलाचे लग्नासाठीं उभारलेला भव्य मंडप व कमानी अजून तशीच आहेत त्या तुला दिसतील. ‘ बरे ! ’ म्हणून हरिश्चंद्र निघाला. दुकानांत जाऊन पैसे आणतो तोच शेटजीचा पत्ता नाहीं. बस येतांच ते मुलगा यायच्या आंत निघून गेले.

काय करावें ! आपल्या पदरी खोटेपणा येणार ? हरिश्चंद्र अस्वस्थ झाला.

रात्र झाल्यावर घरीं येऊं लागला. गर्दीतून लवकर चालूं लागला. रस्ता ओलांडावा म्हणून लगबगीनें मध्यें आला. तोच एक लॉरीचा

धक्का लागून हरिश्चंद्र दूर फेकला गेला. म्हातारी आई व त्याची भावंडे यांना कोणीतरी सांगितले. 'हरिश्चंद्र नांवाचा कुणी महारवाड्यातील मुलगा मोटारखाली सापडला. व अत्यस्थ आहे.' म्हातारी मुलाबाळांसह तेथे धावत आली. त्यास दवाखान्यांत नेले होतें, त्याला शुद्धी होती. मरणोन्मुख हरिश्चंद्र आपल्या आईस म्हणाला, 'माय रडूं नकोस ! मी लवकरच बरा होईन पण माझें एक तातडीचें काम आहे ते करशील कां ?'

'काय बाळा कोणते काम ?' आई म्हणाली

"डेक्कन जिमखान्यावर एक मोठा सावकार राहतो. नुकतेच त्याच्या मुलाचे परवा लग्न झालें. लग्नांत उभारलेला मंडप व लाविलेल्या कमानी अद्याप तशाच असतील. बंगल्याचें नांव 'खुशाल सदन' असून घ. नं. ५७८ आहे. त्याच्या घरी जा व त्या शेटजीस ४रु. १५ आणे ताबडतोब नेऊन दे व त्यांना सांग, 'माझा मुलगा तुम्हांला पैसे देणार तोच तुम्हीं निघून गेला. वाटेत तो मोटारखालीं सांपडून जखमी झाला आहे. बरा झाल्यावर तो पुनः तुम्हास भेटेल. हे तुमचें ४ रू. १५ आ. घ्या.'

म्हातारी जड पावलांनीं आपले व आपल्या मुलाचें शील व सत्व राखण्याकरितां दवाखान्यांतून निघाली. शेटजीचा शोध काढून त्यास पैसे तिनें दिले. व आपल्या मुलांनी सांगितलेला निरोप पण पोचता केला.

शेटजीला आश्चर्य वाटले व म्हणाला. 'बाई तो मुलगा कोठे आहे ? त्याला काय झालं ?

'तो मोटारखाली सांपडला.सध्यां दवाखान्यांत ाहे.'अम्हातारी म्हणाली

'कोणत्या' शेटजींनीं विचारले.

'ताराचंदच्या'

शेटजीनें कपडे चढविले. मोटारींत त्या म्हातारीला बसवून दवाखान्यांत आले. हरिश्चंद्राची घटका भरत आली होती. अंगातून घामाच्या धारा वाहूं लागल्या होत्या. अंग थंड पडूं लागले होते. शेटजीला पाहतांच तो रडूं लागला व म्हणाला, 'तुमचे पैसे पोचलें काय ? आतां

मी वाचत नाहीं. मीं तुमच्या ऋणातून मुक्त व्हायला माझी प्रेमळ आई मला कारणीभूत झाली. माझ्या आईमुळें मी धन्य झालो. मी कधीहि कोणापाशी याचना केली नाहीं आठ आठ दिवस अन्नावाचून आम्ही काढले. पण फुकटचे कोणाचेहि कधीच खाल्ले नाही.'

' माझ्या म्हाताऱ्या, आंधळ्या, प्रेमळ, निष्पाप बापाला कुणीतरी श्रीमंतानें शिपायाकरवी फरफरा ओढून नदीत फेकून दिले. त्यामुळें माझ्या बापाचा अंत झाला, मीही आतां चाललो. ! माझ्या म्हातारीला व प्रेमळ भावंडांना माझाच काय तो थोडासा आधार होता. तोहि तुटला ! माया बोलविते. आईचे प्रेम, भावाबहिणींचें प्रेम ओढ घेतें. पण काय करूं ? इलाज नाहीं ! देवाची इच्छा आमच्या कुटुंबाला सुख देण्याचीं दिसत नाहीं ! आम्हीच पापी ! देवाला काय म्हणून दोष लावावा ? आणखी पुढे काहीं बोलणार तोच शेटजीचें हृदय भरून आले व ते एकदम म्हणाले, ' बाळा हरिश्चंद्रा ! तूं काळजी करूं नकोस ! आजपासून ही म्हातारी तुझी आई नसून माझी आई आहे. ही भांवडे तुझी नसून माझींच आहेत. यांचा सांभाळ, मी माझ्या जीवांत जीव असेपर्यन्त करीन. '

हें ऐकतांच दरिद्री, पण सत्वशील हरिश्चंद्रानें सुखानें प्राण सोडला शेटजीचा हृदयपालट झाला ! अशा दरिद्री पण प्रामाणिक व सत्वशील हरिश्चंद्राला मानवच काय पण देवहि वंदन करील.

## गरीब गुराखी : १९ :

' रामसिंग! बोलाव त्या गुराख्याच्या कारट्याला ! सुध्या मतांनीं येत नसेल तर लाथा बुक्क्या मारीत आण त्याला. अशान ही गरिबाची कार्टी फार माजल्यासारखीं करतात. खायला घरात दाणा नाहीं, पण माज किती चढलाय त्यांना! जा! आतां जा आणि माझ्यासमोर आण त्या पोराला !

झुकून होताच, रामसिंग तडक निघाला. गुराख्याच्या झोंपडीजवळ आला. त्याची म्हातारी आई दारांतच बसली होती. ' रात्रीचें आठ वाजले. माझा भानु (गुराख्याच्या मुलाचें नांव) अजून कसा दांडेकरमामांच्या कीर्तनाहून परत आला नाहीं.,, असे भानूची आई मनांत म्हणत होती व त्याच्या जेवणाची वाट पहात होती. इतक्यांत रामसिंग झोपडीसमोर आला व उभा राहून म्हणाला, ' थेरडे ! भानु कोठें आहे ? '

' तुम्ही कोण ? '

'मी रामसिंग, कुबेर शेटचा जवान!'

' इतक्या रात्री काय काम आहे? '

'तुझ्या पोराला मालकांनीं बोलाविले आहे.'

' तो दांडेकर मामांच्या कीर्तनाला वाळवंटावर गेला आहे. येईल आत्तांच. आल्यावर जेवण करून त्याला पाठविते. रामसिंग! तुम्ही जा. मी त्याला जरूर पाठविते.' म्हातारी म्हणाली.

' नाहीं, त्याला नेल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं.' असें म्हणून तो एका दगडावर बसला. वाळवंटावर दांडेकरांचें कीर्तन आज एकादशी असल्यामुळें लावलें व रंगलें होते. भजनाच्या आनंदांत वारकरी श्रोते दंग झाले होते. विठ्ठलनामाचा सारखा गजर चालला होता. पंढरी नगरी जयघोषानें व टाळांच्या आवाजानें दुमदुमून गेली होती. सर्व श्रोते समरस झालें होतें आमचा कथानायक भानू पोरगाहि कीर्तन ऐकण्यांत गुंग होऊन गेला होता. कीर्तनकारांनीं आज तीन चार चटकदार भक्तीरसपर कथा सांगितल्या होत्या.

नाम संकीर्तन साधन पैं सोपे ।
जळतील पापें जन्मांतरीची ।।

या तुकारामांच्या प्रसिद्ध अभंगावर निरूपण चाललें होतें मधून मधून विठ्ठलनामाचा गजर होत होता. टाळच्यांच्या गोड, मंजूळ आवाजांनी पंढरीचें वाळवंट पुनीत झालें होतें. पंढरीनाथाचे वास्तव्य, चंद्रभागेचे पवित्र-जल व दांडेकरांची भक्तिरसाने ओथंबलेली पवित्र कीर्तनवाणी या त्रिवेणी संगमानें त्या नगरीला विशेषच पावित्र्य आलें होतें. दांडेकरांचें सुश्राव्य

कीर्तन, वक्तृत्वाचा ओघ, ब्रह्मचर्याचें तेज, तो गौरवर्ण तेजस्वी चेहरा व अवघड विषयही अगदीं सोप्या भाषेंत श्रोत्यांच्या गळीं उतरविण्याची ती सुंदर हातोटी यामुळें सर्व श्रोते देहभान विसरुन गेले होते. भक्त प्रल्हादाची कथा, ते रसभरीत शब्दांत सांगत होतें. हिरण्यकश्यपूनें आपल्या प्रल्हाद या मुलास शिकविण्यासाठीं एक दैत्यगुरु ठेवला होता. एक महिन्यानंतर हिरण्यकश्यपू शाळेत आला व म्हणाला.

'गुरुजी! प्रल्हादास काय शिकविलें ते मी आज बघणार आहे.' हें ऐकतांच गुरुजी घाबरले व म्हणाले, 'मी शिकविलेलें एकहि अक्षर प्रल्हाद पाठ करीत नाही. मी काय करूं?'

'मग काय पाठ करितो ?'

'त्यालाच विचारा'

'प्रल्हाद ! आजपर्यंत तूं काय शिकलास तें सांग.' प्रल्हाद

'विठ्ठल विठ्ठल जय जय विठ्ठल
रघुपति राघव राजाराम
कृष्ण कृष्ण जय कृष्ण कृष्ण जय'

बस कर! कारटर्या! असें म्हणून हिरण्यकश्यपूनें एक लाथ प्रल्हादाच्या कमरेंत घातली. प्रल्हाद खालीं पडला. तरी मुखानें 'कृष्ण कृष्ण जय' चालूंच होतें. हिरण्यकश्यपू जास्तच संतापला व प्रल्हादास हत्तीच्या पायाखाली तुडविण्यास आपल्या शिपायांस सांगितलें. प्रल्हाद तुडविला गेला, तरी 'राम राम राम' मुखानें चालूंच. तप्त कढईत टाकलें. तेल थंडगार झालें. मरत नाहीं म्हणून, डोंगरावरून कडेलोट केला तरी मेला नाहीं.

'न मरे यास्तव नेला, पर्वत शिखरासि लोटला खाली
परि तो निर्भय चित्तें, वाहे नारायणास लाखोली'

श्रोतेहो! तारी ज्यासी देव तयासी कोण जगीं मारी?
मारी ज्यासी देव तयासी कोण जगीं तारी?

बोला 'विठ्ठल विठ्ठल जय जय विठ्ठल' यानंतर चंद्रहास्याची कथा सांगितली. दुष्ट बुद्धीनें चंद्रहास्याला मारुन टाकावें म्हणून अनंत उपाय केले. मारेकऱ्यांकडून त्यास ठार मारण्यासाठीं अरण्यांत नेलें. मारणार तोच एक

सिंह चवताळून तेथें आला. मारेकरी घाबरून पळून गेले असें एक, ना शेकडों प्रयत्न केले पण त्याचेऐवजीं त्या दुष्ट बुद्धीचा मुलगाच मारला गेला.

' तारी ज्यासी देव तयासी कोण जगीं मारी?

चंद्रहास्यानें असें काय केले होतें? मुखांत त्यांनी लहानपणायासून नृसिंहाची मूर्ति ठेवली होती व रोज तो त्याचें नामस्मरण करीत होता. असे आहे सामर्थ्य नामस्मरणांचें म्हणून तुकाराम महाराज म्हणतात—

॥ नांमसंकीर्तन साधन पैं सोपे ॥

बोला—' विठ्ठल विठ्ठल जय जय विठ्ठल ' पुंडलिक वरदे हरि विठ्ठल ज्ञानदेव तुकाराम महाराज की जय

भीमाला ठार करावे हणून दुर्योधनानें गाडीभर विषान्न पाठविले. भीमाने ते खाल्ले पण श्रीकृष्ण परमात्म्याच्या कृपेने त्या विषाची कांहीच बाधा भीमाला झाली नाहीं. म्हणतात नां ? ' विषमप्यमृत क्वचित भवेत् अमृत ' विषमीश्वरेच्छया ' ते काय खोटे ? बोला.

कृष्ण कृष्ण जय । कृष्ण कृष्ण जय

अशा रीतीनें मोठ्या थाटांत दांडेकरांचें कीर्तन चालले होते. आमचा भानु गुराखी त्यांत दंग होऊन गेला होता रात्रीचें बारा वाजले. ' अद्याप भानु कसा आला नाही ! रामसिंग आला तो भानु नुकतांच कीर्तन संपल्यावर वाळवंटातून घराकडे निघालेला रामसिंगला दिसला. धांवत जाऊन त्यानें भानूचें मनगट धरले व म्हणाला कीर्तन ऐकतोस होय ? मी वाट पाहून थकून गेलो चल तुला मालकांनी बोलाविले आहे. कां ? रामसिंग ! तुम्हीं कां रागावलात ? मी काय चोर, दरोडेखोर हाय व्हय ? म्हणून मला दटावतां ? तुम्ही पुढें व्हा मी भाकर खाऊन आता येतो. माझी म्हातारी अजून उपाशी आहे ती मी जेवल्याशिवाय जेवत नाही. मी आलोच ' असें म्हणताच रामसिंगाचा पारा चढला. पोऱ्या ! सुध्या बोलानें माझ्या बरोबर चलशील तर ठीक ! नाही तर पाहिलास कां दंडा ? मारीत मारीत नेईन मी भाकर बिकर काही जाणत नाहीं. चल, हो पुढे असें म्हणून धक्के मारून त्यास नेऊं लागला.

कुबेर शेटजीच्या घरचा रस्ता, भानूच्या घरावरूनच होता. त्यामुळे लाथा बुक्या मारीत घेऊन जाणाऱ्या भानूचे ओरडणें व रडणें म्हातारीला ऐकुं आले बाहेर येऊन पहाते तो रामसिंग आपल्या भानूला मारीत आहे. व भानू रडत आहे म्हातारी एकदम समोर आली व राम-सिंगाच्या पाया पडुं लागली. व म्हणूं लागली. ' रामसिंग ' हें काय माझ्या मानुला तुम्ही का मारतां ? त्याने तुमचे काय केले ? उगीच गरीबाला मारणें तुम्हाला बरें दिसत काय ? सोडा त्याला ! तो सकाळ-पासून उपाशी आहे. त्याला फराळ करूं द्या. तुम्ही थोडे थांबा. फराळ झाल्यावर त्यास घेउन जा. तुमच्या पाया पडते हात जोडते. पदर पस-रते, रामसिंग ! जरा थांब त्याला मारूं नका,

पण रामसिंग कसचा बेरड ! मालकाचा हुकूम किंचित् विचार न करता पाळणारा आडदांड तो ! ते कांही नाहीं. आत्ताच्या आत्तां मी मी भानुस घेऊन जाणार. मी फराळ बिराळ कांही जाणत नाही. म्हातारीं पुनः पाया पडली. पायावर डोके ठेवताच रामसिगानें तिला एक लाथ मारून खालीं पाडले भानूला संताप आला पण करतो काय ? गरिबी मोठी वाईट असतें ! वाटलें ! रामसिंगाच्या डोक्यांत एक दगड घालावा व त्याचा प्राण घ्यावा. पण ! गरिबी गरिबी ! लाचार होऊन तो म्हणाला, " रामसिंग ! चला मी तुमच्या बरोबर येतो. पण माझ्या म्हातारीला मारुं नका, रामसिंग पक्का कसाबच ! धक्के मारीत भानूला मालकाजवळ आणले.

रात्रीचा १ चा सुमार होता, कुबेरशेठ आपल्या शृंगारलेल्या महा-लांत गाढ झोपी गेले होते. स्प्रिंगचा पलंग, त्यावर ५ फूट उंच मऊ मऊ रूईची गादी, त्यावर वेलबुट्टी काढलेली सुंदर चादर, मच्छरदाणी लाविलेंली, चैत्राचा महिना असल्यामुळे वारं बंद होऊन उकडत होते. दासी वारा घालीत होत्या. जवळ थंडगार वाळयांचें सुगंधित पाण्याची सुरई ठेवली होती. टण ! टण ! दोनचे ठोके पडले. उकाड्यानें शेटजी जागे झाले. उठून पलंगावर बसले. तोच त्यांना त्या गुराख्याची आठवण झाली. आपण रामसिंगाला आठ वाजताच पाठविलें अन् आतां तर दोन

वाजून गेलें. अजून कसा आला नाही. ? झाले ! झोप गेली. कुबेरशहानें बटन दाबिले व दासीला विचारले, ' काय रामसिंग आला ?

' पहात्ये,' म्हणून दासी बाहेर आली.

रामसिंग उभा होता महाराज ! रामसिंग आला.

बोलाव त्याला.

रामसिंग आंत येतो.

'' काय, रामसिंग ! तुम्ही नोकर लोक आताशा फार कामचुकार बनलांत. रात्री खुशाल चार तास झोप घेऊन आला वाटते ? शरम नाही वाटत ?''

नाहीं, शेटजी ! इतका वेळ भानु गुराख्याला आणण्यांतच गेला.

काय ? कोठे गेला होता कार्टा ?

आपणच त्यास विचारा

भानु थरथरतच पुढे आला.

कायरें कार्ट्या ! फार मस्ती आली होय ? काय झाले शेटजी ?

अरे माझा ७०० रू. चा बैल तू काल काठी घालुन मारलास होय ? अन् मला कांहींच सांगितले नाहीस ?

महाराज ! मी कशाला तुमचा बैल मारूं ? ४–५ दिवस झाले तो आजारीं आहे. चारा खात नाहीं. पाणी पीत नाही मी त्याला कांहीच केले नाही. चालत नव्हता म्हणून सहजच हळूच एक काठी त्यास मारली, तोच तो पडला, त्यास मी उठविले, घरीं पोचते केलें, व माझ्या घरी गेलो. मी तुमचा बैल कशापायी मारीन मालक ?

हे ऐकतांच शेटजी एकदम उठले व गुराख्याच्या एक मुस्कटांत मारली. गुराख्याच्या नाकातोंडातून रक्त आले.

बोल कुणी मारला बैल ?

मी नाहीं मालक ? असे पुनः भानुनें म्हणतांच शेटजीनें त्यास जोरानें ढकलले तो त्याचे डोके एका खांबाला लागून त्याला मार बसल्यानें चक्कर आली व तो धाडकन् खालीं पडला. पडता पडता म्हणाला म्हणाला ' मालक ! मरण कोणाला चुकले ? ज्याची घडी भरली त्याची काळाला

दया येत नाहीं. प्रल्हादाला, त्याच्या बापानें हत्तीच्या पायाखाली तुडविलें, तरी तो मरेना, तापलेल्या तेलाच्या कढईत टाकले, तरी तो मरेना डोंगरावरून कडेलोट केला तरी तो मेला नाही. चंद्रहास्याला ठार मारण्याकरितां दुष्टबुद्धीनें खूप प्रयत्न केलें, पण उलट त्याचाच मुलगा मरण पावला. भीमाला दुर्योधनानें विष चारलें, पण कृष्ण परमात्म्याच्या कृपेनें तें बाधले नाहीं. असे आजच रात्री आमच्या प्रेमळ संत दांडेकरांनीं सांगितले ते सव खोटेच काय शेटजी ! मी नाही तुमचा बैल मारला त्याचें आयुष्य संपलें म्हणून तो मेला, ज्याला देव मारी, त्यास कोण तारी ?

" अरे ! बदमाषा ! मला ज्ञान शिकवितोस होय. ते कांहीं नाहीं, माझा बैल भरून दे.

भानू म्हणाला ' मला पोटाला धड भाकर मिळत नाहीं अंगावर कपडे नाहींत व माझी म्हातारी आई रोज उपाशी असते तुमचा बैल कोठून भरून देऊ ? मी माझा देह तुम्हाला विकला आहे. मरेपर्यंत मजकडून पाहिजे तेवढें कष्ट करून घ्या व तुमचें पैसे घ्या. यापरती मीं तुम्हाला काय सांगू ? मालक ! रागावूं नका गरिबावर दया करा.

पण मालक कवडी चुंबक ! त्यांना धन मदिरेची धूंदी चढली होती. कुठला विचार नि विवेक !

शेटजी उठले व रामसिंगाला म्हणाले. ' रामसिंग ! याला खांबाला बांध. माझा घोड्याचा चाबुक आण ? रामसिंगनें तसाच भानूला खांबाला बांधला. शेटजींना चाबूक आणून दिला. मालकानें चाबकानें त्याच्या अंगाचे सालटे काढलें. भानूचे अंग रक्तबंबाळ झाले.

/ मालक मारूं नका ! मी तुमचा बैल मारला नाहीं. असें तो ओरडून सांगत होता.

पण शेटजीचा चाबूक चालू होता माराने भानू मूर्च्छित झाला, त्याचे प्राण कासावीस झाले. शेटजींचा मार चालूच. हा अनन्वित छळ चालू असतां, शेटजीच्या घरी असणाऱ्या दासीला हें पाहून फार वाईट वाटलें. तिचे हृदय कळवळले, ती हळूच घराबाहेर पडली. इतक्यांत आपल्या भानुला

रात्री रामसिंग घेऊन गेला तो अद्याप का आला नाहीं म्हणून त्याची म्हातारी आई शेटजीच्या घराकडे निघाली.

दाराच्या बाहेर त्या दासीची व तिची गांठ पडली. दासी म्हणाली ' आजीबाई ! माझ्याबरोबर चला. तुम्हाला तुमच्या भानूची सर्व हकिकत सांगते.' दोघी तेथून निघाल्या तो दलितांच्या एक मोठ्या पुढाऱ्याकडे आल्या. भीमराव त्याचे नांव त्या पुढाऱ्याला सर्व हकिकत त्या दासीनें सांगतांच तो दलितांचा कैवारी भीमराव कळवळला त्यानें कपडे चढविलें व तावडतोब शेटजीच्या घरी आलें. शेटजीचा चाबूक चालूच होता. भानू निश्चेष्ट होऊन त्याची मान खाली पडली होती. भीमरावानें शेटजीच्या पोटांत एक लाथ मारली, त्याला खाली पाडला. व म्हणाला, ' तूं माणूस आहे का जनावर ? लाज नाही वाटत असें घोर कर्म करायला ? ' असें म्हणून भीमरावांनी गुराख्याचें दोर सोडले व त्याला तावडतोब दवाखान्यांत घेऊन गेला. लवकरच भानू बरा झाला. म्हाताऱ्या आईच्या जीवात जीव आला. व भीमराव विषयीं तिला आदर वांटूं लागला, पण म्हातारपणामुळे मुलाच्या हालअपेष्टा पाहुन तिला जो धक्का बसला, त्यांतच तिचा अंत झाला,

भानु गुराखी अद्यापहि चारतांना म्हणतो, " तारी ज्यास देव ! तयासी कोण जगी मारी ? '

## माझी करूण कहाणी : २० :

माझा जन्म होण्याच्या आधींच माझे वडील वारले. माझी आई, पतीच्या आकस्मिक मरणानें भांबावून गेली. व मी मात्र तिच्या-पोटांत शलासारखे वाढूं लागलें. व तिला जास्तच दुखवूं लागले माझ्या आईनें, मी जन्मण्यापूर्वी मरावे म्हणून नानाप्रकारचें अघोर उपाय केले विष कोळून पाबले, जालीम उष्ण कडक औषधें घेऊन मी मरावे, म्हणून

खूप प्रयत्न केले पण व्यर्थ ! म्हणतात ना आयुष्याची दोरी बळकट असली म्हणजें त्याला दगडी आपटले तरी भीति नाहीं. माझ्या बाबतींत हें खरें ठरलें व नऊ महिनें संपतांच माझा एकदाचा जन्म झाला. दुर्दैवानें मी मुलगा न जन्मतां मुलगीच जन्मले. आधीच उल्हास त्यांत फाल्गुनमास ! असा प्रकार झाला. आई जास्तच चिढली. मला जगातून नाहींसे करण्यासाठीं तिनें मला मोठी अफूची हरबऱ्याएवढी गोळा दिली. पण तिचाहि परिणाम मजवर काडीमात्र झाला नाही. या एक बाबतीत कां होईना मी शंकराची योग्यता स्त्री असूनहि प्राप्त करून घेतली. विष पचविले ! आई पुनः निराश झाली.

दिवसें दिवस मी वाढूं लागले तशी मी रूपानें फारच सुंदर होते, गोरीपान पाणीदार हरणासारखे चंचल डोळे, नाक चवळीच्या शेंगेसारखें, गाल गुलाबालाहि लाजविणारे, केशकलाप भ्रमरलहि कृष्ण वर्णात मागे टाकणारा, व मोहक चेहरा; त्यामुळें आईच्या हृदयाला मी ओढून घेतले होते. माझ्यावर आतां आईच्या वात्सल्यप्रेमाचा पाऊस पडूं लागला. त्याबरोबरच मला ठार करण्याचे कृष्णमेघहि हळूंहळूं वितळूं लागले, व माझे चंद्रमुखाचें दर्शन तिला जास्त आल्हाददायक वाटूं लागले.

कधीं कधीं येणाऱ्या जाणाऱ्या मैत्रिणीस आपण केलेल्या दुष्टपणाचे रसभरित वर्णन ती करी. मी जशी मोठी होऊं लागले तशी ती मला जिवापलीकडे जपूं लागली.

माझ्या भावानेहि ( ज्याला आम्ही सर्व ' बाबा ' म्हणत असू ) मला कडेखांद्यावर घेऊन बाहेर न्यावें खेळवावें. माझ्यासाठीं खाऊ आणावा पुरुषाचें कपडे घालावे, व म्हणावे कशी दिसते आपली ' मनकर्णिका ' ? तों तों आईच्या मनांत गुदगुल्या होत, व ' बरें झालें देवानें कृपा केली नाही तर माझी मनी हाती लागली नसती.' असें ती म्हणे

० ० ० ०

मी बारा तेरा वर्षांची झालें. माझें सौन्दर्य खुलूं लागले. ' प्राप्ते तु षोडषे वर्षे गर्दभी अप्सरा भवेत्' मग मी तर मनुष्य. व त्यातून स्त्री

जगांत चांगल्या वाईट दृष्टीचें लोक असतातच. कोणी माझ्या

भावाप्रमाणें शुद्ध प्रेम करूं लागले, कोणीं म्हणावे 'ही ज्याच्या गळयांत पडेल तो खरा भाग्यवान. पण मनांत म्हणें ' इच्या भावानें इला मलाच दिलेच तर ? ' पण म्हणतात ना, जन्मल्याबरोबर मुलामुलीचें विवाह ठरलेलेच असतात. त्याचें भविष्य ब्रह्मदेव आधीच ठरवितो. आपण मात्र व्यर्थ काळजी करतो.

० ० ० ●

आमच्या घरची अत्यंत गरिबी ! भावास १५ रु. पगार, व आई, दोन बहिणी, भावाची बायको एवढे कुटुंब. भाजीभाकर खाऊन कसे तरी जीवन कंठीत होतो. भावाला माझ्या लग्नाची चिंता पडली. घरची तर गरिबी ! नुसत्या सौन्दर्याला कोण विचारतो ?

ठिकाण पहाण्यासहि भाऊनें (बाबानें) मला बरोबर नेले. वर-संशोधनाच्या बाबतींत, मी वाचलेल्या गडकऱ्याच्या 'ठकीचे लग्न' या लेखाची मला थोडीशी झळ लागली, हे पुढें वाचकांस कळेलच.

बाबांनी मला गंगाखेडला नेले. तेथे एक गर्भश्रीमंत गृहस्थ (सावकार) रहात होता. त्याच्या घरी श्रीमंती खूप. मुलाच्या दारीं हत्ती झुलत होते. पण घरांत असणारा मुलगा मात्र नंदीबैलासारखा डुलत होता. नखापासून डोक्यापर्यन्त मध्यें यत्किंचितही जागा न सोडतां दागिनें घालण्याची माझी व माझ्या आईची हौस पुरली असती. आमचीं जेवणें झालीं. दुपारी ४ वाजतां नवरदेव ( न झालेले ) त्यांची आई वडील, भाऊ व गावांतील इतर भाडोत्री चहाभक्त शिष्ट म्हणून मला बघण्यासाठीं जमले. सर्वांनीं मला पाहिले उभी रहा, बैस, सर्वांना नमस्कार कर, तुझे नांव काय ? तूं शाळेत जातेस काय ? तुला वाचतां येते कां ? तुला चहा करतां येतो काय ? या प्रश्नांचा भडिमार एकसारखा माझ्यावर झाला-या मिषानें माझा लंगडेपणा, बहिरेपणा, बोबडेपणा व धीटपणा या सर्वांची कसून परिक्षा करण्यांत आलीं. माझ्या सौन्दर्यादि गुणानीं सर्व मोहितच काय पण वेडे झाले. नवरदेव तर उभा राहून नाचूं लागला.

नवरदेवाचें गुणवर्णन करणें येथें अनाठायीं न होतां वाचकांचें मनोरंजनच करील म्हणून तें सांगावेसे वाटतें. नवरदेव फारच देखणें होते.

वर्ण कोळशालाहि लाजविणारा, एक डोळा देवीच्या पायीं अर्पण केला होता. नासिक तर त्र्यंबकेश्वरीं गेले होते. गालफडे बसलेली, तोंडावर देवीचा प्रसाद भरपूर, ओठ निग्रोलाहि लाजविणारे, एका पायानें अधू, व शिक्षण म्हणावें तर मराठी चौथी नापास ! कलम लावलेल्या मिशा, डोक्याला टक्कल व अक्कलशून्य, असे मदनाचे पुतळे होते. पण बायको मात्र नक्षत्रासारखी मिळाली पाहिजे ही सदिच्छा ! घरीं मात्र लक्ष्मीची पूर्ण कृपा असल्यामुळें सरस्वती घाबरून घरांतून पळून गेली होती. घरीं गेल्यावर नक्की कळवितो असे बाबानें सांगितले. पण असें सोन्यासारखे स्थळ तुम्ही घालवूं नका. मुलीचे भाग्य थोर म्हणूनच तुम्हाला येथें येण्याची सद्‌बुद्धी झाली. या बैठकीतच साखरपुडा करा, वगैरे शब्द चहाभक्तानी काढलें.

बाबानी मान हलवित कसाबसा त्यांचा निरोप घेतला व संमति दर्शविल्याचें चांगलेंच सोंग आणले. आम्हीं घरीं आलो बाबाने मला विचारले " कां मनाताई ! कसें आहे ठिकाण ? तुला पटले कां ? पसंत असलें तर उद्याच करवितो साखरपुडा."

माझी आई तर आनंदानें बेहोष झाली. तिला हर्षवायू झाला. म्हणाली, ' बाबा ! ही सोन्याची संधि दवडूं नकोस. माझे म्हातारपण झाले आहे. मुलगी उजळून टाक.' बाबा मात्र विचारांत पडलें.

आपली गरिबी ! गंगाखेडीं मुलगी द्यायची तर हुंडा द्यावा लागेल. पाहूं. पण प्रथम आपल्या बहिणीचें मत घेऊं ' मनें ! मुलगा पसंत आहे काय ? सोन्यानें पिवळी होशील. ठरवूं कां लग्न ? बोल.' मी म्हणाले; तुम्हीं माझे मन पाहतां काय ? गंगाखेडी त्या घरांत दिल्यापेक्षां मला एकाद्या विहिरींत कां लोटून देत नाहीं ? नको मला ती श्रीमंती—नकोत ते दागिनें. नको तो गाढव नंदीबैल नवरा. असें संतापून म्हणताच बाबाला मनांतून आनंद झाला. पण आई मात्र रागानें लाल झाली तिनें माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ ! या गोष्टीला एक वर्ष लोटले. एकें दिवशीं मी आमच्या गांवी एक विठ्ठलाचें मंदीर होतें, तेथें कीर्तनाला गेले. रोज त्या कीर्तनांत माझे भावीं पति येंत असत. त्यांचें लक्ष मजवर गेलें. माझेहि पण !

पायांत फाटका जोडा, अंगांत फाटका शर्ट, डोक्यावर काळी जुनी टोपी, शरीरयष्टि सुदाम्यालाहि लाजविणारी, पण डोळयांत मात्र तेज व मुखावर तरतरीपणा व विद्येचें तेज. रोज नुसती दृष्टादृष्ट व्हायची. पण प्रत्यक्ष भेट किंवा भाषण करण्याची मुळीच संधी आली नाहीं. मनें मनांत कुजबुज करायची.

माझ्या काहीं मैत्रिणींच्या हे लक्षांत आले. त्या मला म्हणाल्या, 'मनें ! तूं रोज कीर्तनास येतेस. पण कीर्तनांत तुझें लक्ष नसतें. एका तरुण मुलाकडें तूं सारखी पहात बसतेस. हें खरें ना ? तो मुलगा कोण ? फारच तेजस्वी व तरतरीत दिसतो.' मी लाजले. खोटेंच रागावले. पण मनांत मात्र मला आनंदांच्या उकळया फुटूं लागल्या व अंगांत गोड शिरशिरी भरली.

होतां होतां ही गोष्ट माझ्या मैत्रिणींनी, माझ्या आईच्या कानांवर घातलीं. आईनें भावाला सांगितली. बाबा मुद्दाम एके दिवशी कीर्तनास आले. त्यांनी माझ्या होणाऱ्या पतिला पाहिले. त्यांनाहि ते फार आवडले. शोध काढून ते एकें दिवशीं माझ्या पतीच्या घरीं गेले. त्यांच्या आजोबांस दाखविण्याकरितां त्यांनी मला त्यांच्या घरी नेलें. मुलाची तरतरी व तारुण्य पहाताच बाबांना आनंद झाला. घरीं आल्यावर बाबांनी विचारलें 'मने ! हा नवरा तुला पसंत आहे काय?' मी मान खाली घातली. बाबांनी ओळखलें. पण पुन: हुंड्याचा प्रश्न दत्त म्हणून उभाच. स्थळ चांगले. आपली तर गरिबी ! या विचारांत असतांच बाबांची जिवश्च कंठश्च मित्रमंडळी आली व म्हणाली '' बाबा ! कां ? आज तुमचा चेहरा चिंताक्रांत दिसतो आहे. काय कारण आहे ?''

"कांही नाहीं. आपल्या मनीला आज मी स्थळ पाहून आलो. पण तेंथे त्या मुलाच्या विव्दत्तेप्रमाणें शोभेल असा हुंडा द्यायला हवा.' बाबा म्हणाले.

'किती ?'

'निदान २५१ तरी ? अं!'

'मग त्यांत इतके काळजी करण्यासारखे काय आहें.' असें म्हणून मित्रमंडळी उठली,

केलेले उपकार कधीच वाया जात नाहींत माझ्या भावानें पैशानें जरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, ...
वि. ...
नों. दि. ...
क्रमांक ...



नाहीं तरी कष्टानीं लोकावर अनंत उपकार केले होते, मित्रांच्या आजारीपणांत रात्रींच्या रात्री जागून काढल्या होत्या. प्लेगासारख्या भयंकर साथींत कक मित्रांची त्यांनीं रात्रंदिवस शुश्रुषा केली होती. खरे मित्र हें विसरतील काय ? मित्रमंडळींनी प्रत्येकाने आपल्या हातांतील २–२ तोळ्यांच्या आंगठ्या दुकानांत जाऊन मोडल्या व ५०० रुपये जमा करून दपारी ५ वाजता माझ्या बाबांकडे आले व म्हणालें, ' बाबाराव ! हे घ्या रुपये. बाबारावांच्या डोळ्यांत पाणी आले. कृतज्ञतेचें ते अश्रू होते लागलीच दुसरे दिवशीं साखरपुडा व तिथीनिश्चय झाला. माझें लग्न लागलें, मी माझ्या देवाच्या घरी आलें. सासू, आजे सासरे, दीर, भावजय, नणंदा ही सर्वच सुस्वभावीं ! सरस्वतीच्या सात्विक तेजानें माझें घर चमकत होतें. फक्त अभाव कशाचा असेल तर तो फक्त लक्ष्मीचा.

लग्न होतांच दोन महिन्यांनी पतिदेव पहिल्या श्रेणींत पास झाले. संस्कृत व मराठींत त्यांना ७५ रुपये पारितोषिक मिळाले. पुढें उच्च शिक्षणासाठीं तें हैद्राबादीं गेले. जवळ तर पैसा नाही. शिक्षण तर घ्यायचें. कसे बसें ७५ रु. घेऊन गेले. तेथें वार लावून शिक्षण घेऊं लागले, पण तेथेहि दैव आडवें आलें. माझे आजेसासरे एकाएकीं कॉलऱ्यानें वारलें, झाले ! पतिदेवाला सासूबाईंचे पत्र गेलें ' शिक्षण सोडून तावडतोब निघून ये तुझे आजोबा एकाएकी आपणा सर्वांस सोडून गेले.' पत्र पाहतांच पतिदेव निघून आले, शिक्षणाला अडथळा आला. नाइलाजानें नोकरी धरणें आलें. सुदैवाने पतिराजांना शिक्षणखात्यांत नौकरी मिळाली. सर्वांना आनंद झाला, आम्हीं दोघेच नोकरीच्या गांवीं गेलों. तिकडे त्यांना जसा काव्याचा, अभ्यासाचा, गाण्याचा नाद तसाच मलाहि पण वेल, फुलझाडें, तुळशी लावण्याचा छंद ! मी भाड्यांच्या घरांतील बखळ स्वच्छ केलीं, दगड काढलें, चिकणमाती टाकून त्यांत खत घातले. रोज सकाळ संध्याकाळ, गंगेवरून डोक्यावर पाणी आणून ती फुलझाडे व वेलीं जगवल्या. मला तोच नाद ! लोकांनी म्हणावें, ' तरणीताठी मुलगी, देखणी, नदीवर पाण्याला एकटी जाते. दृष्ट लागेल एकाद्या दुष्ट कावळ्याची.' पण मी एकहि दिवस पाणी आणण्याचे चुकविले नाहीं.

वेल हळू हळू रांगू लागली. वर चढली म्हणून मीं शेजाऱ्यापाजाऱ्यां कडून लाकडें, वेळू भीक मागून आणले. सुंदरसा मंडप तयार केला. वेल फोफावू लागली.

पतीच्या सुस्वभावामुळे मला संसारांत अत्यंत सुख मिळू लागले कधीं कधी काहीं कारणांवरून भांडणाचें ढग आलेच तर ते एका घटकेंत पति सूर्याच्या तेजानें व गोड स्वभाव वातानें वितळून जात. अशा प्रकारे आमचा बाग आनंद सुमनांनीं बहरला. फुळाफळांनी झाडांना टवटवी आली, योगा-योगानें मलाहि कांहीं दिवस लोटले.

आनंदीं आनद गडे। जिकडें तिकडें चोहिकडें ' असे झालें. माझे डोहाळजेवण मामेसासऱ्यानें मोठ्या थाटांत केलें. मी योग्यवेळीं प्रसूत झाले. मुलगा झाला. नक्षत्रांनी मान खाली घालावी असें माझे चित्रा-सारखे सुंदर बाळ ! रोज सामूनें त्याची दृष्ट काढावी. बाळ तीन महि-न्यांच झालं झाडांना जीवन घालणारी मी खरी. पण मला माझ्या बाळाला मात्र जीवनदुग्ध देतां आले नाही. दुधाच्या अभावीं माझं बाळ देवाघरी गेलं. माझ्यावर कुऱ्हाड कोसळली. सर्वांना वाईट वाटलें. पण उपयोग काय ?

मी वागायला उठलें. पुन: वेलीला पाणी घालणें सुरू झाले. पुनः मला दिवस गेलें. प्रसूत झाले. ते मूलहि देवानें नेले मग मी वेलीकडे पाहुन समाधान मानू लागले. पण तेहि देवाला पहावलें नाहीं.

एके दिवशीं आम्ही राहतो त्या घराच्या मालकिणीच्या घरीं कांही पाहुणें आले. यांनी आपलें गाडीबैल आणले होतें. बैलांना अंगणांत वेलीच्या थाडे दूर बांधले होते. मी शेजारणीकडे सहज बसायला म्हणून गेलें शेजारीण फार सालस, प्रेमळ व व्यवहारदक्ष होती, म्हणून मीं कधी कधी तिच्याकडे जात असें, त्याप्रमाणें आजहि गेलें होतें,

इकडे बैल सुटलें. त्यांनीं माझी लतिका पायाखालीं तुडविली तोंडानें तिचा चावा घेतला. वेल ओरडली. एकदम मोठी किंकाळी माझ्या कानीं पडली मी धावत आले तो काय ?

'दुष्टानें मम लाडकीस अदये पायातळीं घातलें.'

हां हां मी म्हणतांच तिजला, त्यानें तिला नाशिलें.' मला अत्यंत दुःख झाले, व दुःखाच्या भरांत खालील ओळी बाहेर पडल्या—

'गेली वेल परी तसेच मम हे बाहू कसें राहिले
डोळे हें सुजले, परी न मिटले, आश्चर्य याचे भले'
माझ्या दैवि जरी अशाच लिहिल्या या तापदा आपदा
देवा! नेइ मला तरीं झडकरी ही प्रार्थना त्वत् पदा'

वैताग आला. पण पुढे आणखी दुःखाचें ताट वाढून ठेवले होते म्हणूनच कीं काय माझें आयुष्यहि वाढूं लागले.

ही माझी तारुण्यातील 'करुण कहाणी'

० ० ० ०

या गोष्टीला २० वर्षे झाली. मला पुढे दोन मुलें झाली. ती परमेश्वर कृपेनें गुणी, देखणी, आज्ञाधारक व सत्शील अशीच निघाली. या दोन मुलांवर आमची सारी भिस्त. त्यांतही थोडेसें गरळ पडलें.

या मुलांपैकी आमचा धाकटा मुलगा १५ वर्षांचा मॅट्रीकमध्ये असलेला, गाण्यात चांगला, अभ्यासांत पहिला नंबर, लहान पण समजूतदार, सर्वांना अत्यंत प्रिय; शाळेंत सर्व गुरुजी व मुलें त्यावर प्रेम करीत. मित्र-परिवार सुस्वभावामुळें बराच होता. सर्वांचे त्यावर प्रेम, कृष्णावर जसें बालगोपाळांचे तद्वत्. तो एकाएकीं विषमज्वरानें आजारी पडला पतिदेव फिरतीवर! मीहि दुर्दैवानें घरीं नव्हते. मरणापूर्वी आम्ही दोघंहि दोनच दिवस त्याचे जवळ आलो

डॉक्टरानी शिकस्त केली पण त्याची शिकस्त झाली. शेवटपर्यंत शुद्धीवर! शेवटो दत्त. दत्त राम राम, व अगदीं मरण समयी 'आई! तुझ्याच पायीं। मजला सुखें मरु दे।' असें म्हणून माझ्या दुर्दैवी मुलानें आईच्याच मांडीवर प्राण सोडला. पक्षी पिंजऱ्यातून उडून गेला.

हजारो मित्र, माणसे पुरुष स्त्रिया त्याच्या अंत्यदर्शनासाठीं जमल्या. सर्वच रडूं लागलें व म्हणाले, 'काय पोरगा! किती गुणी, किती देखणा, किती साहस! पण देवाला तो आवडला.'

दुःखांत समाधान मानल्याशिवाय दुसरें काय गत्यंतर !

० ० ० ०

आमच्या कुटुंबात एकच काय तो मुलगा. त्याला अत्यंत सालस, देखणी व व्यवहारदक्ष पत्नी लाभली आहे. त्या दोघांवर व त्यांच्या मुलाबाळांवर आमच्या म्हातारपणातील आयुष्याची दारमदार आहे.

देवा ! त्या सर्वांना सुखी ठेव. यापेक्षा तुझ्या चरणीं माझे व माझ्या पतीचें दुसरे काय मागणें असणार?

शेवटीं मला भरल्या चुडयांनी सौभाग्य मरण येवो हीच देवाजवळ याचना करून, माझी करुण कहाणी येथेंच संपविते.

धाराशिव १५।१०।५७

# आईचें हृदय : २१ :

लक्ष्मीकांत बाबाचे नांव माहीत नाहीं अशी व्यक्ति क्वचितच त्या राहाळांत होती. त्यांचें घराणें अत्यंत बाळबोध जुन्या वळणाचें. धार्मिक कृत्यांच्या निमित्तानें नेहमीं ब्राह्मण भोजन, भजनी सप्ताह, पोथी पुराणें सतत त्यांच्या घरीं होत. व त्यामुळें गोर-गरिबांना त्याचें घर म्हणजे एक अन्नसत्रच वाटत होतें.

बाबांच्या घरीं सावकारी होती. दागिने, वस्तू, गहाण ठेवून अगदी थोडया व्याजांत कर्जहि दिलें जात होते. हजारो रुपयांची उठाठेव व्हावयाची सगळेंच कांहीं सत्य युगातले नव्हते. त्यामुळें कित्येकांनीं बाबांचें पैसे बुडविले. कधीं कधीं हातउसने पैसेहि बाबा देत.प्रॉमिसरी नोटा लिहून देऊनहि पैसे परत करण्याचें मात्र नांव नाहीं. पण बाबा कधीं कोर्टाची पायरी जन्मात चढले नाहींत. कोणावर कधीं फिर्याद केलेली गांवांत लोकांना आठवण नाहीं. संपत्ती व संतती या दोन्हींची परमेश्वरांनीं त्यांना भरपूर देणगी दिली होती. मुलगा विष्णुपंतहि एकुलता एक ! पण तोहि वडिलांची आज्ञा कधींच उल्लंघन करीत नव्हता. मात्र घरचा वकीलांचा धंदा वकील जिवंत

असेंतो त्यांनीं कधीं पाहिला नाहीं. मित्रमंडळीं जमवून पत्त्याचे खेळ, बुद्धिबळाचें डाव अहोरात्र चालत. स्वभाव मात्र सालस व प्रेमळ.त्यांनाहि दोन मुले होती. त्यांच्या शिक्षणासाठीं अतोनात पैसा खर्च करूनहि पदरांत माप कमीच पडलें. जेमतेम एक मॅट्रिक पास झाला व आजोबांचा धंदा बापाच्या ऐवजी तो कसाबसा पाहूं लागला. तो वडील मुलगा बाबाना व वहिलांना जास्त आवडत असें.

म्हातारपणामुळें बाबा वारले. त्यांचा लौकिक पुष्कळ असल्यामुळें त्याची स्मशानयात्रा मोठ्या थाटानें काढण्यांत आली. सर्व जातीचें लोक स्मशानयात्रेला होतें व प्रत्येकाचे हृदय बाबांच्या प्रेमळ स्वभावानें भरून आलें होतें. 'आमच्या गांवचा अन्नदाता गेला' म्हणून गरीबगुरीब सारखें हळहळत होते.

बाबांच्या मृत्यूनंतर दोनच वर्षांनीं त्यांचे एकमेव चिरंजीव विष्णुपंत यांनाहि काळानें ओढून नेलें. त्यांची पत्नी जिला सर्व गांव माई. म्हणत ती अत्यंत साध्वी, प्रेमळ, उदार, व मनमिळाऊ होती. तिच्या कपाळीं वैधव्य आले. पत्नी गेल्यानंतर घरांतील प्रमुख मुले चांगली असलीं तर पत्नीचें टिकतें, नसतां तिचें हाल परमेश्वरहि पाहूं शकत नाहीं. त्याप्रमाणें माईचें पतीच्या पश्चात् झाले. भजन, सप्ताह, द्वादशी, अन्नदान या सर्वांना घरांत फांटा मिळाला. होतें नव्हतें तें दागिनें मुलानीं विकून धंद्यांतहि घातले पण कर्तबगारी नसल्यानें धंद्यांतहि आंतबट्टा होऊन होती नव्हती ती संपत्ती धुळीला मिळाली त्यांत समाधानास थोडीशी जागा म्हणजे वडील चिरंजीव महादेव थोडासा बरा निघाल्यामुळें आईची सेवा मात्र करायचा. दुसरे चिरंजीव हरेकृष्ण मात्र हिऱ्याच्या पोटी गारगोटी किंवा लक्ष्मीच्या पोटी केरसुणी जन्मले.

मॅट्रीक पास झाल्यानंतर ते पुण्यास शिकण्यास राहिले. तेथें मित्र मंडळी दुष्ट मिळाल्यामुळें नाना प्रकाराचे दुष्ट विचार दुष्ट आचार त्यांना जडलें. व धर्माधर्माचा काडीचाहि विचार त्यांना राहिला नाही. बालबोध घराण्याला न शोभणारे सर्व वर्तन त्यांच्या अंगांत मुरले व आईबाप, बहीण भावंडे, यांच्यावरील प्रेम कमी होऊं लागले. व कॉलेजमध्यें असतांना

निरनिराळ्या तरुणींच्या गांठी पडून स्वैराचार सुरू झाला. व शेवटीं अशाच एक स्त्रीशीं त्यांचा प्रेमविवाह झाला. स्त्रीहि पतीच्या स्वभावाला शोभेशीच होती आचारविचार, रहाणें, वागणें सर्वच और, पतीला तिनें मुठींत ठेवले होतें व ती जे सांगेल तो हा नंदीबैल विचार न करितां ऐके.

कांहीं दिवसांनी भावाभावांच्या वाटण्या झाल्या. एकाच घरांत एकेका बाजूंत दोघे राहूं लागले. महादेवाचे मित्र यायचे, हरेकृष्णाचे मित्र यायचे घरांत जायला यावयाला रस्ता एकच. महादेवाच्या घरांत सोवळे, तर हरेकृष्णाच्या घरी महार स्वयंपाकी, महादेवाच्या घरीं पुरणपोळ्या, शाकाहारी भोजन तर हरेकृष्णाच्या घरीं बीरपाणी व मांसाशन. महादेवाच्या घरीं हरहर महादेव व देवपूजेच्या घंटेचा मधुर स्वर कानीं पडतो, व मन प्रसन्न होते. तर इकडे हरेकृष्णाच्या घरांत कोंबडयाच्या पंखांचा फड-फडाट त्यांच्या मानेवर सुरा फिरतांना मुखातून निघालेल्या आर्तस्वर कांनी पडतो व मन सुन्न होतें. हरेकृष्णाच्या घरी निधर्मीयांचा हैदोस व जयघोष यामुळें दोघा भावांची मातुश्री माई, जिला आर्य संस्कृतीचें संस्कार होते, धाकटया मुलांचें वर्तन पाहून वाईट वाटे व त्या वागण्यानें ती मनांतल्या-मनांत कुढें. पुढें पुढे तिला हें असह्य होऊन त्या परिस्थितीनें ग्रांसून तिला दुखणें जडलें. बारीक ज्वर, डोकेंदुखी सुरू झाली. आतां लाजे काजे कां होईना आपणास व आपल्या सुंदर पत्नीस आईच्या समाचाराला जावें लागेल म्हणून हरेकृष्णानें पत्नीसह तेथून बिऱ्हाड हलविलें व एका भाडयाच्या घरांत जाऊन राहिला.

० ० ० ०

माईंचा आजार वाढूं लागला. माईची सून, वडील मुलगा त्यांची मुले सर्वजण एकनिष्ठेनें माईची सेवा करूं लागले. गांवांतील लोकहि समाचाराला येऊं लागले. औषधासाठीं पाण्यासारखा पैसा महादेवानें खर्च केला. पण गुण नाहीं. मिरजेला जाऊन ऑपरेशन करायचें ठरलें. रोग तर असाध्य पण जीवित असेपर्यन्त प्रयत्न करणें हें कर्तव्य आहे असें जाणून महादेवानें आईला मिरजेला न्यायचें ठरविले.

ज्या दिवशीं मिरजेला निघायचें त्याच दिवशीं धाकटया मुलास

हरेकृष्णास व त्यांच्या सुंदर पत्नीस भेटायला बोलाविलें निरोप कळतांच उत्तर मिळाले, ‘ आम्हांला काम आहे. मित्र-मंडळी पाहुणें बाहेरगांवाहून आले आहेत. आमचा ब्रिजचा खेळ रंगांत आला आहे. संपल्यावर येऊं.’ पुनः आईनें निरोप पाठवला. ‘ बाळ! लवकर ये निघायची वेळ झाली आहे. ऑपरेशनमध्यें काय होते कोणास ठाऊक एकदा मला तुम्हांला डोळयांनी पाहून घेऊ दे.’ तरी पण चिरंजीवांच्या हृदयाला पाझर फुटला नाहीं सांगितले, ‘ आमचे येणें होत नाहीं तूं जगली वाचलीस तर पुनः तुझी भेट होईल नसता नाहीं. आईच्या डोळयांत पाणी आलें. हृदयाला कांपरे भरलें, महादेव म्हणाला ‘ माई, जाऊं देग. कशाला ,वाईट वाटून घेतेस? अशा काटर्याला कां कधीं सुख मिळणार आहे? त्याच्या दुष्कृत्याची फळे त्यांस खात्रीनें मिळतीलच. मातेचा, छळ करण्याऱ्याला कधीं सुख मिळाले काय? माई, रडूं नकोस. शांत हो.’ हे वडील मुलाचे शब्द ऐकताच माई संतापल्या ‘ महादेव, तूं हें काय बोलतोस ? कोणासमोर बोलतोस? कशी झाली तरी मी तुम्हां दोघाची आई आहे. सुख देणारा, सेवा करणारा, दुःख देणारा, सुखदुःखाकडे ढुंकूनहि न पाहणारा मुलगा, हे दोघेहि आईला सारखेंच प्रिय असतात. नको, महादेवा, हरेकृष्णाबद्दल असें दुष्ट शब्द काढूं नकोस. मला तुम्ही दोघे सारखेच असें म्हणून माई देवघरांत गेली व परमेश्वरास पार्थना करूं लागली. ‘देवा! माझ्या हरेकृष्णाला व त्याच्या बायकोला तूं खुशाल ठेव. त्यांचा वंश वाढूं दे. त्याला सुख लाभून तो चिरायु होऊं दे. देवा त्याला जगातली सर्व सुखें मिळूं दे.’ असें म्हणून माई उठल्या.

० ० ० ०

मिरजेला ऑपरेशन झालें. रोग असाध्य होता. कांहीं उपयोग झाला नाहीं. अजूनहि माई अंथरुणावर खितपत पडल्या आहेत. तोच रोग तीव्रतर स्वरूप धारण करूं लागला आहे.त्या घटका मोजीत आहेत. एकें दिवशीं त्यांना कोणी येऊन सांगितले कीं हरेकृष्णास १०५ ताप आला आहे तो बडबड करूं लागला आहे. महादेवाला माईनी हांक मारली व म्हणाल्या ‘महादेव! मला गाडीत घालून हरेकृष्णाकडे घेऊन चल. महादेवानें गाडीं केली. हरेकृष्णाला माईनें डोळे भरून पाहिलें. त्यांच्या अंगाला हात लावला व

म्हणाली. ' माझा कृष्णा ! मी दोन वर्षे खितपत पडली आहे पण देव मला नेत नाहीं. व तुझ्यावर कां रे देव रुष्ट झाला? बाळा! घाबरूं नकोस! धीर धर.' हरेकृष्णा भानावर आला त्यानें आईच्या गळयांत मिठी घातली व म्हणाला. ' माई क्षमा कर ! मी अनंत अपराधी आहे. मला क्षमा कर. सर्व विसरून जा मला क्षमा करशील कां ग! माई?' असें म्हणून आईच्या पायावर त्यानें आपलें मस्तक ठेवलें. आईच्या आशीर्वादानें त्याच्या अंगांतील दुष्ट ज्वर राक्षस जळूच खाक झाला. त्याच्या बायकोलाहि पश्चाताप झाला व तिनेंहि सासूबाईना नमस्कार केला. आईचें हृदय काय करूं शकत नाहीं?

म्हणूनच म्हटले आहे:—

स्त्रग्धरा

काका मामी चि बंधू इतर जन तसे
सर्व साथी सुखाचें
येतां वेळा कठीण, कुणि न पुसतसे
पांगती आप्त साचे
निष्काम प्रेम जीचें, बघुनि जगति ये
न्यूनताहि पित्याला
आईचा शीर्षि ज्याच्या अभयकर सदा,
कांपतो काळ त्याला

[आईचा आशीर्वाद मधून]

## शांता अक्का : २२ :

शांताआक्काचे वय झालें होतें पण त्यांच्या स्वभावातील तापटपणा किंचितही झाला नव्हता, शांता या नांवाला शोभणारा त्यांचा स्वभाव नव्हता घरांतील कामें करण्यात त्या अत्यंत दक्ष होत्या, त्यांना

घाणेरडेपणा मुळींच खपत नव्हता. घरांत बरीच गुरेंढोरें होती, त्याचें रोज शेण काढणें, जागा धुवून स्वच्छ करणें, प्रसंगीं गुराढोरांना पाण्यानें स्वच्छ धुणें वगैरे कामाकरितां घरी मजुरीण होती तरी तिचे काम त्यांना पटत नव्हतें. मजुरीण घरी गेल्यावर त्या पुनः सर्व गोठा स्वच्छ करीत. त्यांना बागेंत झाडे, फुलझाडे, वेली, वगैरे लावण्याचा अति छंद, त्या झाडांची पोटच्या लेकरापेक्षांहि त्या जास्त काळजी घेत असत, त्याना दररोज पाणी घालणें तेथे साचलेला कचरा काढणें, मंडप तयार करून वेली वर चढविणें वगैरे सर्व कामें त्या नियमितपणें करीत. त्यामुळें बाग लहात असूनहि तो रम्य दिसे. पण जर कां कोणी फुलझाडांची फुलें वा झाडाचो फळें बिनविचारतां तोडली तर मात्र त्यांच्या तळपायाची आग होऊन त्या वाटेल तशा तोंडाला येईल त्या शिव्या हांसडीत. मग तो कोणी कां असेना ! हे त्यांचे करणें व बोलणें अपराध करणाऱ्यांना अर्थात रुचत नसले तरी त्यांत वावगे काय होते ? माझ्या मते त्यांचें तसे बोलणें संयुक्तिकच होतें अपराध करूनहि त्या बद्दल कोणी बोलल्यास त्यांना राग यावा, हेच आश्चर्य !

त्यांना आतांशा म्हातारपणामुळें भूक फार लवकर लागें त्यामुळें सकाळीं उठतांच त्यांना खायला वा चहा प्यायला मिळाला नाहीं की त्यांचा संताप होत असें. व त्या भरांत त्या आपल्या सूनबाईला टाकून बोलत. किंवा मुकाट्यानें घरांत कांहीं खायला शोधीत त्यामुळें भांडीकुंडीं पडत. डोळयांनीं कमी दिसत असल्यामुळें चष्म्याशिवाय त्याना वावरणें अशक्य होई व चष्मा एकें जागीं ठेवायची त्यांना संवय नसे. बिनचष्म्यानें घरां- तील सामान न सांपडल्यामुळें त्या आदळआपट करीत व संतापत तेव्हां त्यांच्या सुनबाई जरी स्वभावानें बऱ्या होत्या तरी म्हणायच्या 'काय आदळ- आपट लावली आहे ? जरा देखील दम नाही. मी देते ना कांहीं खायला ?' कीं झालें!शांताअक्काचा पारा लागलीच चढायचा, तोंडाचा पट्टा सुरू व्हायचा ! मुलगा जरी आज्ञाधारक होता तरी तोही एकादे वेळी बायकोचा कैवार घेऊन बोलायचा. की पुनः शांताअक्काचा सूर वाढायचा. एके दिवशीं अशाच कांहीं बोलाचाली झाली व शांताअक्कानें रागारागानें आपले घर सोडलें. व एका

शेजारच्या घरीं रागानें जाऊन बसल्या. शांताअक्काचे पति संध्याकाळीं घरी आले. पहातात तो शांताअक्काचा पत्ता नाहीं, सूनबाईंना विचारले.

' आज त्या फार रागावल्या व शेजारच्या यमुनाकाकूंच्या घरीं जाऊन बसल्या. खूप खूप बोलावलें पण त्या येत नाही आतां आठ नऊ वाजलें त्या उपाशी आहेत.' जेवायचे झाले आहे. त्यांना बोलवावें. आमचे कांहीं ऐकत नाहींत. सुनबाईनें उत्तर दिलें.

हें शद्ब शांताअक्काच्या नातवानें व नातीनें ऐकले. व लागलीच ती यमुनाकाकूंच्या घरीं गेले एकदम शांताअक्काच्या मांडीवर तो नातू बसला, व नाती त्यांच्या पाठीला बिलगल्या, व " शांताअक्का चल घरी आम्हाला भूक लागली, आम्हीं तुझ्याशिवाय जेवत नाहीं जा." असें म्हणाली. शांताअक्काचा राग पार वितळून गेला व त्या लगेच घरी आल्या. यथासांग मुलांना जेवण घातलें. मुलगाहि शांताअक्काच्या पाया पडला. सूनबाईना वाईट वाटलें व त्या म्हणाल्या ' सासूबाई ! मी चुकले, क्षमा करा.'

' घरांत भांड्याला भांडें लागतच असते, इतकें मनावर घेऊन कसें चालेल ?' असें शांताअक्काचे पति म्हणाले. अशा रीतीनें वादळ शांत झाले व सुखाचा पाऊस पडला, तापट माणसे वरून कडक असली तरी आंतून निष्कपट व दयाळू असतात हे कांहीं खोटें नाही.

# क्रांतिवीर बालमुकुंद व त्याची वीरांगना : २३ :

रस्त्यावर जिकडें तिकडे चंदनांचे सडे पडले होतें. जागोजागीं सुंदर आणि भव्य कमानी उभारल्या होत्या, रंगीबेरंगीं तोरणे मोठ्या डौलानें वाऱ्यानें फडकत होती. गुलामगिरी पचनीं पडल्यामुळें, दास्यत्वाची कितीहि हलकीं कामें आनंदानें व स्वाभिमानशून्यतेनें करण्यांत कोणालाहि शरम वाटत नव्हती. अधिकाऱ्यांचा थुंका झेलण्यातच त्यांना कृतकृत्यता वाटत होती. गोरगरीब, दीन-दलित इंग्रजांच्या गाडीखालीं वा कधीं बुटाखाली नित्य तुडविले जात होते

दिल्लींत आज एकच गडबड चालली होती. पोटार्थी, स्वाभिमान-रहित, इंग्रजांपुढें गोंडा घोळण्यांत, आपणांस भाग्यवान् समजून मृताची भाकरी खात होते. इंग्रजांसारखे दयाळू व निःपक्षपाती सरकार आम्ही आजपर्यंत कधींच पाहिले नाहीं, असें राजरोसपणें बिनदिक्कत म्हणत होते. देवा! हें आमच्या दयाळू सरकारचें राज्य चिरकाल टिकूं दे, अशी बराच कुटुंबें नित्य देवाची प्रार्थना करीत.

आज लॉर्ड हार्डिंग व्हायसरॉयसाहेबांची मोठ्या थाटांत दिल्लींत मिरवणूक निघणार होती. सायंकाळचे पांच वाजलें. मिरवणूक वाजत गाजत निघाली होती. एक भव्य हत्ती शृंगारला गेला होता. त्याच्या पाठी-वर सुंदर मखमलीचें वस्त्र व त्यावर सोन्याची अंबारी, व त्यांत आमच्या दयाळू सरकारचे लाडके पित्ते लॉर्ड हार्डिंग बसले होते.

हत्तीच्या पुढे बॅन्डवाले मोठ्या तोऱ्यानें बॅंड वाजवीत होते. सर्व रस्ते लोकांच्या गर्दीनें भरून गेले होतें. मांडलीक राजे प्रणाम करून आपली स्वामीनिष्ठा व्यक्त करीत होते.

पण त्या जनसंमर्दामध्ये कांही जणांची मनें प्रक्षुब्ध झाली होती. नुक-त्याच झालेल्या वंगभंगामुळें,देशांतील तरुण संतप्त झाले होतें. प्रजा बिथरली होती. क्रोधाग्नीच्या ज्वाला भडकत होत्या. राजधानींतील मायभगिनी व तरुण खवळले होते. यापैकीं बरेच तरुण वरील मिरवणुकींत गुप्तपणें आले होते. वरातीचा बॅंड जोरजोरानें वाजत होता, तोफांचा कडकडाट कानठळ्या बसवीत होता. वरात मोठ्या आनंदात चालली होती. इतक्यांत मेघगर्जनेप्रमाणें भयंकर आवाज झाला. कोणीतरी गर्दींतून, हत्तीजवळ येऊन लार्ड हार्डिंगवर बॉंब फेकला होता. भयंकर स्फोट झाला. हार्डिंगच्या अंगांतून रक्त वाहूं लागले. जिकडे तिकडे एकच हलकल्लोळ माजला. लोक सैरावैरा पळूं लागले. जिकडें तिकडे एकच गोंधळ झाला.

पोलीसांनीं हजारों निरपराधी लोकांना पकडलें कित्येकांना उलटे टांगून बडवून काढलें. कित्येकाचे हात तोडलें. मिरच्याचा धूर दिला. नग्न करून ढुंगणावर फटके मारले. अंगाची सालटीं लोंबल्यामुळें व रक्तबंबाळ झाल्यामुळें लोक बेशुद्ध पडले.खुनी व्यक्तीचा कसून तपास चालला.क्रांतिवीर

बालमुकुंदालाहि संशयावरून पकडले. भाई परमानंदाच्या अत्यंत पवित्र व उच्च वंशातील, या आमच्या क्रांतिवीराला तुरुंगांत डांबलें. त्याचा अनन्वित छळ केला. त्याच्या सुशील साध्वी पत्नीला हें वर्तमान समजलें. प्रत्यक्ष तुरुंगात जाऊन भेट घेण्याचें तिनें ठरविले. तुरुंगाअधिकाऱ्यांस भेटून आंत प्रवेश मिळविला आंत येऊन पहात्ये तों काय? बालमुकुंद जमीनीवर पडला आहे. थंडीचें दिवस! ना अंथरुण ना पांघरुण! ना पलंग, ना गादी. असा एकच बालमुकुंद नव्हे, तर हजारों क्रांतिवीराचा अमानुष छळ तेथें चालला होता. कुणाला घाण्याला जुंपले होते. कुणी सश्रम जन्मठेप भोगीत होते. दिवसभर श्रम करून खायला मात्र एकादी शिळी भाकर. पण हाल अपेष्टांना तृणवत् मानणारे, बालमुकुंदासारखे वीर मोठ्या आनंदानें हंसतमुखानें शिक्षा भोगीत होते. प्रत्यक्ष काळ त्यांना थरथरां कांपत होता. तुरुंगांत डांबून त्याचें खरें तेज झांकतें काय? तेजस्वी रवि तळहातानें झांकला जातो काय?

जुलमानें लोकशाही दडपतां येईल काय?

रावणासारख्याची सत्ता जेथे खिळखिळी होऊन कोलमडली, तेथें या मशकांची कथा काय? सिंहाचीं नखें काढली, दांत उपटले, तरी त्याचें सिंहत्व नष्ट करता येईल काय? अग्नीमध्यें सुवर्ण टाकले तरी त्याचें सुवर्णत्व नष्ट होतें काय?

० ० ० ०

बालमुकुंदाची पत्नी आपल्या प्रिय पतीला भेटून आली. घरांतील खाट फेकून दिली. तळघरांत गेली. कांबळी अंथरली. तुरुंगातून बालमुकुंदला मिळालेल्या शिळ्या भाकरीचा तुकड्यातून एक लहानसा तुकडा तिनें घरीं आणला होता. तो तोंडात धरला व तशीच पडली. तिला रोज उपवास घडू लागले. शरीर अत्यंत कृश झालें. प्राण डोळ्यांत आले.

इतक्यांत, कोणी कळविले कीं बालमुकुंदला फाशीची शिक्षा सुनावली पुन्हा तडक तुरुंगात गेली. आपल्या प्रिय पतीची भेट घेतली.

बालमुकुंद म्हणाला.

प्रिये ! मला फांशीची शिक्षा झाली यांत आनंदच आहे. जन्म मृत्यु याची काळवेळा ठरलेलीच आहे. ती टाळणें शक्य नाहीं. पण देशासाठीं

माझे बलिदान होत असल्यानें मी धन्य आहे. मी येतो. मला मोठ्या आनंदानें निरोप दे. आपण पुढच्या जन्मीं अवश्य भेटूं. माझ्या आदरणीय प्रिय मातेला माझा निरोप सांग. बालमुकुंद मेला नाहीं. नऊ महिन्यांनी तो तुला पुनः भेटेल. माझा तिला शेवटचा प्रणाम कळव. भारतमातेचा जयजयकार कर.'

० ० ० ०

बालमुकुंदला फांशी दिले. हंसतमुखानें त्यानें मृत्यूला कवटाळलें. पत्नीनें त्याचा मृत देह मागितला. 'कायद्यानें तो देतां येत नाहीं.' उत्तर मिळालें. किती कठोर पाषाण हृदयी सत्ताधारी! असें म्हणून पतीच्या पायाची धूळ घेतली व घरीं परतली. उपवास चालू होताच. मुखांतून 'मुकुंद मुकुंद' हा मंत्रजप सारखा चालू होता. १८ दिवस असेच गेले.

लोकांनी तिला अन्नपाणी देण्याचें खूप प्रयत्न केले पण व्यर्थ! १९ वा दिवस उजाडला, उज्वल तेजोदीप हळूंहळूं क्षीण होऊं लागला व एकदम शांत झाला. आकाशांतून एकदम दोन तारा तुटल्या. सुवासिनींनी तिला कुंकुमतिलक लावला. सौभाग्यचुडे भरले. खणानारळांनी तिची ओटी भरली हिरवे पातळ नेसविलें. सर्व सुवासिनींनी तिला ओवाळले. शेवटीं आमच्या क्रांतिवीराची ही वीरांगना निमाली.ज्योतीत ज्योत मिसळली.

**कितीहि युगें लोटली तरी क्रांतिवीरांचे चिरंजीवित्व कोणासहि हिरावून घेता येणार नाहीं.**

देवनिवास धाराशिव २३।११।५७

# तेजोभंग ! पण कोणाचा ? : २४ :

अखिल भारतीय कॉंग्रेस अधिवेशन ( १९५७ ) च्या जानेवारींत इंदुर येथें भरले हे सर्वविश्रुतच आहे. त्या प्रसंगीं दिवंगत क्रांतिवीरांचीं स्मारकें उभारण्याची स्वप्नेहि साकार होऊं लागली.

झांशीची वीरमती राणी लक्ष्मीबाई इच्या स्मरणार्थ प्रदीर्घ मैल

खांबीचा रस्ता तयार होऊन पदयात्राहि झाली. इत्यादि बऱ्याच घटना या अधिवेशनाच्या निमित्तानें झाल्या.

क्रांतिवीरांच्या पुण्यस्मरणार्थं स्वतंत्र हिंदुस्थानानें हे पुण्यकर्म केले याबद्दल कोणाला आनंद वाटणार नाही. ? व कोणता भारतीय, अशा भव्य स्मारकाचें स्वागत करणार नाहीं?

पण ज्यानी पडीक जमीन नांगरून, मशागत करुन तिच्यातील रुतणारें काटे काढले व योग्य ते खतपाणी घालून जमीन तयार केली त्या भूमि मालकालाच विसरुन जाणें, म्हणणे कृतघ्नतेची कमालच होय !

परकीयांच्या दास्यात शतकानुशतके कुजत पडलेल्या भारतमातेला मुक्त करण्यासाठीं ज्या वीर पुरुषांनें जिवाचें रान केलें, खडतर तपस्या केली, सश्रम बंदिवास भोगले व आपल्या देहाचा कण नि कण भारत मातेचे पायीं वेचला त्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचा–श्रेष्ठ व जेष्ठ युग-पुरुषाचा गौरव करण्याइतकी सहृदयता आमच्या अनेक श्रेष्ठ व्यक्तींना असू नयें ?यापेक्षां दैवदुर्विलास तो कोणता ?

गौरव तर बाजूलाच राहो, पण त्या वीर पुरुषाच्या उदार हृद-याची परिक्षा होऊं नयें किंवा झाली असली तरी क्षुद्र स्वार्थी लालसेनें मदांध होऊन त्यास बंदिखान्यांत डांबून त्यांचा तेजोभंग करण्याची थोडी-शीहि दिक्कत आम्हाला वाटू नये, हे पाहून एका सिंहान्योक्तीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरती
सिंह पाही स्वभावें
काका ! त्वां भीति सारी त्यजुनि
तरुवरीं मांसखंडास खावें
जो उन्मत्तां गजांच्या खरतर नखरी
फोडुनी मस्तकातें
धाला रक्ता पिऊनी नच मृत पशुच्या
इच्छितो तो कोणाते !

वरील श्लोकांत म्हटल्याप्रमाणें स्वातंत्र्यवीर सावरकरांची आजन्म

धीरवृत्ति माहीत असूनहि, त्यांच्याकडे साशंकतेनें क्षुद्र कावळचांनीं ( काकांनीं ) पहावें हें नवल नव्हे काय ?

इंग्रजांच्या काळांत झाला नसेल इतका छळ व तेजोभंग स्वातंत्र्याच्या काळांत झाला तरी ' स्वातंत्र्य मिळविणें हें माझें एकमेव ध्येय व ध्यास, याला गोड फळे आली. मला मिळवावयाचें आतां कांहींच उरले नाहीं.' असें सावरकर म्हणतात. हें त्यांचे उद्‌गार ऐकून रावणाला मारून विभीषणाला राज्य देणाऱ्या निस्पृही श्री रामचंद्रांची आठवण होते. असें रामासारखे उदात्त विचाराचें आमचें स्वातंत्र्यवीर रत्न कोठे व आयत्या पिठावर नागोबा होऊन बसलेले आजचे कांहीं महाभाग कोणीकडे ! स्वातंत्र्यवीरां सारख्या बुद्धिमान, तेजस्वी, कर्तृत्ववान युगपुरुषाचे साहाय्य घेतले असते तर हिंदुस्थान अखंड राहिला असता, कलुषा कबजी सारखा नाशकारक सल्ला देणारा मंत्रीच उत्पन्न झाला नसतां. कन्या-कुमारी ते हिमालयापर्यन्त कन्याकुमारीचा विनयभंग कोणी केला नसता व आमच्या मातेकडे काकदृष्टी टाकणाऱ्यांचें मस्तक धडावेगळें झाले असते व तत्पूर्वीच डोळे काढले गेले असतें !

पण आज याच्या उलट स्थिती भारताची झाली आहे, याचे कारण एकच. आम्हाला स्वाभिमान, देशप्रेम, स्वार्थत्याग, आत्मीयता, व जीवीताचा देशासाठीं होम करणारे पुरुष नकोत, देशद्रोही, स्वजनव्देष्टे, संस्कृति भ्रष्ट लोक हवेत !

स्वातंत्र्यवीरांसारखे प्रामाणिक, धर्मनिष्ट, तत्वनिष्ठ, मातृभक्त यांचा तेजोभंग करण्यांतच पुरूषार्थ मानणारे हे देशविघातक! पण सत्यसूर्याचा तेजोभंग कधीच होत नसतो. सूर्याच्या तोंडावर थुंकणाऱ्यांच्या तोंडावरच थुंका पडतो हे तत्व समजत असूनहि उमजत नाहीं, अशांनी किती जरी अपमान करून तेजोभंग करण्याचा दुष्ट प्रयत्न केला तरीं सत्य तें सत्यच !

मत्सर हा भारताचा कलंक आहे, फितुरी त्याची बहीण आहे ! ही दोन भावंडें नसतीं तर सदाशिवराव भाऊ पानपती पडला नसता, संभाजीचा वध झाला नसता, नारायणरावांचा खून गारद्यांनीं केला नसता, हिंदुस्थान परकीयांच्या हातीं पडला नसता व वीर सावरकरांचा अपमान

व तेजोभंगहि झाला नसता, पण हें कुभावित अखंड सत्य ठेवण्यासाठींच या महाभागांचा जन्म आहे! पण जेथें कंस, रावण, हिरण्यकश्यपू, शिशुपाला-सारखे रसातळाला गेलें, तेथें या क्षुद्रांची कथा काय?

खऱ्या वीर पुरुषांचा तेजोभंग केल्याने तेजोभंग करणाराचाच नाश होतो, हें कळत असूनहि देखील ज्याअर्थी उमजत नाहीं त्याअर्थी 'विनाश काले विपरीत बुद्धी' असेच म्हणावे लागते. डॉ. ना. भा. खरे व इतर सज्जनांनीं स्वातंत्र्यवीरांचा यथोचित गौरव करण्यासाठी विनंति केली पण ती कित्येकांना मानवली नाहीं. 'स्वभावो दुरतिक्रमः' याला कोण काय करणार?

तेजोभंग करण्याचा कृष्णमेघांनी कितीहि प्रयत्न केला तरी अनुकूल वारा वाहतांच कृष्णपटलें कृष्ण करतील व एके दिवशीं याच तेजोनिधीला शरण येतील, किंवा स्वतः नामशेष होतील! काळ अनंत आहे व पृथ्वीही विपुल आहे.

प्रसिद्धी (विवेक २३ डिसेंबर १९५९

## पुराणांतील वांगी : २५ :

गावांत कोणी प्रवचनकार, कोणी कीर्तनकार, व्याख्याता आला की आमचे गांवचें वकील शामरावसाहेब, न चुकतां तेथें हजर असायचें. अशी एक ना जवळ जवळ ३०-४० वर्षे त्यांचें श्रवणभक्तीचें स्तुत्य काम अव्याहत चालू होते. इतकेच नव्हे तर कोणी मित्र भेटला असता त्यालाहि ते कार्यक्रमास ओढून नेत.

घरीं देखील ज्ञानेश्वरीची आतापर्यंत १०८ पर्यंन्त पारायणें, भागवत रामायणाची अनंत पारायणें झाली असतील, रुद्राक्षाच्या माळांनीं गळा पुष्ट झाला होता. रामदासांचें श्लोक, रामनाममंत्राचा जप अखंड चालूच असे. घरची वडिलार्जित इस्टेट बरीच होती. त्यातून वकीलीहि चांगली चालत होती. खऱ्या साधूला व परमार्थालाहि लाजविणारें त्यांचें बाह्यावरण होते श्री समर्थांची पालखी त्यांच्या गावांतून जात असे, त्यावेळीं आपले

खर्च करून यानीं गावांतून वरीच पट्टी गोळा केली. पालखी आल्यावर तिचा सत्कारहीं थाटांत होत असे, लोक याबाबतीत शामरावांची वाखाणणी करीत. असले प्रकार पाहून शामरावांबद्दल सर्वांना आदर वाटे. मला शामरावाचें अंत:करणाचा ठाव कांही व्यक्तीनांच लागला होता. साधेभोळे लोक यांच्या बाह्यांगाला भुलले होते व म्हणत ' गावांत शामरावासारखा सात्विक, धार्मिक, मनुष्य सापडणे क्वचितच.' पण जग दिसते तसें नसतें बाह्य वेषावरून माणसांचें अंतःकरण कळत नसतें. शामरावाच्या नित्य सहवासांत असणारें मित्र मात्र शामरावांना पक्के ओळखून होते.

शामरावांची श्रवणभक्ति दांडगी असूनहि ' नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडून गेले वारे ' या सुभाषितांनीं शामरावांना घेरले होतें हें त्यांच्या मित्रांस पूर्णपणें माहीत होतें एकाही व्यसनानें शामरावांना सोडले नव्हते. प्रवचन सपताच घरी न येतां शामराव गुत्त्यावर जात तेथून अनाथ, अखड सौभाग्यवती स्त्रियांचा समाचार घेत. सकाळी पंच पच उषःकालीं घरी येत, व प्रातःस्मरणापासून सर्व धार्मिक विधी ते पार पाडीत. १० ते ४ कोर्ट नंतर सायकाळीं प्रवचनें वगैरेंना उपस्थित रहाणें. कित्येक अनाथ स्त्रियांचा प्रपंच शामराव चालवित. पण निस्वार्थीपणानें नव्हे. कोणी विव्दान ब्राह्मण वा प्रवचनकार आला तर त्याचा सत्कार ' परस्परं समर्पयामि ' या तत्त्वाला धरून करीत. खिशांतली एक कपर्दिकहि काढून ते देत नसत, हजारो प्रवचनें श्रवण करून, रामायण, भागवताचीं नित्य पारायणें करीत असतांहि शामरावांत शीलाचीं पूज्यता कां असावी हे कोडें त्याच्या मित्रांना उलगडत नसे वा एकदां त्यांच्या मित्रांनी त्याचे वर्तन त्याच्या गळीं उतरावें म्हणून प्रयत्न केला. व कांहीं सुधारणा झाल्यास पहावे म्हणून त्या मित्रांनी रामरावांना एकांतात गांठलें व त्याच्या या विपरीत वर्तनाबद्दल विचारले ' शामराव, आपण सकाळपासून संध्याकाळपर्यन्त आपला काळ भजन पूजनांत घालवतां, हजारो विव्दानांची प्रवचनें ऐकतां रुद्राक्षाच्या माळा घालतां. श्रीरामदासभक्त म्हणवून समर्थांना आळवता असें असतांना आपल्या आचरणांत तसा फरक कां पडत नाहीं?' त्यावर शामराव म्हणाले ' बाबा ! जगांत असें वागल्याशिवाय मोठेपणा, प्रतिष्ठा मिळत नसते. दाखवायचे व चावण्याचे दांत एक ठेवून प्रपंच चालत नसतो. पैसा मिळत नसतो. मी रात्रदिवस पोथ्या पुराणे वाचतो. ' पण पुराणातील वांगी पुराणातच' या सुभाषिताप्रमाणे तंतोतंत वागलो. नसतों आज जो मला मान मिळतो, पैसा मिळतो, तो कधींच मिळाला नसता

एवढा मोठा बंगला, मोटार, भोगैश्वर्य मिळण्यास असेंच वागावें लागतें,

चारहि धाम केले, हजारो देवतांची दर्शनें घेऊन कपाळाला घट्टे पडलें तरी माणुसकी येणें हे वेगळेच. गाडीत बसून स्वतःला चार माणसांची जागा अडवून बसणें, देवदर्शनाला वा कीर्तनाला गेलें असतां, मधूनच उठून हळूच कीर्तन चालले असतां चोरून स्त्रियांवर नेत्रकटाक्ष टाकणें, गर्दीतून चाललें असता सहजच एकाद्या लक्ष्मीवर व लक्ष्मीकांताच्या खिशांत हात टाकणें व घालणें, नेमकी पादत्राणें एकेकच चोरून विजोड करून ठेवणें व आपल्या वासनातृप्तीसाठी वाटेल तसे चाळे करणें. या गोष्टीला पायबंद न घालतां कितीहि रामनाम जपलें चारहि धाम यात्रा केल्या तरी काय उपयोग? आंत कोरडा पाषाणच. अंतःकरण जोपर्यंन्त सरळ व निर्मळ होणार नाही तोपर्यन्त हे बाह्य उपचार व्यर्थ होत. स्वार्थ, दगलबाजी जाणार नाहीं तो पर्यन्त हजारो पुराणे, कथा परायणे केली चित्तवृत्ति जोपर्यन्त वावरीं आहे तोपर्यन्त वरवर कितीहि भाव आणला तरी आमचा कायापालट होणें शक्य नाही व तो पर्यन्त पुराणांतील वांगी पुराणांतच रहाणार हें कटु सत्य आहे.

## अपसिंग्याचें ऐतिहासिक महत्व : २६ :

"अपसिंगा" हे खेडेगांव तुळजापूरपासून चार मैलांवर असून अगदी खोलांत आहे, त्या गावीं जाण्याकरितां डोंगरावरून बरेच खालीं उतरावें लागते. गांवकऱ्यानीं श्रमदानानें एक रस्ता, मोटार व इतर वाहनें येण्याजाण्यासाठी मोठ्या श्रमानें व उत्साहानें नुकतांच तयार केला आहे. तो लवकरच चांगला होईल. येथें नरेंद्र हायस्कूल या नावाचें एक विद्यालय नुकतेच स्थापन झालें आहे. त्यास सरकारी ग्रॅन्ट मिळाली असून गावांतील एका उदारधी गृहस्थानें एक मोठी जमीनहि शाळेला मदत म्हणून दिली आहे गावांतील सरपंच सध्या अण्णासाहेब रोहीणकर असून त्यांचे या कामांत बरेच लक्ष आहे.

श्री. अण्णासाहेबांनीं व गावकऱ्यांनी या गावांचा जो रोमांचकारी इतिहास सांगितला तो अत्यंत उद्बोधक असून त्या वेळेच्या परिस्थितीवर बराच प्रकाश पाडणारा आहे. 'आपसिंगें' या नांवाविषयी निरनिराळ्या कथा आहेत.

(१) या गांवीं खूप पाणी आहे. प्रत्येक घरांत दोन दोन आड असून, त्यांना बारा महिने विपुल पाणी असतें. गावाबाहेरहि खूप पाणी आहे पाण्याचें शिंग म्हणून 'आपसिंग' असें नांवें पडलें असें कित्येक म्हणतात.

सध्या ज्याला अर्पसिंग म्हणतात, त्यासच पूर्वी लिंबगांव म्हणत. जवळच दुसरे गांव आहे त्यास पारगांव म्हणत दोन्ही गांवे एक करुन त्यास आपसिंग हें नांव दिले आहे, येथें एक किल्लावजा गढी आहे. त्यावर परगावाहून कोणी एकानें गोळा टाकला तो येथें लिंबगांवात न पडल्यामुळे त्यास अपयश आले म्हणून या गावांस अपयशसिंग म्हणतात. त्याचाच अपभ्रंश आपसिंह असेंहि म्हणतात.

(३) या गांवच्या डोंगरांतील गुहेंत शिंगीबुवा नांवाचें कोणी साधू १२ वर्षे राहिला गावांतील वेशींत जो मोठा भव्य दरवाजा आहे. तो फारच अप्रतिम असून त्याच्या आंतील भाग किल्लयाच्या धर्तीचा आहे. त्या वेशींत एक मोठें भुयार आहे. त्याचा थांग कोणाला लागत नाहीं. पण वेशीतून तुळजापूरच्या देवळापर्यन्त एक वाट गेली आहे असे म्हणतात

या वेशीतील भुयारांत वर उल्लेख केलेले शिंगीबुवा रहात फक्त पोटापुरतीच भिक्षा मागायची व तीहि मिळाली नाहीं तर तेवढीच चोरी करायची व तपश्चर्या करावयाची.

पाणी पुष्कळ व शिंगीबुवांचें वास्तव्य म्हणून या गावांस 'अर्पसिंगा' हें नांव पडलें असाहि तर्क लोक करतात.

वरील दोन तीन आख्यायिकांवरुन 'आपसिंगा' या नावाची उपपत्ती असून शेवटचा तर्क विश्वसनीय वाटतो

प्रत्यक्ष पुरावा म्हणजे सध्याचें सरपंच श्री अण्णासाहेब रोहिणीकर यांचा आहे. श्री. अण्णासाहेबांचे पणजे ( १ ५६ फसली म्हणजे जवळ जवळ १२५ वर्षांची गोष्ट आहे.

हें निंबाळकर जहागिरदार यांचें कारभारी होते, अर्पसिंगा येथील गढींत तें रहात असत त्यांना एक बंधु होता. बंधुबंधूंमध्ये वैमनस्य होते. ( हा महाराष्ट्राला शापच आहे. ) त्यापैकी एकानें आपल्या भावास ठार करून आपणच सर्व कारभार पहावा, म्हणून उत्तर हिंदुस्थानांतून ५०० रोहिले आणविले, व सध्याचे सरपंचांच्या पणजाचा काटा काढला.

ती हकीकत अशी—

किल्ल्यावर रोहिल्यानी वेढा दिला, हें समजतांच रात्रीच्या रात्रीं अण्णा-

साहेबांच्या आजोबांना एका घोंगडींत गुंडाळून किल्ल्याच्या मागच्या दारानें विश्वासू नोकरांच्या साहाय्यानें, त्याच्या धाकट्या भावानें बाहेर काढले: पण याचा सुगावा रोहिल्यास लागतांच ते शोधार्थ बाहेर पडलें. यांचा दुसरा बंधूहि बाहेर पडला. त्यास पकडून त्याचें हातपाय जाळून त्यास हालहाल करुन मारिलें पण त्यानें आपल्या बंधूंचा पत्ता लागूं दिला नाहीं. रोहिल्यानें कांहीं दिवस धूमाकुळ घालून तेथून लूटमार करुन पळ काढला. पुढे भूमकर जहागिरदारानें हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. सध्याचे अण्णासाहेब ( ठेवलेल्या कारभाराचे वंशज होत. ) त्यांच्या आजोबानें विश्वासानें बाजू राखिली म्हणून त्यांना येथें घरदार जमीन वगैरे बहाल केली आहे.

रझाकारांच्या काळांत जो येथें धुमाकूळ माजला त्यांत या गावांतील चार पांच लोक, त्याच्या तरवारीला व गोळीला बळी पडले. शूरपणानें लढतां लढतां ज्यां ठिकाणी हे मारलें गेले त्याचें पुण्यस्मारक गावकऱ्यांनी उभारले आहे. त्यापैकीं एकाचे नांव वर्तक आहे असें मला समजले, पूर्वी देऊळ असून त्याची मशीद केलेली, पण काळ अनुकूल येतांच, पुनः त्या मशीदीचे रुपांतर राममंदीरांत करून गावकऱ्यांनी आपला स्वाभिमान जागृत केला. या हुतात्म्यांच्या स्मारकाकडे व घडलेल्या रोमांचकारीं घटनेंमुळें, अंगावर शहारे येतात, व अशा थोर हुतात्म्याच स्मारक, गावकऱ्यांनी केल्याबद्दल त्याच्या परंपरागत वीरत्वाची खरी साक्ष पटते.

गांव लहान असून २००० लोकसंख्येचे, पण त्याची वीरत्वशक्ति, त्यांचा प्रचंड उत्साह रस्ता नसतांना अखंड श्रमदान करून रस्ता बनविण्याची धमक व उत्साह व एकाच वर्षात मॅट्रिकपर्यन्त वर्ग उघडण्याची हिंमत व चिकाटी पाहून, त्याचें कौतुक किती व कसे करावें हें समजत नाहीं उस्मानाबादचें श्री. साने इंजिनीयर यांनी गावांला सडक व रस्ता तयार करण्यांत फार परिश्रम घेतले आहेत. खेड्यांतून आज जीं जागृति, होत आहे ती पाहून, खेड्यांतच निर्मलपणा, माणुसकी, उत्साह प्रचंड शक्ति शील व चारित्र्य आहे यांत शकाच नाही.

( विवेक ' औरंगाबाद प्रसिद्ध झाले. )

## साहित्यिक व संपादक : २७ :

[ स्थळः––पुणें येथील ‘ दुपार ’ ऑफीस वेळ दुपारी १२ वाजल्याची संपादक महाशय व त्यांची कारकून मंडळी: व मॅनेजर साहेब काम करी

आहेत. ऑफीसच्या दारावर पट्टेवाला सिगारेट ओढीत आहे ]

साहित्यिक (पट्टेवाल्यास) ' कायरे! संपादक साहेब आहेत कां आंत?

पट्टेवालाः--काय काम आहे? रावसाब! बाहेर झाडाखालीं बसा. मी पाहून येतो, काय सांगू साहेबाला? कोण आले म्हणून सांगू

साहित्यिकः--ही घे चिट्ठी माझ्या नावाची आणि दाखव तुझ्या साहेबाला (चिट्ठी घेऊन पट्टेवाला आंत जातो. संपादकाना चिठ्ठी देतो.)

संपादकः--राम्या! हं. बोलाव त्यांना आंत (निरोप पोंहचताच साहित्यिक आंत जातात)

साहित्यिकः--नमस्कार साहेब!

संपादकः--या बसा. अरे खुर्ची आणरे राम्या ! (राम्या खुर्ची आणतो साहित्यिक बसतात) हं बोला. काय काम आहे?

साहित्यिकः--मी एक साहित्यिक आहे मराठवाड्यांत असतो. मधून मधून कादंबरी, लेख, लघुकथा व काव्य करीत असतो.

संपादकः--पुरे पुरे. तुमची विद्वत्तेची तारीफ, मला नको आहे. तुम्हीं कां आलांत? याचे उत्तर द्या. मला इतर कामें आहेत.

साहित्यिकः--मी एक वर्ष होत आलें आपल्याकडे २ लघुकथा, एक काव्य व एक नाटयछटा पाठविली होती.

संपादकः--बरं मग ! त्याचे काय झाले ? ती बुकपोस्टनें पाठविली कां रजिस्टरनें?

साहित्यिकः--' परत पावतीच्या रजिस्टरनें '

संपादकः--त्यावर सही कोणाची आहे ?

साहित्यिकः-तुमच्या कारकुनाची.

संपादकः--रसीद आणलीस?

साहित्यिकः--हा पहा. (रसीद दाखवितो. सही व तारीख पाहून घंटी वाजवतो. राम्या येतो.)

संपादकः--' राम्या ! कुलकर्णींना बोलव. ' (जातो) (कुलकर्णी येतात.) कुलकर्णी ! ही सही तुम्हीच केली काय ?

कुलकर्णीः--होय '

संपादकः--मग ते लेख कोठें आहेत ?

लकर्णीः--मजजवळच आहेत.

संपादकः--मला कां दिलें नाहींत?

कुलकर्णी--मी देण्यासाठीं आणले होते, पण आपणच ते परत मला

दिले व म्हणाला, ' सध्या ठेवा तुमच्याजवळ. मागेन तेव्हां द्या.'

संपादकः—मी विसरून मागितले नसले तरी, पुनः स्मरण करून द्यायचें तुमचें कर्तव्य नाही काय ?

कुलकर्णीः--होय पण आपल्या आज्ञेशिवाय मी कसें आणूं ?

संपादकः--बर बर जा ! (साहित्यिकाकडे वळून) 'मिस्टर! तुम्ही लेख पाठविले हें मला स्मरते पण तुम्ही कुठले साहित्यिक?

साहित्यिकः—मराठवाड्यांतील.

संपादकः--तुमचें नांव काय?

साहित्यिकः--बाळकृष्ण नरहर जोशी

संपादकः---काय पास आहांत?

साहित्यिकः—नॉन मॅट्रिक.

संपादकः---नॉन मॅट्रिक! अन् तुम्ही लेख लिहितां आणि पाठवितां?

साहित्यिकः—होय साहेब

संपादकः—घादांत खोटे. तुम्ही पदवी परीक्षा पास असतां तर आम्ही आपले लेख डोळे झांकून स्वीकारले असते. वरं ! तुमचा येथें कोणत्या साहित्यिकांशी परिचय आहे काय?

साहित्यिकः -नाहीं.

संपादक --कोणाची चिठ्ठी आणली काय ?

साहित्यिकः—नाहीं.

संपादकः---तुम्ही चांगल्या प्रसिद्ध लेखकांच्या लेखांतून बेमालूम कांहीं चोरून, आपले स्वतःचें म्हणून लेख लिहितां काय?

साहित्यिकः—नाहीं.

संपादकः--पाश्चात्य इंग्रजी कादंबरी वा कविता यांतील चौर्य तुम्ही कधीं केले काय?

साहित्यिकः--नाहीं.

संपादक—ऑल इंडिया रेडिओंत तुम्ही कधीं काव्यगायन व एकादा लेख वाचला आहे काय ?

साहित्यिकः--नाहीं.

संपादकः—कवि संमेलनांत कधीं काव्य गायले कां ?

साहित्यिकः—नाहीं.

संपादकः--नवकाव्याची कुशलता तुमच्या काव्यांत आहे काय ?

साहित्यिकः--ती कोणती ?

साहित्यिक व संपादक .... वि: ..........११ ..
क्रमांक ....................... नों: दि: ..........

संपादकः—'अहो ! नवकवींचें काव्य दुर्बोध असून ते रसिकानांच काय पण स्वतः कवींनाही समजत नाहीं' असें तुमचें काव्य आहे काय ?

साहित्यिकः —नाही; पण नवकवींबद्दल आपणांस आक्षेप कां असावा? मी कांहीं प्रसिद्ध व प्रतिभाशाली नवकवींच्या कविता वाचल्या आहेत. उदाः—श्री. मर्ढेकर, श्री. मंगेश पाडगांवकर व बा. भ. बोरकर वगैरेंच्या कविता तर मला समजतात. मला त्यांच्या काव्याबद्दल आदर आहे मग तुम्ही असें कसें म्हणतां?

संपादकः—अहो! पण मी कधीं यांचे काव्य वाचलें? लोकांनी मला सांगितले व जे मी ऐकलें त्यावरून मीं हे सांगत आहे इथे सर्वांची काव्यें वाचायला आम्हाला कोठें वेळ आहे? आमचे वर्तमानपत्र, साप्ताहिक व मासिक यांचा खप व्हावा एवढीच आमची दृष्टी नवकवींच्या काव्याला मागणी आहे म्हणून मी म्हणालो. संपादक असला तरी त्यास सर्वच यावे असा काय तो परमेश्वर आहे? बरें! जाऊं द्या-

संपादकः—तुमच्या काव्यांत शृंगारपर भडक वर्णनें आहेत काय ?

साहित्यिकः—नाहीं

संपादकः—तुम्ही देवाबद्दल श्रद्धा बाळगतां काय?

साहित्यिकः—होय

संपादकः—तुमच्या कादंबरीत चुंबनादि प्रकारचें कांहीं नमुनें आहेत काय?

साहित्यिकः—नाही.

संपादकः—तुमच्या काव्यांतील शृंगार तरुण तरुणींना वेड लावतो का?

साहित्यिकः—नाहीं.

संपादकः—अहो महाशय! मग आहे तरी काय तुमच्या साऱ्या लिखाणांत ? दुर्बोधता नाहीं, शृंगारवर्णनें नाहींत, चुंबनादि प्रकार नाहीत. ईश्वराचा उपमर्द करणारें अलंकार नाहींत, सारे, सारे व्यर्थ! माफ करा आपले लिखाण कृपा करून आत्ताच परत घेऊन जा. नवकवींची काव्य पुस्तके वाचा. बुरसटलेलें विचार टाका, ईश्वराच्या नांवानें खडे फोडा, म्हणजें तुमचें लिखाण आम्ही स्वीकारूं कळले? मात्र प्रत्येक कवितेगणिक एक एक सुंदर तरुणीचा नग्न फोटो असावा, किंवा पतिपत्नींच्या चुंबन विषीचें चित्र तीनरंगीं मुख-पृष्ठावर असावें. आलं ध्यानांत!

साहित्यकः—होय.

संपादकः—असें असेल तर आम्हीं मोठ्या आनंदानें आपले लिखाण

स्वीकारूं. वाटल्यास मोबदलाहि देऊं ! समजलांत.

साहित्यकः––होय ! बरं. नमस्कार.

( या गोष्टीला कांहीं दिवस लोटतात, अेके दिवशीं तोच साहित्यिक अेक बाड बगलेंत मारून घेऊन येतो. )

साहित्यक:––नमस्कार ! संपादक साहेब

संपादक:–– नमस्कार, नमस्कार. बसा तुम्हीं मागे अेकदां आला होना. मला आठवते.

साहित्यकः––होय साहेब !

संपादक:––पाहूं तुमचे लिखाण. (साहित्यिक आपले बाड पुढे करतो त्यांत दोन लघुकथा. उत्तान शृंगार वर्णनपर असून नग्न स्त्रियांचा वर नृत्य करतांना फोटो आहे. कांदंबरीच्या पहिल्या पानांवर चुंबन विधी चा प्रकार दाखविलेला तरुण तरुणींचा फोटो आहे, काव्यांत देवाला शिव्या हांसडल्या आहेत व देवांची मूर्ति फाडून त्याला कवि लाथा मारीत आहे असें दृश्य चित्र आहे. काव्यातील अलंकार. कादंबरीतील पात्रांचें संवाद लघुकथेचें वर्णन हें उत्कृष्ट साधले असून त्यांत स्वतः कवीचे कांहींच अंग नाही, इतका निर्लेप कवि आहे. संपादकांना सर्व पटलें.

संपादकः––अहो साहित्यिक ! सर्व पटलें पण तुमच्या नावापुढे एम. ए. एल. एल. बी लिहिलें नाही.

साहित्यिक ––होय, चुकलो. पण तसा मी नाही.

संपादकः–तसा नाही ? मी सांगतो लिहा पदवी तुमची. (पदवी लिहितो.) लेख लवकरच छापूं. पुढल्या सोमवारी भेटा म्हणजे तुम्हाला पत्र देतो.

साहित्यिक:–––कोणाला ?

संपादक:–––रेडिओ स्टेशनच्या मॅनेजरला

साहित्यिक:–तें कां ?

संपादकः––अहो तुम्ही या तर खरं !

[ सोमवारीं साहित्यिक येतात व संपादकांकडून एक पत्र घेतात. पत्रांतील मजकूर असा–––

सा. न. वि. वि.

पत्र घेऊन येणारे नामवंत साहित्यिक, उत्कृष्ट कवि व लेखक आहेत. आपल्या आजच्या तरुण वर्गाला व तरुणींना पटण्यासारख्या त्यांच्या कविता आहेत. असा विव्दान साहित्यिक क्वचितच सापडेल. त्यांना रेडिओवर चान्स द्यावा.

आपला––संपादक ' दुपार '. ]

साहित्यिक पत्र घेऊन गेले. पत्र पाहताच मॅनेजर साहेब म्हणाले, उद्यां ८-१५ ला सकाळीं तुमचा कार्यक्रम ठेवला आहे, दुसरे दिवशीं साहित्यिकाच्या कार्यक्रमाला आरंभ झाला काव्य थोडे म्हणणें चालू होते न होते तोच तार आली. मॅनेजर साहेब ! ही कविता माझी आहे. मला न विचारता कोण गात आहे? तुम्ही परवानगी कशीं दिली ?

मॅनेजरः--ते स्वतः साहित्यिकाला विचारा. माझें काम डोळे झाकून जे येईल ते स्वीकारुन उत्तेजनाचें आहे. सायंकाळीं १०-१५ ला त्याच साहित्यिकाचें भाषण सुरू झाले. लागलींच दहा मिनीटानीं पुनः wire आली 'हा लेख माझा आहे कोणाच्या परवानगीनें हे भाषण चाललें आहे?'

मॅनेजरसाहेबः--साहित्यिकाला विचारा.

कवि व लेखक त्या स्थळीं धावून आलें. साहित्यिकास विचारले ही कविता, ' हा लेख तुम्ही लिहिला काय ?

नाहीं

मग तुम्ही कां गायली कविता. कां वाचला लेख ?

साहित्यिकः--अहो असें केल्यशिवाय संपादक महाशय, रेडिओ मॅनेजर हे काव्य वा कविता स्वीकारीत नाहींत.

खरे लेखक व कविः--असें कोणी सांगितले?

साहित्यिकः--' दुपारच्या ' संपादकांनीं.

खरे लेखक व कविः--बरं! तुमचें शिक्षण किती झाले.

साहित्यिकः--मी ' नॉन मॅट्रिक ' आहे.

खरे लेखक व कविः--वृत्तपत्रांत तर तुमच्या नांवापुढें एम्. ए. एल्. एल्. बी. असें लिहिलें आहे.

साहित्यिकः--तसें लिहण्यासही संपादकांनींच सांगितले.माझी काय चूक?

खरे लेखक व कवि उद्‌गारले, 'वारे संपादक, रेडिओ मॅनेजर यांत काय चूक आहे? बाळकृष्णपंतानीं तेथून हळूच काढतां पाय घेतला व क्षणांत दिसेनासें झालें. असे किती तरी प्रकार आमच्या समाजांत चालले आहेत. सर्वच संपादक व साहित्यिक असें आहेत असें नाहीं वानगीदाखल म्हणून अशा प्रवृत्तींच्या कांहींचा उल्लेख केला आहे. आजकालची हीच आमची आवड व हीच आमची सुधारणा. [ संपादक व साहित्यिकांची क्षमा मागून ]

देव निवास.बाराशिव दि. २५।२।५८

* * *

# श्री समर्थांची शिकवण व कार्य : २८ :

गिरिकंदरांत राहून, कंदमुळें खाऊन, तपश्चर्या करून, हठयोगादि साधनें करून किती तरी संतांनी आपला स्वतःचा उद्धार करून घेतला व जीविताचे अंतिम साध्य जो मोक्ष तो मिळवून स्वतः कृतार्थ झाले. त्यांनीं आपलें जीवितसाफल्य करून घेतले यांत व्यक्ति या दृष्टीनें महत्व असलें तरी 'जनीं जनार्दन' मानून, त्यांच्या हाल अपेष्टा, त्यांच्या धर्माचा उच्छेद, धर्माविषयीं, देशाविषयी उदासीनता, स्वाभिमानशून्यता, साध्वी स्त्रियांची परधर्मीयाकडून होणारी भ्रष्टता पाहून ज्याच्या मनाला उव्देक व संताप वाढून ज्यानें देशधर्मरक्षणार्थ सबध आयुष्य वेचलें व आपला देश जागृत केला त्याचे जीवितकार्य वरील संतसाधूपेक्षां किती तरी पटीनें उच्च आहे हे समर्थांच्या कार्यावरून स्पष्ट होतें समर्थांचे कार्य महाराष्ट्रापुरतेंच सकुचित नसून ते सर्व देशाकरितां होतें. सूर्यप्रकाशाचें कार्य जसे सर्व चराचरांना जीवन देण्याचे आहे, तें एका विशिष्ट प्रांतासाठीं नसून सर्वत्र आहे तसेंच समर्थांचें कार्य केवळ महाराष्टालाचा जीवन जागृति करणारे नसून सर्वांनाचा जागृतीपर होतें

समर्थांनी जरी विवाहप्रसंगांत गृहत्याग केला असला, तरी त्यांनी लोकास 'प्रपंच करावा नेटका,' मग करावें परामार्थ विवेका। येथें आळस करूं नका। विवेकी हो॥ एका गालांत मारली असतां दुसरा गाल पुढें करावा असा नेभळट सिद्धांत रामदासांनां मान्य नव्हता, तर 'खटासी असावें खट। उद्धटासी उद्धट' या वरून भगवत्गीतेंत कृष्णानें अर्जुनास सांगितलेले तत्त्व 'ये यथा मा प्रपद्यंते तांस्तथैव भजामहम्' हे रामदासानांहि मान्य होते समर्थांच्या प्रचार कार्याविषयी लिहायचें झाल्यास त्यानीं ग्रामाग्रामांतून स्थापन केलेली राममंदिरे, हनुमानाची देवळें, व त्यावर उभारलेला भगवे ध्वज, हेंच होय. हनुमान हा बलशाली, ब्रह्मचारी, सत्य-निष्ट रामाचा एकनिष्ठ सेवक,त्याचें आदर्श चारित्र्य सर्वांच्या डोळयासमोर सतत राहावें व त्याप्रमाणें बलशाली व देशाचे एकनिष्ठ सेवक बनावे, गावात अशी बलसंपन्न व देशभक्त व्यक्ति असल्यास त्या गावाकडे वा देशाकडे वक्रदृष्टीनें पाहण्याची कोणासहि छाती होणार नाहीं. या एकमेव विचारानें श्रीसमर्थांनी मारुतिरायाची स्थापना वेशीच्या तोंडाला केली. यांत किती राजकारण व केवढी धूर्तता आहे हें स्पष्ट होते. मारुति रायाची देवळे, तालीमखानें व तालमीचे आखाडे स्थापून श्री समर्थांनी केवढें मोठें कार्य केलें हें सहजच लक्षांत येतें. त्याचप्रमाणें जागजागी

मठ स्थापना करून योग्य अशा मठाधिपतीची नेमणूक करून सदैव देश जागृत ठेवण्याचें कार्य काय लहान आहे ?

भिक्षा मागून जास्त झाल्यास ती विकून पैसा संग्रहीं ठेवणारें साधू पहा व श्री शिवरायाने 'राज्यदान' दिलें असतांनाहि ते पुनः परत करणारें निस्पृही रामदास पहा. राजकारण तर रामदासांच्या हाडीमासीं खिळले होते. इषारतीचें बोलूं नयें, बोलायचे लिहू नये, लिहायचे सांगूं नये, जे काय करायचे ते न बोलतां न समजतां करावें, तरच कार्यभाग शेवटाला पोहचतो. हें शब्द किती मोलाचें आहेत. आम्ही न करता आधींच त्याची वाच्यता करतो त्यामुळें जें होणारे असेल त्याचें आधींच त्याचा बोभाटा होऊन कार्यनाश होतो. समर्थांना सदासर्वदा देशाचीच चिंता होती. देशाटन करीत असतां त्यांना सारा देश संकटग्रस्त दिसला. मुसलमानांचा नंगानाच चालू होता. देशांत दैन्य दुःख, दारिद्र्याची परिसीमा झाली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नव्हता. प्रजापालन करणारा राजा, तोही लांचलुचपत, स्त्रियांचें अपहरण, गरीबांची पायपल्ली करीत होता. किती तरी साध्वींची विटंबना झाली. कितीक भ्रष्ट झाल्या, कितीतरी विकल्या गेल्या. असें अनेक अनन्वित् प्रकार देशांत चालूं होते. हे पाहून समर्थांचें हृदय कळवळले. तेहतीस कोटी देव हिंदू धर्मांत असून देखील

कित्येक दावल मलकास जाती ।। कित्येक पीरास भजनी'

कित्येक तुरुक होती स्वेच्छेनें । याचे समर्थांना दुःख होई संतांच्या भावड्या शिकवणीचा परिणाम लोकांवर होऊन सारा देश उदासीन बनला होता. पूर्व पश्चिम दिशा यांचें ऐक्य करणें, भिन्न संस्कृतीमध्यें सलोखा उत्पन्न करणें, विळ्याभोपळ्याच्या सख्यासारखें असूनहि संत त्यांचें ऐक्य करण्याचा हास्यास्पद प्रयत्न करीत होते नुसत्या नामाच्या देवघेवीनें, देशाचे दैन्य दूर होणें अशक्य हें रामदासाच्या तीव्र बुद्धीनें तेव्हांच ताडलें. 'प्राणी जात सर्व सारखीच' हें रामदासांना मान्य नव्हते. ज्याला राग नाहीं. प्रेम नाहीं, द्वेष नाहीं सूड घेण्याची ताकद नाहीं, अभिमानानें ज्याला जगतां येत नाही तो मनुष्य नसून पशुच जाणावा ही रामदासांची शिकवण होती. त्यांनी आपल्या आयुष्यांत एकूण १८०० मठ स्थापन केले व यांतून भिक्षा वृत्तीपासून राजकारणापर्यंत योग्यता पाहून ज्ञान दिले जाई. यांची मठ स्थापनेंची स्थानें हिंदुस्थानभर जाळ्यासारखी पसरली होती. हे मठ ह्राच समर्थांचा संसार होता. आपल्या शिष्यास समर्थांची शिकवण कशी होती त्याचा नमुना त्यांच्याच शब्दांत पहा—

शरीर परोपकारी लावावें । बहुतांच्या कार्यास यावें। उणे पडोनेद्यावें । कोणाचे

क्र. नं. ८५५८



दुसऱ्यांचें दु:खे दुःखि व्हावे । परं संतोषे सुखी व्हावें
प्राणिमात्रास मेळवूनि घ्यावें । बऱ्या शब्दे
अत:स्य अवघाच दडवावा । यत्न उदंडचि करावा
शब्द मत्सर न करावा । कोणी एकाच्या
स्वये आपण कष्टावे । बहुताचे सोशीत जावे
झीजोनी किर्तीस उरावे । नानाप्रकारे

ही शिकवण ज्यानी आत्मसात केली त्याला जग वश कां होणास नाही? मठाधिपतींना कडक शिकवण असें

जवबरि चंदन झिजेना । तववरी सुगंध कळेना । चंदन आणि वृक्षना । सगट होती

बोलण्या सारख चालणें । स्वयें करुनि बोलणें
तयाची वचनें प्रमाणें । मानिती जन
समुदाय पाहिजे मोठा । तरी तणावा असावा बळकट
मठ करुनि ताठा । करु नये

ही शिकवण आजकालचे मठाधिपती तर पार विसरून गेलें नाना व्यसनांनी त्यांना घेरले, द्रव्यलालसा, परस्त्री लालसा, स्वार्थ व व्यसनाधिनता, हेच जिकडे तिकडे मठांतून दिसतें. शिष्यांनी तीन वर्षात एकदां तरी चालकास भेटावे. अशी ताकीद होती. आतां शिष्य एकदां शाळेतून बाहेर पडला की जन्मभर गुरूचे दर्शन घ्यायलाही फुरसत नसतें शिस्तीच्या बाबतींत समर्थ फारच कडक असत. शिवाजी सारखा राजा देखील त्यांना नमत असें.

गुरुस साष्टांग नमस्कार करावा, [illegible] नये, त्यांच्या देखत हसूं नये. गुरु बंधवर प्रेम [illegible] त्याची आज्ञा व शिरसावंद्य मानावीं कोठे त्या काळची शिस्त व कोठे आजचा सावळागोंधळ [illegible] त्याचें कार्याकडे पाहिल्यास त्यांत देशाविषयी तळमळ, मानवतेचें धडे, व्यावहारिक उपदेश ओतप्रोत भरला आहे! मरण त्या वेळी ते म्हणतात—

' माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंत करणी
परि मी आहे जगजीवनी । निरंतर'
' [illegible] ' दासबोध "। माझे स्वरूप स्वत: सिद्ध
असतां न करावा हो खेद । भक्तजनीं ।

म्हणजें एवढें महान् देशकार्य करूनहि त्यांना अहंपणाचा वारा मुळीच लागला नाहीं यावरून त्याचा मोठेपणा सिद्ध होतो.

असो. मानवतेचा पुजारी श्री समर्थ यांची शिकवण व त्याचे कार्य याचा थावतां आढावा घेऊन हें तरुणांनीं देशकल्याणार्थ ही शिकवण कृतीत आणावी हीच रामदासांच्या 'दासनवमी' उत्सव प्रसंगी प्रार्थना आहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
प्र ........................ दि: ....................

REFBK-0009782

